म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २०११३

# बावनखणी

[ पेशवेकालीन संगीत–नृत्यमय तीन अंकी नाटक ]

विद्याधर गोखले

IRBK-0120113

मॅजेस्टिक

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.

# बावनखणी

म ग्रं. ... ग्रालय शास्त्री.
क्र ... २८९१३ ... ३०।१२।६३
...

वाचनालय
नाटक
२०९९३
३९/९२/८३

# बा व न ख णी

[ पेशवेकालीन संगीत-नृत्यमय तीन अंकी नाटक ]

विद्याधर गोखले

IRBK-0120113

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव नाका, मुंबई ४

मुद्रक :
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

पहिली आवृत्ती :
सप्टेंबर १९८३

© विद्याधर गोखले

मुखपृष्ठ :
कमल शेडगे

DRM- 74/83 दि. १८ जानेवारी १९८३

मूल्य : १५ रुपये

## महत्त्वाची जाणीव

विशिष्ट करारान्वये ह्या नाटकाच्या रंगभूमीवरील व्यावसायिक वा हौशी प्रयोगांचे अधिकार श्री. भालचंद्र पेंढारकर (संचालक, 'ललितकलादर्श') ह्यांच्याकडे असून, तदितर भाषांतर–रूपांतर, ध्वनि-मुद्रिका, कॅसेट-निर्मिती, चित्रपटकथा, पुनर्मुद्रण इत्यादींचे सर्व अधिकार लेखकाधीन आहेत. लेखी पूर्व–परवानगीविना ह्या नाटकाचा पूर्णतः वा अंशतः प्रयोग करणाऱ्यावर कायदेशीर इलाज केला जाईल.

माझ्या 'सुवर्णतुला' नि 'चमकला ध्रुवाचा तारा'
ह्या लोकप्रिय संगीत-नाटकांचे आद्य-निर्माते
आणि रंगदेवतेचे एक निष्ठावंत उपासक

**कै. गोपीनाथ सावकार**

ह्यांच्या स्मृतीस
अर्पण

विद्याधर गोखलेलिखित 'बावनखणी' या संगीत–नृत्यमय नाटकाचा पहिला प्रयोग 'ललितकलादर्श' च्या अमृत–महोत्सवात सोमवार दिनांक ३१ जानेवारी १९८३ रोजी सायं. ५॥ वा. शिवाजी मंदिर, दादर, येथे 'ललितकलादर्श' या सुप्रसिद्ध नाट्यसंस्थेने केला. त्यात भाग घेतलेले कलावंत :

| | |
|---|---|
| बावनखणी, रोशन, श्यामदुलारी | : माया जाधव |
| खंडोशंकर | : भालचंद्र पेंढारकर |
| श्रीधर | : माधव आचवल |
| सुखदेव, बाजीराव पेशवे | : अरविंद पिळगावकर |
| बसंती, तारा | : नयना आपटे |
| हुसेन अत्तार, मल्हार | : आ. दे. पाटील |
| जॉन्सन, महंत | : शहाजी काळे |
| सर्जेराव मोहिते, विसाजीपंत | : सतीश रणदिवे |
| मदनराव मोहिते, रंगोविठ्ठल | : सुकुमार |
| साळू | : मालती पेंढारकर |
| मोरशास्त्री | : चंदू डेगवेकर |
| चंद्रा | : फैयाज शेख |

| | |
|---|---|
| दिग्दर्शन | : नंदकुमार रावते |
| संपूर्ण गीतरचना | : विद्याधर गोखले |
| संगीत दिग्दर्शन | : यशवंत देव |
| संगीत साथ | : गोविंद पटवर्धन, भोजराज साळवी मधुकर बर्वे, रमेश लाखण |
| नेपथ्य | : द. ग. गोडसे |
| साहाय्यक | : मोहन राऊळ, आत्माराम मिस्त्री |
| विद्युत्–संयोजक | : दिलीप कोल्हटकर |
| साहाय्यक | : शशी पवार |
| रंगभूषा | : वर्दम मेकअप् सर्व्हिस |
| वेशभूषा | : लत्रू ठकरूल |
| नृत्य संयोजन | : माया जाधव |

ग्र. ग्रं ... ग्रंथालय
२०११३


# ‘ मज म्हणती बावनखणी....’

देऊळ, दुर्ग आणि देवडी ही जशी मानव समाजाच्या मूलभूत गरजांची प्रतीके–चिन्हे ठरली आहेत, तशीच ‘ बावनखणी ’ ही वास्तू अथवा वस्ती निसर्गदत्त मानवी गरजेचीच निशाणी आहे. त्यामुळेच देऊळ, दुर्ग आणि देवडी यांसारखीच ‘ बावनखणी ’ ही कोणत्याही मानवी वतीस्चे एक आवश्यक आणि अपरिहार्य अंग झाली आहे... अगदी प्राचीन काळापासून तो आजपर्यंत. निरनिराळ्या कालखंडात या वास्तूचे खण अथवा वस्तीतील घरे, कधी कमी तर कधी अधिक झाली असतील... त्यांचे शिल्प, रंगरंगोटी, साजसजावट, परिस्थितीनुसार वेगवेगळ्या थाटघाटाची, रंगढंगाची झाली असेल. हत्तीवरून फिरणाऱ्या वसंतसेनेसारख्या गजान्तलक्ष्मीचे वैभव उपभोगणाऱ्या गणिका नेहमीच या खणातून अथवा वस्तीतून राहिल्या आहेत असेही नाही. कालमानानुसार गणिकांनाही बरेवाईट दिवस--खरे म्हणजे रात्री---पाहाव्या लागतातच. पण कोणत्याही कालखंडात गणिकांची वस्ती मुदलीच उठून बावनखणीची वास्तू अथवा वस्ती ओस पडल्याचे आढळत नाही. पुराणकाळात काय अथवा मराठेशाहीत काय, देवांचा राजा इंद्रापासून तो मराठी शाहीरांच्या रावराजेंद्र बाजीरावापर्यंत साऱ्यांनाच, केवळ व्यक्तिसुखासाठीच नव्हे तर समष्टीच्या स्वास्थ्यासाठीही गणिका आवश्यक वाटल्या आहेत. रामायणकालात अतिथींच्या सत्काराकरिता गणिकांना बोलावण्याची प्रथा होती. भरताच्या व त्याच्या अनुयायांच्या सेवेकरिता भारद्वाज मुनींनी आपल्या आश्रमात गणिका आणल्या होत्या. चौदा वर्षांचा वनवास संपवून रामचंद्र परत आले आणि भरताला भेटले तेव्हा – ‘ घोडे, हत्ती आणि गणिका यांचा क्रीडेकरिता उपयोग करीत होतास किंवा नाही ? ’ असा प्रश्न रामचंद्रांनी भरताला विचारला आहे. महाभारतकाळात कौरव–पांडवाच्या राजवाड्यातूनही शेकडो गणिका राहात होत्या. मौर्य आणि गुप्त राजे तर नेहमी गणिकांनीच वेढलेले असत. त्यांचे छत्रधर, चवरीधर, तांबूल–करंडकवाही, जलकुंभवाही ह्या गणिकाच असत. राजदरबारात, अंतर्गृहात, रथात, प्रवासात अथवा शिकारीच्या रानात त्या सतत राजाबरोबरच असत. प्रतिहारी अथवा वेत्रवती ही तर राजाची खासगी सचिवच असे. अत्यंत रूपवान, सुविद्य, चतुर अशा गणिकांचीच त्या कामाकरिता निवड होत असे. सारांश, गणिका म्हणजे सामान्य दासी नव्हेत...रूपाने, गुणाने, विद्येने त्यांचा दर्जा आणि अधिकार फार मोठा असे हे ध्यानात घ्यायला हवे.

‘ कला–रूप–गुणान्विता ’ असे गणिकांचे वर्णन करण्यात आले आहे. त्या गान-नर्तन–निपुण तर असतच, पण त्याचबरोबर त्या सुविद्य आणि चतुरही असत. काव्यशास्त्राच्या उत्तम जाणकार असत. राजशेखराने आपल्या काव्यमीमांसेत कित्येक गणिका कवी असल्याचे

नमूद केले आहे. त्या काळी गणिकांना नागरपुत्रांबरोबर विद्याध्ययन करण्याचा अधिकार असे. त्या वेळच्या सामान्य स्त्रिया गणिकांच्या मानाने बऱ्याच अशिक्षित असाव्यात असे ' मला गणिकेसारखी शिकलेली सून पाहिजे ' अशा एका राजाच्या उद्‌गारावरून सूचित होते ! म्हणूनच संस्कृत साहित्यात गणिकेला ' नगरश्री ' म्हटले आहे. वसंतसेना, आम्रपाली यांसारख्या प्रसिद्ध गणिका आपआपल्या नगरांच्या ' अभिमान–वस्तूच ' होत्या. ' गणिका प्रार्थनीय म्हणजे वांछनीय असते, अभिगम्य म्हणजे अभिगमनास योग्य असते, तद्वीच चिंतनीय म्हणजे जिचे चिंतन करावे अशा योग्यतेची असते...' असे भरतमुनीचे नाट्यशास्त्र सांगते. म्हणूनच गणिका सम्राट–सामंतांकडून आणि श्रेष्ठी–सावकारांकडून जशी सन्मानिली जात असे, तशी कवी, शास्त्री, पंडित यांजकडूनही प्रशंसिली जात असे. निदान त्या काळात तरी गणिकादर्शन अशुभ नव्हते. उलट कोणत्याही कामाला निघाले असताना वाटेत गणिका भेटल्यास तो शुभशकुन आहे असे मत्स्यपुराण सांगते. गणिकांना प्रदक्षिणा घातल्याने पुण्य लागते असे इ. स. च्या पाचव्या शतकातील विष्णुसंहितेत सांगितले आहे. मंगळसूत्र गणिकेने ओवल्यास सौभाग्य कायम टिकते हा समज तर अलीकडेपर्यंत रूढ होता. काही ठिकाणी दुर्गामातेची प्रतिमा करण्याकरिता गणिकेच्या उंबरठ्यातली माती आणावी असाही संकेत होता.

ख्रिस्ती शकापूर्वी तिसऱ्या–चौथ्या शतकात पाटलीपुत्र हे शहर फार भरभराटीस आले होते. साहजिकच गणिकांची वस्ती तेथे खूप होती. याच सुमारास गणिकांसंबंधी अनेक ग्रंथही निर्माण झाले. वात्स्यायनाने आपल्या कामसूत्रात या सर्वांचा सारांश दिला आहे. चंद्रगुप्त मौर्याच्या वेळी गणिकांची व्यवस्था बघण्याकरिता ' गणिकाध्यक्ष ' या नावाचा स्वतंत्र अधिकारी असे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात गणिकाध्यक्षाच्या कामाचे सविस्तर वर्णन आहे.

गणिकांना सुविद्य आणि कलानिपुण होण्याकरिता बराच काळ व द्रव्य खर्च करावे लागे...आणि लहान वयापासूनच त्यांना त्या दृष्टीने शिक्षण देण्यात येत असे. पण या शिक्षणामुळेच त्यांना राजदरबारातही प्रवेश मिळून अनेक महत्त्वाच्या कामांवर त्यांची नेमणूक होई. आणि राणिवशापासून खलबतखान्यापर्यंत त्यांचा अप्रतिहत संचार असे. कोणत्याही उत्सवप्रसंगी गणिकांना बोलावून त्यांच्या नाचगाण्याने पाहुण्यांचे मनोरंजन करणे ही प्रथा तर समाजाच्या सर्व थरातून रूढ होती. लग्नप्रसंगी नायकिणींचा नाच करणे हा नागपूर–जबलपूरकडे अजूनही एक महत्त्वाचा कार्यक्रम असतो. श्री. बा० ग० ऊर्फ दादासाहेब खापर्डे यांच्या रोजनिशीवरून कळते की त्यांच्या काळात राष्ट्रीय पुढाऱ्यांचा सत्कारही कलावंतिणींचे नाचगाणे करून होई ! प्राचीन काळच्या उद्यान–यात्रा, सहली, वनभोजने हे कार्यक्रम तर गणिकांशिवाय होतच नसत. संस्कृत साहित्यात याचे अनेक दाखले मिळतात.

गणिकांचे संघही असत; आणि या संघांमार्फत राजदरबारी तक्रार करून आपली कोणतीही

अडचण त्या दूर करून घेत. गणिकांचा एक सार्वजनिक निधीही असे. वृद्ध अथवा आजारी गणिकांना त्यातून मदत मिळत असे. वृत्तीने सर्वसाधारण गणिका धार्मिक आणि उदार असत...आणि त्यांचा बराचसा पैसा दानधर्मात व देवळे, विहिरी, कुंडे, पाणपोया, नदीचे घाट वगैरे सार्वजनिक उपयोगाच्या वास्तू बांधण्यात खर्च होई. अशा विहिरी आणि कुंडे महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी आढळतात. विशेष म्हणजे, आजच्याप्रमाणेच प्राचीन काळीही सैन्यावरोबर गणिका असत. आणि लढाईचे वेळी त्यांचे स्थान सैन्य-व्यूहाच्या मध्यभागी असे. गणिका बरोबर असल्यास सैनिक अधिक चांगले लढतात असे कामंदकीय नीतिसारात सांगितले आहे.

इ. स. च्या दहाव्या-अकराव्या शतकापर्यंत तरी गणिका ह्या कौटुंबिक व सामाजिक शिष्टाचार शिकविणाऱ्या सार्वजनिक शाळाही होत्या. या शिक्षणाकरिता श्रेष्ठींची तरुण आणि विवाहित मुले मुद्दाम गणिकांकडे पाटविण्यात येत, असे प्राचीन जैन कथांवरून कळते. अकराव्या शतकातील दामोदर गुप्ताचे ' कुट्टनीमतम् ', क्षेमेंद्राचे ' समय मातृका', ' देशोपदेश ', ' नर्ममाला ', ' कलाविलास ' व जल्हणाचे ' मुग्धोपदेश ' हे काव्यग्रंथ गणिकाविषयकच आहेत. ' कुट्टनीमतम् ' चा कर्ता दामोदर गुप्त हा तर काश्मीरच्या जयापीड राजाचा प्रधान होता. राजमंत्र्यासारख्या प्रतिष्ठित व जबाबदार अधिकाऱ्याने गणिकेच्या विषयावर काव्य लिहावे व रसिकांनी आणि साहित्य मीमांसकांनी त्या काव्याचा गौरव करावा, हे अप्रत्यक्षपणे गणिकांचे सामाजिक ऋण मान्य करण्यासारखेच आहे.

गणिकांच्या या विराट गर्दीत काही फसव्या, लबाड, लुटारू गणिकाही आढळून येतात. त्यांचे यथोचित चित्रण ' भाणा ' सारख्या नाट्यप्रकारातून व गणिकाविषयक इतर ग्रंथातून करण्यात आलेले आढळते. बहुधा सर्वच व्यवसायात अशा वृत्तीचे लोक असतातच. सबब, फक्त गणिकांच्या पेशालाच नावे ठेवणे योग्य नाही. नावे ठेवायचीच तर गणिकांकडे जाणाऱ्या सर्व लोकांच्या पेशांनाही नावे ठेवावी लागतील. आणि तसे झाल्यास शास्त्री, पंडित, पुरोहित यांचे सोवळे व्यवसायही त्यातून सहीसलामत सुटतीलच याची खात्री नाही. वास्तवात गणिकांचा व्यवसाय निखळ लोकरंजन, हास्यविनोद, आनंद, भोग-उपभोग वगैरे क्रीडाभावांशीच निगडित आहे. त्यांच्याकडे येणाऱ्या रसिकांचे रंजन, ल्हादन आणि न्हादन हेच गणिकांच्या क्रीडेचे उद्दिष्ट असते. आणि या गुणांचा परिपोष होण्याकरिताच नृत्य, नाट्य, संगीत आदि ललित कलांचे आपले कौशल्य पणास लावून त्या समाज-रंजनाचे आणि समाज-स्वास्थ्याचे मोठे आणि महत्वाचे कार्य करीत असतात. या कार्याचे महत्त्व ओळखूनच आजपर्यंत सत्ताधीशांनी, समाजधुरीणांनी, श्रेष्ठी-सावकारांनी गणिकांना नेहमीच आश्रय व प्रोत्साहन दिले आहे. सामान्य भाट, भाण, चारणांपासून तो व्युत्पन्न, विदग्ध, काव्यकलाकोविदांपर्यंत साऱ्यांनीच त्यांचा गौरव केला आहे . त्यांचे पोवाडेही गायिले आहेत. वसंतसेना, आम्रपाली, वसंततिलका, चिंतामणी, जोहरा, पारूसुन्दरी, उमरावजान आदा वगैरे नामांकित गणिका शारदेच्या उपासकांनीच अमर

केल्या आहेत. नागर व्यक्तिमत्त्वाला सुसंस्कृत आणि संपन्न करण्यासाठी संस्कृत पंडितांनी गणिकांच्या मैत्रीची, सहवासाची आवश्यकता एका सुभाषितात वर्णन केली आहे. ' देशाटनम् पंडित–मित्रताच वारांगना राजसभा–प्रवेशः '. रसिक संस्कृतने वारांगनांचे महत्त्व ओळखले, पण मराठीने मात्र फाजील सोवळेपणाच्या भरीस पडून याच सुभाषिताच्या मराठी भाषांतरांतून नेमके वारांगनांनाच वगळले आहे !

प्राचीन काळापासून आजपर्यंत चालत आलेले गणिकांचे कूळ एकच आहे. देश, वेश आणि वंश यांच्या मर्यादा त्यांना अडवू शकत नाहीत. चंद्रगुप्त मौर्याच्या ग्रीक गणिकांपासून तो शहाजीराजांच्या सुलताना नुरुद्दीनपर्यंत.. धर्म–पंथ–जात–जमात यांचे अडसर त्यांनी कधीच मानले नाहीत. दाक्षिणात्य–पाश्चात्य असले दिशाभेद त्यांच्यामध्ये नाहीत, तसेच काळा, गोरा, पीत, ताम्र असे वर्णभेदही नाहीत. गणिका ह्या विश्व–नागरिकच असतात. विश्वयोषिता म्हणजे विश्वमानवाची सेवा करणाऱ्या असे त्यांचे सार्थ नाव आहे. पण नीतिवाद्यांच्या सोवळ्या वृत्तीमुळे या शब्दाला आज विकृत अर्थ देण्यात आला आहे.

एके काळी ऋषींचा आश्रम ही संस्था जशी समाजोपयोगी म्हणून आवश्यक होती, तशीच गणिकावस्ती हीसुद्धा शहररचनेचा एक आवश्यक भाग समजली जात होती. आश्रमांप्रमाणेच गणिकांच्या वस्तीतही वेगवेगळ्या परिस्थितीत बदल झाले आहेत. गणिका ही जात कळपाने राहाणारी आहे. त्यामुळे नगरव्यवस्थेतही त्यांना नगराच्या विशिष्ट भागात जागा देण्यात येई. लक्षणेने ती ' बावनखणी ' च असे. कधी बावन खणांची तर कधी बावन घरांची. सोवळ्या नीतिमार्तंडांकडून शहरोशहरींच्या बावनखण्यांना नानाप्रकारचे जाच नेहमीच देण्यात आले आहेत. निर्घृण टीका, तुच्छता, मानहानी यांना नेहमीच त्या तोंड देत आल्या आहेत. तरीही गंमत ही की ही जमात कधी कुठे नामशेष झाल्याचे आढळून येत नाही. इतिहासाच्या विशाल कालपटावर निरनिराळ्या नावांनी ती आपले अस्तित्व टिकवून आहे. मौर्यांच्या काळातील ' गणिका निवास ', दहाव्या शतकातील ' शूलागार ' आणि पेशवेकालीन ' बावनखणी ' यांची जात–जमात आणि जहान एकच ! ज्ञानेश्वरांच्या यादवकाळात ' रंभे ऐसिया नाचणी ' आपली ' गंधर्व गान–गाणी ' एखाद्या त्रिमाळी धवळाराच्या चापेखणातून जशा ऐकवीत, तशाच पेशवेकालीन नायिकाही किनखापी अथवा मशरूच्या पडद्यांनी आणि रुजामे, गाद्यागालिच्यांनी सजलेल्या, महिरपी खिडक्यांच्या आणि सुरूदार खांबांच्या खणाखणातून टप्पा, होरी, ठुमरीच्या अथवा बेभान धुंद लावणीच्या नाना तऱ्हा पेश करीत. त्यात कोणी कर्नाटक – गोमंतकाच्या, कोणी फैजाबाद–औरंगाबादच्या, कोणी नगर–संगमेश्वरच्या तर कोणी कोल्हापूरच्या ! संगीत आणि नृत्य यांचा जणू शीशमहाल असलेली पेशवेकालीन बावनखणी, छप्पन्न देशींचे लोक एके ठायी जमलेल्या केवळ पुणे शहराचीच नव्हे तर उभ्या हिंदोस्थानच्या नाकातील चमकदार नथणीच होती ! ठिकठिकाणच्या कलावंतिणी तर येथे जमल्या होत्याच.. पण त्यांच्यापाठोपाठ किती गवय्ये, बजवय्ये, सारंगिये, वीनकार, मृदंगिये, पखवाजी ठिक-

ठिकाणांहून येथे आले होते, याची गणती नाही. या साजिंद्यांच्या बरोबर आलेल्या अत्तार, गंधी, दर्जी, मोची, हलवाई, चितारी, जिनगर, कशिदाकार, शीशगर वगैरे वगैरे हुन्नरी व्यावसायिकांच्या बहुभाषिक गर्दीला तर सुमारच नव्हता ! या कारागीरांच्या कसबी हुन्नराने त्या वेळचे पुणे एखाद्या मखरासारखे सजवले होते...आणि या मखरात, दर्दी रसिकांची एक बेहोश, बेखबर, बेमिसाल मैफिल जमली होती... या मैफिलीची मीर-ए-मजलिस अर्थातच बावनखणी होती !

पण पुण्याच्या बावनखणीची मजलिस एका दिवसात सिद्ध झाली नाही. तिचा आलेख काढायचा झाला तर पहिले बाजीराव ते दुसरे बाजीराव असा काढावा लागेल. सातारच्या छत्रपती शाहूमहाराजांपासूनच कलावंतांचा शोध आणि त्यांची कदर महाराष्ट्रात प्रयत्नपूर्वक सुरू झाली. दिल्ली, आग्रा, सिरोंज या ठिकाणांहून गवई, नट, नायकिणी मिळविण्यास सांगणारी शाहूमहाराजांची अनेक पत्रे उपलब्ध आहेत. नरगुंदचा जयाप्पा देसाई याने कर्नाटकातून दोन देखण्या नायकिणी व एक फिरंगी वीणा शाहूमहाराजांना नजर केली होती. महाराष्ट्रातल्या होतकरू मुली मिळवून त्यांना नृत्यकलेत तरबेज करण्याचे प्रयत्नही शाहूमहाराजांनी केले आहेत. पेशवे साताऱ्यासच छत्रपतींजवळ राहिले असते तर 'बावनखणी' साताऱ्यालाच उभी राहिली असती. सारांश, बावनखणीची पायाभरणी पेशव्यांच्या आधी सातारचे रसिक आणि पुण्यश्लोक छत्रपती शाहूमहाराज यांनीच केली होती, हे ध्यानात ठेवायला हवे.

शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर पेशवा बाजीराव पुण्यास स्थायिक झाला आणि पुण्याच्या पेशव्यांच्या वाड्यावर कलावंतांना आश्रय मिळू लागला. पहिल्या बाजीरावाचा नाचगाण्याचा षौक सिद्ध करणारी अनेक पत्रे उपलब्ध आहेत. अनेक परप्रांतीय कलावंत-कलावंतिणींना त्याने आश्रय दिला होता. बावनखणीतल्या काही खणातून त्या राहायलाही आल्या होत्या. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत औरंगाबाद, बऱ्हाणपूर वगैरे ठिकाणांहून गवई, नायकिणी, नटवे, संगीतराव यांचे अनेक ताफे पुण्यास बोलावून त्यांना पगारी नोकर म्हणून ठेवण्याचा प्रघात पडला आणि पुण्यास 'शासनपुरस्कृत बावनखणी' सिद्ध झाली. याशिवाय प्रांतोप्रांतीचे गुणिजन पुण्यास येऊन हजेरी देत ते वेगळेच. पेशव्यांच्या ललित-कला खात्यावरील अधिकारी आत्माराम राजाराम होता. हळूहळू पुण्याची बावनखणी कशी वयात येत होती हे कळण्यास नानासाहेब पेशवे व आत्माराम राजाराम यांचा पत्रव्यवहार अभ्यसनीय आहे.

राघोबा पेशव्यास तर नायकिणींचे वेडच होते. राघोबाच्या नाटकशाळा हा बावनखणी-चाच एक भाग होता... आणि त्याचा अधिकारी गुलाबराव खोजा हा इसम होता. त्याने वेळोवेळी राघोबाला पाठविलेल्या पत्रांवरून नायकिणींचे नृत्यगायनाचे शिक्षण, त्यांना तालीम देणारे नटवे, मिळणारी बिदागी वगैरे वगैरे अनेक गोष्टींची माहिती मिळते. पण फक्त राघोबालाच नाटकशाळेचा विशेष छंद होता असे नाही. नानासाहेब पेशव्यांनंतर

नाटकशाळा हे पेशव्यांचे कायम खर्चाचे खाते होते, हे थोरल्या माधवरावांसारख्या निग्रही शिस्तीच्या पेशव्याच्या हिशेबवह्यांवरून स्पष्ट होते. सातारचे छत्रपती पुण्यास आले असताना त्यांच्या सन्मानार्थ पेशव्यांनी मेजवानी दिली. त्या समयी जो नाच करण्यात आला त्यात चंदा नायकीण, आनंदी सुपेकर, गुलाब पुणेकर, मीरा पाल्कर, अना सातारकर वगैरे तेरा नायकिणींनी हजेरी दिली अशी नोंद आहे. या यादीवरून थोरल्या माधवरावांच्या वेळी मराठी नायकिणी गायन–नर्तनात बऱ्याच तयार झाल्या होत्या असे स्पष्ट होते.

सवाई माधवरावांची कारकीर्द म्हणजे नाना फडणीसांची हुकूमत. नानांनाही नाटकशाळांचा षौक होताच. विशेषतः परप्रांतातील कलावंत हरप्रयत्नांनी मिळवावेत असे ठिकठिकाणच्या वकिलांना त्यांनी कळवून ठेविले होते. निजामाच्या दरबारी असलेले पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांचा आणि नानांचा पत्रव्यवहार बावनखणीच्या संदर्भात मुद्दाम वाचण्यासारखा आहे. काळे लिहितात – ' चंद्रा कळवंतीण सांप्रत गाण्यात, नाचण्यात, सुरतीत, हावभाव बतावणीत येथे सर्व दौलतदारांच्या पसंतीस आहे. आमच्या मनात तिला पुण्यात आणावी असे आहे. परंतु रावरंभा तिला दरमहा दोन हजार रुपये देतात. आमचे मते एक हजार रुपये देऊन येत असल्यास आणावी. येविशी आज्ञा व्हावी. ' रावरंभा हे निजामाचे एक सरदार, ते दरमहा दोन हजार रुपये देत असताना, ते सोडून चंद्रा पुण्याला अर्ध्या पगारावर येईल असा गोविंदराव काळ्यांना जो विश्वास वाटतो, तो कशाच्या जोरावर हे कळत नाही ! नाना किंवा गोविंदराव यांच्यापैकी कोणावरही ती एवढी फिदा होणे शक्यच नव्हते ! नवकोटनारायण असलेल्या नानांच्या नाटकशाळेच्या षौकाची मात्र या पत्रावरून कल्पना येते.

नाना फडणवीसांनंतर मराठी शाहीरांचे ' रावराजेंद्र ' दुसरे बाजीराव यांचा ललितकलांचा षौक सर्वश्रुत आहे. ते पेशवाईवर येताच त्यांच्या आज्ञेवरून नवेनवे उत्सव सुरू होऊन त्यात अनेक स्थानिक आणि परप्रांतीय गुणीजनांचा मुक्त हस्ताने परामर्ष घेण्यात येऊ लागला. पहिल्या बाजीरावाने पायाभरणी केलेली ' बावनखणी ' दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत ऐन भरात आणि भरभराटीत होती. एका बैठकीत पाच–दहा नव्हे तर सव्वीस हजार रुपयांची रोख बिदागी मिळविणाऱ्या व्यंकट नरसीसारख्या अनेक गाणारणी त्या वेळी पुण्याला स्थायिक झालेल्या दिसतात. त्यांचे मोठे वाडे आणि इमले होते. बागा होत्या. नोकर–चाकर, दासी, बटकिणी होत्या. पत्रव्यवहार करणारे मुनीम–कारकूनही होते, असे काही उपलब्ध पत्रांवरून वाटते. श्रीमंतांच्या निमंत्रणाच्या पत्राला त्याही स्वीकारपत्र पाठवून जबाब देत असाव्यात. गणपती, गोकुळअष्टमी, होळी यांसारखे उत्सव या नायकिणी मोठ्या थाटाने करीत असाव्यात असेही अनुमान करता येते. विशेष म्हणजे त्या वेळी मोहरमचा सणही तेवढाच गाजायचा आणि हिंदू आणि मुसल्मान या दोन्ही जमाती त्यात आनंदाने सहभागी व्हायच्या. बाजीरावाच्या वेळी पुणे शहरात निघणाऱ्या ताबूतांची व पंजांची संख्या किमान दीडशेवर असावी असा एका यादीवरून अंदाज होतो. पुण्याची

बावनखणी त्यातही सहभागी असायची... ! अनेक मातबर हिंदू–मुसलमान असामींचे ताबूत तर निघायचेच...पण तंतकार, रंगारी, चितारी, रफूगर, जिनगर या हुन्नरी लोकांच्या ताबूताप्रमाणेच त्या वेळच्या काही नायकिणींचे ताबूतही असायचे ! नंतरच्या एका यादीवरून असे अनुमान होते की, कदाचित् संगमावरच्या इंग्रजांचाही एखादा ताबूत निघत असावा !

इतिहासाच्या विशाल प्रांगणात आजपर्यंत शेकडो बावनखण्या आपआपल्या मगदुराप्रमाणे नांदल्या आहेत आणि गाजल्याही आहेत. बावनखणी ही इतिहासाचीच निर्मिती असते. किंबहुना प्रत्येक देशाच्या इतिहासातील काही काळ बावनखणीच्या नूपुरांच्या झंकाराने गुंजून उठणे हा इतिहासाचा एक आवडता छंद असावा असेही वाटते. उत्तर पेशवातील बावनखणीच याला अपवाद कसा ठरेल ? तीही एक ऐतिहासिक ‘ अपरिहार्य , घटनाच होती. देऊळ, देवडी आणि दुर्ग यांप्रमाणेच बावनखणीही इतिहासाला प्रिय असते. सबब, तिच्या ऐतिहासिक अपरिहार्यतेची मीमांसा न करता, तिच्या पेशवेकालीन रूप–स्वरूपाचा, पूर्वग्रहविरहित शोध घेणे, नीति–अनीतीच्या पापपुण्याच्या कर्मठ कल्पनांना बाजूला ठेवून तिच्या भल्याबुऱ्या सौंदर्याची पारख करणे, हासुद्धा इतिहासाचाच अभ्यास आहे...आणि रायगडाइतकाच बावनखणीचा शोध महत्त्वाचा आहे. बावनखणी हे रायगडाप्रमाणेच एका मानवी वृत्तीचे प्रतीक आहे....आणि ते मानवी आहे म्हणून ते रायगडाइतकेच अभ्यसनीय आहे. रायगडाच्या अंगावरून येणाऱ्या वाऱ्याला जसा जोशाचा, उन्मादाचा...बेहोश, बेभान करणारा मर्द आक्रमक गंध आहे, तसाच बावनखणीलाही एका वेगळ्या उन्मादाचा तेवढाच आक्रमक गंध आहे ! वास्तवात हे दोन्ही गंध इतिहासाचे आहेत म्हणजे माणसाचेच आहेत. सबब, इतिहासाचा अभ्यास करणाऱ्याला या दोन्ही गंधांची दखल एखाद्या जाणकार रसिकाच्या समबुद्धीनेच घ्यायला हवी.

नायकिणीने अत्तर लावले म्हणून अत्तराचा सुगंध कमी होत नाही, किंवा नायकिणीच्या अंबाड्यावर विराजमान झाली म्हणून तिच्या वेणीतील फुले कोमेजून जात नाहीत. उलट जीवनाचा सुगंध पसरविण्याचे....हर्षाची, उन्मादाची सर्वत्र फुले फुलविण्याचे एकमेव प्रांगण म्हणजे बावनखणी. सौंदर्य आणि सौहार्द यांचा चतुर वाग्विलास, रंग, रूप, स्वर, गंध, स्पर्श यांचे बेभान विक्रीडित बघायचे ते बावनखणीच्या मुक्तांगणात ! पण ते बघायास येणाऱ्यांनी अथवा त्यात सहभागी होणाऱ्यांनीही तन–मन आणि धन यांनी तेवढेच मुक्त असले पाहिजे. मुख्य म्हणजे निःशंक आणि निर्भय असले पाहिजे. सौहार्द आणि लालित्य यांची निर्भय क्रीडा हा बावनखणीचा स्थायीभाव आहे.

रतिक्रीडाही येथे होते हे खरे . पण त्यात वावगे काय आहे ? पण येथल्या रतिक्रीडेचे वैशिष्ट्य हे की, इथल्या रतिव्यवहाराला क्रीडेचे अंग ‘ अधिक ’ असते. आणि नेहमी म्हणण्यात येते त्याप्रमाणे ‘ देहविक्रय ’ करून नव्हे, तर देह–सहयोग देऊन अत्यंत कौशल्याने...क्रीडानंदात निर्भर होणे हाच गणिकांचा व्यवसायधर्म असतो. ‘ काम ’ हा

शत्रू असेलही कदाचित् , पण चावनखणीत भेटणारा काम हा मात्र एक रसिक मित्र आहे. या मित्राची ओळख करून घ्यायची तर निर्भय, निःशंक आणि तेवढेच रसिक, दिलदार आणि सूक्ष्म मन घेऊन येथे आले पाहिजे. सूचना एकच की इथल्या कलाकामिनींच्या हनुस्थानीच्या गोड खळीत पडायला जे राजी नसतील... 'तयांनी मात्र या प्रांती, जपोनि पाय टाकावा !!'

— द. ग. गोडसे

१ कल्याणी, उत्तम हाउसिंग सोसायटी
सेन्ट अँथनी रोड
चेंबूर, मुंबई ७१

# लेखकाचा ऋणनिर्देश

'बावनखणी' हे नाटक माझ्या मनात १९६१ सालापासून घोळत होते. ज्यांना ज्यांना मी ह्या नाटकाची मध्यवर्ती कल्पना सांगितली, त्या त्या स्वरराज छोटा गंधर्व, कै. शंकर घाणेकर, कै. दीनानाथ दलाल इत्यादींना ती फार आवडली. चित्रकार दलालांनी तर ह्या नाटकाचा पहिला अंक साग्रह मागून घेऊन, १९६६ च्या 'दीपावली' च्या अंकात प्रसिद्धही केला. मी ह्या सर्वांचा ऋणाईत आहे.

'दीपावली' च्या निमित्ताने पहिला अंक – तोही अ–परिष्कृत (अन्–पॉलिश्ड) स्वरूपात हातावेगळा झाला, पाया घातला गेला, पण त्यावरील इमले, माझ्या धकाधकीच्या जीवनामुळे, फुरसतीच्या अभावी, बांधून होऊ शकले नाहीत ! नाना व्याप–तापात मी गुंतलेलो होतो. तथापि एवढ्यात, नाट्यसृष्टीत मला प्रथमतः सुप्रतिष्ठित करणाऱ्या 'ललितकलादर्श' ह्या नाट्यसंस्थेचे अमृतमहोत्सवी वर्ष जवळ आले. 'या वर्षासाठी तरी, 'बावनखणी' ची इमारत यथास्थित उभी करावी' असा प्रेमळ आग्रह 'ल. क. द.' चे मालक नि माझे स्नेही श्री. भालचंद्र पेंढारकर ह्यांनी गेली दोन वर्षे धरला. माझे ज्येष्ठ विद्वान् मित्र चित्रकार गोडसे ह्यांनीही खूप टोचणी लावली. ह्या उभयतांच्या उत्तेजनामुळे, सहकार्यामुळे नि मार्मिक सूचनांमुळेच हे नाटक लिहून झाले. केवळ लिहूनच झाले नाही, तर ते यशस्वीही झाले ! श्री. द. ग. गोडसे ह्यांचा '**मज म्हणती बावनखणी**' हा या पुस्तकात छापलेला लेख त्यांच्या अभ्यासू रसिकतेची साक्ष पटवितो, ह्या नाटकाचे मर्म विशद करतो. श्री. पेंढारकर–अण्णा नि गोडसेसाहेब ह्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ह्याखेरीज नाटकाचे दिग्दर्शक श्री. नंदकुमार रावते, संगीत दिग्दर्शक यशवंत देव, सर्व कलाकार, तंत्रज्ञ नि पडद्यामागील संबंधित कर्मचारी ह्यांचाही मी फार आभारी आहे.

प्रस्तुत नाटक आपुलकीने प्रकाशनार्थ मागितल्याबद्दल कै. केशवराव कोठावळे नि इतक्या उत्तम स्वरूपात प्रकाशित केल्याबद्दल श्री. तुकाराम कोठावळे, श्री. अशोक कोठावळे आणि सर्व 'मॅजेस्टिक' साहाय्यकर्ते ह्यांचा मी ऋणी आहे.

**— विद्याधर गोखले**

५, पारिजात, मकरंद सहनिवास
सेनापती बापट मार्ग
दादर, मुंबई ४०० ०२८

शत्रू असेलही कदाचित् , पण बावनखणीत भेटणारा काम हा मात्र एक रसिक मित्र आहे. या मित्राची ओळख करून घ्यायची तर निर्भय, निःशंक आणि तेवढेच रसिक, दिल्दार आणि सूक्ष्म मन घेऊन येथे आले पाहिजे. सूचना एकच की इथल्या कलाकामिनींच्या हनुस्थानीच्या गोड खळीत पडायला जे राजी नसतील... 'तयांनी मात्र या प्रांती, जपोनि पाय टाकावा !! '

— द. ग. गोडसे

१ कल्याणी, उत्तम हाउसिंग सोसायटी
सेन्ट अँथनी रोड
चेंबूर, मुंबई ७१

# लेखकाचा ऋणनिर्देश

‘बावनखणी’ हे नाटक माझ्या मनात १९६१ सालापासून घोळत होते. ज्यांना ज्यांना मी ह्या नाटकाची मध्यवर्ती कल्पना सांगितली, त्या त्या स्वरराज छोटा गंधर्व, कै. शंकर घाणेकर, कै. दीनानाथ दलाल इत्यादींना ती फार आवडली. चित्रकार दलालांनी तर ह्या नाटकाचा पहिला अंक साग्रह मागून घेऊन, १९६६ च्या ‘दीपावली’च्या अंकात प्रसिद्धही केला. मी ह्या सर्वांचा ऋणाईत आहे.

‘दीपावली’च्या निमित्ताने पहिला अंक – तोही अ-परिष्कृत (अन्-पॉलिश्ड) स्वरूपात हातावेगळा झाला, पाया घातला गेला, पण त्यावरील इमले, माझ्या धकाधकीच्या जीवनामुळे, फुरसतीच्या अभावी, बांधून होऊ शकले नाहीत! नाना व्याप–तापात मी गुंतलेलो होतो. तथापि एवढ्यात, नाट्यसृष्टीत मला प्रथमतः सुप्रतिष्ठित करणाऱ्या ‘ललितकलादर्श’ ह्या नाट्यसंस्थेचे अमृतमहोत्सवी वर्ष जवळ आले. ‘या वर्षासाठी तरी, ‘बावनखणी’ची इमारत यथास्थित उभी करावी’ असा प्रेमळ आग्रह ‘ल. क. द.’चे मालक नि माझे स्नेही श्री. भालचंद्र पेंढारकर ह्यांनी गेली दोन वर्षे धरला. माझे ज्येष्ठ विद्वान् मित्र चित्रकार गोडसे ह्यांनीही खूप टोचणी लावली. ह्या उभयतांच्या उत्तेजनामुळे, सहकार्यामुळे नि मार्मिक सूचनांमुळेच हे नाटक लिहून झाले. केवळ लिहूनच झाले नाही, तर ते यशस्वीही झाले! श्री. द. ग. गोडसे ह्यांचा ‘**मज म्हणती बावनखणी**’ हा या पुस्तकात छापलेला लेख त्यांच्या अभ्यासू रसिकतेची साक्ष पटवितो, ह्या नाटकाचे मर्म विशद करतो. श्री. पेंढारकर–अण्णा नि गोडसेसाहेब ह्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ह्याखेरीज नाटकाचे दिग्दर्शक श्री. नंदकुमार रावते, संगीत दिग्दर्शक यशवंत देव, सर्व कलाकार, तंत्रज्ञ नि पडद्यामागील संबंधित कर्मचारी ह्यांचाही मी फार आभारी आहे.

प्रस्तुत नाटक आपुलकीने प्रकाशनार्थ मागितल्याबद्दल कै. केशवराव कोठावळे नि इतक्या उत्तम स्वरूपात प्रकाशित केल्याबद्दल श्री. तुकाराम कोठावळे, श्री. अशोक कोठावळे आणि सर्व ‘मॅजेस्टिक’ साहाय्यकर्ते ह्यांचा मी ऋणी आहे.

— **विद्याधर गोखले**

५, पारिजात, मकरंद सहनिवास
सेनापती बापट मार्ग
दादर, मुंबई ४०० ०२८

# निवेदन

सुमारे २००० वर्षांपूर्वी संस्कृत साहित्यातील 'भाण' नामक नाट्यप्रकार सर्वसामान्य प्रेक्षकात अत्यंत लोकप्रिय होता. 'भाण' हा मुळात गद्य-पद्ययुक्त एकपात्री नाट्यप्रकार असून त्याचा विषय संपन्न नगरातील वारांगना-वस्तीचे चित्रण हा आहे. अर्थात् शृंगार हा त्याचा मुख्य रस आणि त्याला जोड मुख्यतः विनोदाची. विविध वृत्तींच्या वारांगना, त्यांचे नाना व्यवसायातील नाना वृत्तीचे आशिक आणि त्यांच्या इष्काचे नाना रंग-ढंग प्रेक्षकांना दाखवून, मनोरंजन करणारा हा नाट्यप्रकार. तो पूर्णतः भरतमुनीच्या नाट्य-तंत्राने चालणारा असून, साधारणतः आपल्या तमाशातील पूर्वरंगाशी (गण-गौळण-संगीत बारीशी) त्याचे साम्य आहे. त्याला म्हणण्याजोगते सुसंघटित कथानक नसते.

अशा ह्या 'भाण' नामक नाट्य-प्रकारावर आधारलेले, पण बहुपात्री असलेले, हे आगळ्या नि वेगळ्या धर्तीचे संगीत-नृत्यमय नाटक 'बावनखणी.' द्वितीय बाजीरावाच्या कारकीर्दीतील उत्तर पेशवाईच्या १८०० ते १८१० ह्या कालखंडामधील, पुण्याच्या विख्यात बावनखणीचे ४ तासात जुळेल तेवढे दर्शन घडविण्याचा प्रयत्न ह्या नाटकात केला आहे. अर्थात् हे सांगोपांग दर्शन आहे असा दावा नाही.

त्या काळच्या समाजातील सुज्ञजनांची कामशक्तीकडे पाहाण्याची वृत्ती विटकी नव्हती, विकृत नव्हती, तर निरोगी होती. 'काम हा शत्रू नव्हे, तर धर्म - अविरोधी काम हा रसिकत्व फुलविणारा मित्र आहे' अशीच त्यांची धारणा होती. म्हणूनच बावनखणीकडे 'हीन विषयसुखाचा उकिरडा' म्हणून ते पाहात नव्हते, तर संगीत-नृत्यादि कलांचे निधान म्हणूनच सुज्ञ सुसंस्कृत माणसे या गणिका-वस्तीकडे पाहात होती, ही विचार-धारा ह्या नाटकात अनुस्यूत आहे. नेहमीच्या पद्धतीचे हे सुश्लिष्ट बांधणीच्या कथानकाचे नाटक नव्हे, तर १० प्रसंगातून घडविलेले 'बावनखणी-दर्शन' आहे. जणू काही 'बावनखणी' हीच या नाटकाची नायिका आहे, हे लक्षात ठेवूनच रसिकांनी ह्या वेगळ्या शैलीच्या नाटकाची रंगत लुटावी ही विनंती.

# अंक पहिला
## दृश्य पहिले

(पडदा उघडताच, परिपार्श्वकासह सूत्रधार नांदी म्हणतो —
नांदी चालू असताना जाळीच्या पडद्याआड बावनखणीचे दृश्य दिसते.)

**वंदन रतिरमणा मनहर कामदेव मदना**
**नसुनी शर ते खरतर त्याचे जिंकी जो भुवना**
**जरी जाळिले सदाशिवाने**
**अनंग होउन त्या वीराने**
**रंगविले शतरंग उधळुनी रसिक–रंग–सदना**
**याचे सुटता तीर सणासण**
**वदति तपोधन व्याकुळ होउन**
**'जळो जळो ते जपतप–साधन, मिळो चंद्रवदना!'**

(नांदी पूर्ण होताच मूर्तिमती बावनखणी प्रवेश करते.
नृत्यातूनच 'मदन–वंदना' पेश करते अन् रसिकांना त्रिवार मुजरा करून म्हणते :)

बावनखणी : मी पुणे शहराची बावनखणी. इष्काचे गुल्चमन फुलविणारी राणीच मी. रसिक रंगेल यारांनो, या! तुमचं मी स्वागत करते. जवानीच्या हिरव्या रंगानं सजली आहे माझी एकेक हवेली. जोबनवंतींचे जोबन वारंवार घासले गेल्यानंच की काय, या हवेल्यांच्या खिडक्यांचे नक्षीदार कठडे कसे गर्वानं चकाकत आहेत पाहा! इष्कबाजांच्या अधीर हृदयाप्रमाणे, हिरवेगार मखमली पडदे या खिडक्यांवर लोंबताहेत! पण माझ्या या खिडक्यांना खरी शोभा येते, त्यात कामातुर कामिनी उभ्या राहातात तेव्हाच. भव्य चौकटीत सुरेख चित्र शोभावं, तशा देशोदेशीच्या सुंदर कलावंतिणी या खिडक्यात शोभून दिसतात! पाहा, पाहा – कुणी पुण्याच्या, कुणी गोमंतकाच्या, कुणी कोल्हापूरच्या, कुणी लखनौच्या, कुणी हैदराबादेच्या, कुणी कर्नाटकच्या! पाहा, फुलांच्या माळांनी आणि चंदनी धूपांनी माझ्या माड्या दरवळल्या आहेत – जणू सुगंधी निःश्वास सोडताहेत! इथे अधरांची साखर, मिठीची मिठाई, सुखाचे साखरदाणे, कधीकधी जिंदगी गहाण ठेवूनच मिळवावे लागतात! अशी आहे मी पुणे शहराच्या नाकातली चमकदार नथणी! मला म्हणतात बावनखणी!

मी रूपवंत देखणी – मज म्हणती बावनखणी
रति–युद्ध रोज खेळते झुंजार सुरत–रंगिणी
घरदार सहज सोडून, कितिक धनवान, होति कुरबान
माझिया चरणीं – मज म्हणती बावनखणी ॥ १ ॥
मी गाते होरी–ठुमरी, बेभान धुंद लावणी
क्षेत्रात माझिया होते, नित इश्काची पेरणी
मी काम–सुखाची खाण, माझे यजमान, हजारो जाण
माझिया भजनी—मज म्हणती बावनखणी ॥ २ ॥
मी दिलावरी रोखता, या नैनांच्या संगिनी
मदमस्त इष्कियारांच्या, घायाळ होत पलटणी
किति एक थोर सरदार, मदन–माजोर, केले मी ठार
मिठी मारुनी – मज म्हणती बावनखणी ॥ ३ ॥

(असे गीत म्हणून ती मूर्तिमती बावनखणी – ती नटरंगी नार – ठसक्यात निघून जाते. तोच खंडोशंकर प्रवेश करतो. खंडोशंकरच्या हाती फुलांच्या साजांची, गजऱ्यांची करंडी.)

खंडोशंकर : सखये बावनखणी – मदनाचे चांदणी
सखे, तू रम्य रसिक रागिणी
धन–दौलत जरि उधळती, नच मूढ तुला जाणती
असशि तू कला–चतुर कामिनी

(वरील गीतखंड म्हणून खंडोशंकर जाऊ लागतो, तोच, जणू प्रेक्षकातून कुणी तरी 'तुम्ही कोण?' अशी पृच्छा केली आहेसे समजून तो थबकतो नि त्यांच्याकडे वळून उद्‌गारतो –)

काय म्हणता? मी कोण? सांगतो, सांगतो. मी या बावनखणीचा रसिक राखणदार! माझं नाव खंडोशंकर. मी आहे श्रीमंत बाजीराव पेशव्यांचा इमानी चाकरदार. नेकदार, नेकजात नृत्य–संगीताचा अन् सौंदर्याच्या नजाकतींचा जाणकार! तुम्हास मी सांगतो की, ही बावनखणी म्हणजे केवळ मदनाची मंडई नव्हे, की संगीताची सराई नव्हे! ही आहे कामदेवाची यज्ञभूमी आणि नृत्य–संगीताची, गायन–वादनाची, राजस रसीलेपणाची कर्म–भूमी! म्हणून म्हणतो, रसिक भ्रमरांनो, या! कामदेवाचे शतरंग पाहायला माझ्याबरोबर या...काय म्हणता? काम हा भयंकर शत्रू आहे? आहे, पण तो मूर्खांचा, अरसिकांचा! अहो, 'धर्माला अविरोधी असलेला काम तो मीच' अशी साक्षात् भगवंतांनी गीतेत ग्वाही दिली आहे. मग या बावनखणीत – ह्या कामदेवाच्या सरकारी कचेरीत – शहाण्या सज्जनांनी कामवासनेला शत्रुस्थानी मानण्याचं कारण काय? या, माझ्याबरोबर या, आणि पाहा इथले बहुरंगी कामविलास. पाहा इथली

कलेची ईमानदारी नि ईमानदारांची कला!...
काय म्हणता ? तुम्हाला या बावनखणीत येताना कुणी पाहिलं तर ? अहो, तुमच्याकडे पाहायला इथे सवड आहे कुणाला ? जो तो आपल्याच रंगात दंग! चला...
— छे: छे: छे: ! असं विचकतविचकत नि लपतछपत नाही यायचं ! सद्भावनेनं या. रसिकतेनं या. निर्भयतेनं या. बावनखणीच्या अनेक खणातून फिरवून आणतो तुम्हाला. चला बावनखणीच्या दर्शनाला!...
(खंडोशंकर जायला निघतो, तोच विरुद्ध बाजूने सावकारपुत्र श्रीधरपंत प्रवेश करतो.)

श्रीधर : नमस्कार, खंडोशंकरजी, नमस्कार! (पायाला हात लावून) आपल्या दर्शनानं आम्ही धन्य जाहलो.

खंडोशंकर : वाहवा! या बावनखणीत पुरुषाच्या दर्शनानं धन्य होणारे तुम्हीच पहिले महापुरुष भेटलात! ते असो – पण श्रीधरपंत, आज इकडे कुणीकडे पायधूळ झाडलीत? (श्रीधरपंत बोलत नाही.) अहो सावकारनंदना, ब्राह्मणोत्तमा, आपण इकडे कशी पायधूळ झाडलीत ?

श्रीधर : (वैतागाने) अहो, तिनं तिकडे लाथ झाडली, म्हणून आम्ही इकडे पायधूळ झाडली! तुमची ती लाडकी चंद्रा आहे ना, तिच्याकडे...

खंडोशंकर : (रुष्ट स्वरात) काय ? माझ्या चंद्राकडे ? तिच्याकडे काय काम ?

श्रीधर : तिच्याकडे काही नाही. ऐकून तर घ्या. तुमच्या शोधार्थ तिच्याकडे गेलो होतो. कारण तुम्ही श्रीमंतांचे गजरेवाले माल्दार, बावनखणीचे प्रमुख राखणदार, म्हणूनच आमच्यासारख्यांना तुमचा आधार !

खंडोशंकर : कळलं. स्तुती पुरे. भानगड काय झाली ते सांगा अगोदर.

श्रीधर : कसं सांगू ? जरा लाज वाटते हो.

खंडोशंकर : काय ? लाज ? आणि ती तुम्हाला ? कामातुराणां न भयं न लज्जा! इष्काची जयाला खाज, तये न धरावी लाज! जो आधी लाज कोळून पितो, त्यालाच गणिकांची अधरसुधा प्यायला मिळते!

श्रीधर : मला अधर नको अन् सुधाही नको!

खंडोशंकर : अजबच दिसता! अधर नको, सुधा नको, सुधासुद्धा नको! मग या बावनखणीत हवं तरी काय ?

श्रीधर : प्रायश्चित्त! मजकडून घडलेल्या महान् पातकाबद्दल प्रायश्चित्त!

खंडोशंकर : पातक ? कसलं पातक ?

श्रीधर : ती चंपा नायकीण आहे ना ? तिच्यावर आम्ही झालो मुश्ताक. तिच्याकारणे बहुत धनसंपदा वेचली...

खंडोशंकर : मग यात पाप ते कसलं ? चंचल लक्ष्मी बावनखणीत खर्च होणं हा समसमा

संयोगच झाला की !

श्रीधर : बोडक्याचा संयोग ! म्हणजे आमच्या मस्तकाचा अन् तिच्या पायाचा योग !

खंडोशंकर : म्हणजे तिनं तिच्या चरणकमलानं तुमचं शिरकमल चेपलं की काय ?

श्रीधर : एवढं कुठे आहे आमचं भाग्य ! अहो, तिनं आमचं मस्तक चेपलं नाही, तर तुडवलं ! शंभर होनांच्या थैलीसह आम्ही आमचं मस्तक शेंडीसकट तिच्या पायांवर ठेवून नम्र विनवणी केली. पण तिनं मस्तकावर लाथ मारली हो —

खंडोशंकर : अरेरे ! तुमच्या उत्तमांगावर तिच्या अधम अंगाचा आघात ? श्रीमंतांच्या मर्जीतले तुम्ही सावकार. तरी तुमच्या ह्या शेंडीभूषित डोईवर तिचा लत्ताप्रहार !

श्रीधर : होय हो. आणि वर म्हणाली — मी फक्त जलसे करणारी कलावती आहे. शरीराचा बाजार मांडणारी कलावंतीण नाही. तरीही आम्ही धीर न सोडता, पुनःश्च हरि ॐ म्हणून तिची वारंवार मनधरणी केली. पण ती बधली नाही. तिनं पुनश्च मस्तकी लाथ हाणली !

खंडोशंकर : शांतं पापम् , शांतं पापम् ! छेः छेः छेः ! आजकाल कलावंतिणींना ही फार वाईट खोड जडलेली दिसते. जिनं वस्तुतः गोड गोड मुरका मारायचा, किंवा खोडकर डोळा मारायचा, किंवा संगीताची एखादी लकेर मारायची — तिनं लाथ मारली !

श्रीधर : केवळ मस्तकावरच नाही, तर या संजाबदार शेंडीवर ! शेंडी म्हणजे ब्राह्मण्याची ध्वज—पताका ! ती ज्यावर फडफडते आहे, त्या मस्तकावर…

खंडोशंकर : त्या मस्तकावर मी आताच चमेलीचं तेल चोळण्याची सोय करतो.

श्रीधर : नको ! ती चमेली नको, ती चंपा नको, ते चेपणं नको, अन् ते चोळणंही नको — आता पाहिजे फक्त प्रायश्चित्त ! मग पाहाता ना माझ्या प्रायश्चित्ताचं ?

खंडोशंकर : तुमच्या प्रायश्चित्ताचं मी काय पाहाणार पंत ? अहो मी ब्राह्मण असलो तरी पेशानं आहे गजरेवाला ! माझ्यापेक्षा शतपट विद्वान् ब्राह्मण, विद्वान् शास्त्रवेत्ते ह्या पुण्यात आहेत…

श्रीधर : आहेत, आहेत — पण काय सांगू तुम्हाला ह्या पुण्यपत्तनस्थ विद्वानांच्या एकेक तऱ्हा ! प्रथम त्या दशग्रंथी वैय्याकरणाचार्यांकडे गेलो.

खंडोशंकर : कोण ? आपले व्याकरणाचार्य मोरशास्त्री ?

श्रीधर : होय. तेच ते जडजंबाल महापंडित.

खंडोशंकर : असू देत, असू देत. पण त्यांनी निर्णय काय दिला ?

श्रीधर : दिला काही तरी थातुरमातुर निर्णय, माझ्या पैशाचा चुराडा नि प्रायश्चित्ताचे हालहाल करून ! त्यांनी आधी व्याकरणातील अवघड सूत्रांचा नि कठीण समासांचा मारा माझ्यावर केला ! जणू माझं प्रायश्चित्त त्यांनी संस्कृत भाषेत बुचकळून काढलं ! तेव्हा मी म्हणालो — तुमची ही अवघड भाषा सहन करण्यापेक्षा, गणिकांच्या लाथा खाणं परवडलं ! साध्या प्राकृतात सांगा !

खंडोशंकर : त्यावर काय म्हणाले ते शास्त्रीबुवा ?

श्रीधर : म्हणाले – आधी भरपूर दक्षणा घेऊन मगच ते म्हणाले, साहुकार श्रीधरपंत! समस्त श्रुति–स्मृति आम्ही अवधानपूर्वक नेत्रविषय केल्या. तथापि, त्या श्रुति-स्मृति-सागरात तुमच्या लत्ताभक्षक पातकाची निष्कृती करणारं कोणतंही प्रायश्चित्त दिसलं नाही. कारण त्या काळचे पुरुष असे लत्ताभक्षक ऊर्फ लाथाखाऊ नव्हते !...

खंडोशंकर : उत्तम ! उत्तम ! त्या विद्वान् व्याकरणाचार्याला शोभेसंच हे दशग्रंथी उत्तर आहे ! छान छान !

श्रीधर : अहो छान छान काय ? प्रायश्चित्त नाही म्हणून चित्त शांत होत नाही. काय सांगू खंडोशंकरजी ! दररोज रात्री आमच्या कुळाचे आद्य पुरुष माझ्या स्वप्नात येऊन मला बजावतात – ‘ श्रीधरा ! कुलांगारा ! प्रायश्चित्त घे, प्रायश्चित्त घे. आपल्या थोर कुळात गणिकेच्याच काय, पण गरतीच्यासुद्धा लाथा खाण्याचं पाप कधीही घडलं नव्हतं !’... खंडोशंकरजी, एका बाजूला स्वप्नात आलेल्या पूर्वजांचे शिव्याशाप आणि दुसऱ्या बाजूला गणिकेच्या लाथा खाल्ल्याचं पाप, अशा दुहेरी आपत्तीत विकल होऊन उपायाच्या शोधार्थ आम्ही एका महंताच्या कच्छपी लागलो.

खंडोशंकर : कोणते महंत ?

श्रीधर : ते हो– श्रीमंत बाजीराव पेशव्यांचे आश्रित. वेश्या–उद्धारक, वारांगना–कल्याण-कारण, वशीकरण–विद्या–पारंगत, राममंदिर मठाचे महंत.

खंडोशंकर : म्हणजे महंत महाबळेश्वर ? त्या वेश्या–उध्दारकानं काय निर्णय दिला ?

श्रीधर : अंतिम निर्णयाच्या शोधार्थ समाधीत जाण्यासाठी, आधी आमच्याच खर्चानं त्यांनी यथेच्छ मदिरापान केलं ! आणि नंतर अंतराळात नजर रोखून ते सूक्ष्मात गेले अन् बोलते झाले —

खंडोशंकर : सूक्ष्मात गेले आणि काय बोलते झाले ?

श्रीधर : ज्याअर्थी श्रुति–स्मृतीत तुमच्या पातकाला प्रायश्चित्त नाही, त्याअर्थी बावन-खणीमधील प्रमुख दलालांची, म्हणजेच वेश्याशास्त्रपारंगत मध्यस्थांची, पंचायत भरावणेच योग्य ! असं म्हणून तारवटलेले डोळे त्यांनी उघडले आणि एका पोतडीत हात घालून, ताईत आणि गंडा काढून, माझ्या हातात ठेवला.

खंडोशंकर : तो कशाला ?

श्रीधर : मला लवकर प्रायश्चित्त देण्याची सद्‌बुद्धी मध्यस्थांना व्हावी म्हणून.

खंडोशंकर : मग तुम्ही काय केलंत ?

श्रीधर : ताईत बांधला गळ्यात – अन् गंडा बांधला शेंडीला !

खंडोशंकर : शेंडीला ? तो का ?

श्रीधर : अहो ‘ का ’ काय ? माझ्याकडून आणखीन् द्रव्य उपटून त्यांनीच एका कागदा-

वर हा उपाय लिहून दिला म्हणून ! ( खिशातून कागद काढतो. ) – ऐका उपाय —

**शेंडीच्या झेंड्यास बांध तू मकर–ध्वज–गंडा ।**
**गणिका–लत्ता–वेताळाचा दिल होइल थंडा ॥**
**वेश्या–रक्षा–ताइत बांधुन हो तू निश्चिंत ।**
**मिळेल मग ते झटपट तुजला योग्य प्रायश्चित्त ! ॥**

हाच तो रात्रभर शेंडीला बांधलेला मकरध्वज–गंडा अन् गळ्यात घातलेला वेश्या–रक्षा–ताईत ! कवडीचा गुण नाही म्हणून काढून टाकला !

खंडोशंकर : वाहवा ! म्हणजे तुमच्याकडून भरपूर द्रव्य उपटून त्या मोरशास्त्र्यानं तुम्हाला शेंडी लावली आणि या वेश्या–उद्धारक महंतानं गंडा घातला म्हणायचा ! पण काय हो श्रीधरपंत, जिच्यामुळे हा सारा प्रसंग तुमच्यावर गुदरला, त्या लाथाळ वयेला तुमची विनंती तरी काय होती ?

श्रीधर : अगदी साधी. सात्त्विक ब्राह्मणाला शोभेशी विनवणी —

**मी शुचिर्भूत ब्राह्मण, दे ग रतिदान**
**आजला पुण्य–पर्व–काळी**
**मज सुरत–यज्ञ साजरा कराया दे काया कवळी ॥ ध्रु. ॥**
**तव रूप चकाकित ऐना—माशुक मैना**
**तू बावनखणिचा गहिना—गजगमना**
**का उगाच ‘ ना ’ ‘ ना ’ म्हणसी ब्राह्मणा या मंगल वेळी ?...**
**दे आलिंगन–भोजना—गुणिजना**
**दे अधरपान–चुंबना––दक्षिणा**
**तुज मिळेल मग ते महापुण्य, तू मदनाची पुतळी ...**

अशी होती विनवणी. पण कसलं काय ! तिनं हाणला पाय ! आता कोणता उपाय ? खंडोशंकरजी, बावनखणीतील सर्व मध्यस्थ, तुम्हाला श्रीमंतांच्या मर्जीतले विद्वान् ब्राह्मण म्हणून मान देणारे, म्हणूनच मी तुमच्याकडे...

खंडोशंकर : आलं लक्षात. सर्व मध्यस्थमहर्षींची पंचायत भरवितो चार–पाच दिवसात. आणि ...

श्रीधर : छेः छेः ! चार–पाच दिवस फार झाले. अहो, पाच दिवसात आमच्या कोपिष्ट पूर्वजांच्या स्वप्नातील धमक्यांनीच आम्ही पंचत्वात विलीन होऊ ! आमचे चित्त बहुत श्रमी झाले आहे हो ! तेव्हा आजच्या आज होऊन जाऊ द्या. पंचायत–खर्चाची चिंता नको. ही घ्या शंभर मोहरांची थैली. ( थैली देऊ लागतो. )

खंडोशंकर : ( थैली अव्हेरीत ) जरुरी नाही. पंचायत-खर्चाची पंचाईत नको.

श्रीधर : नाही, तसं नाही — पण १०० मोहरा कमी वाटत असतील तर ( दुसरी थैली काढून ) या आणखी १०० मोहरा घ्या — पण काम जल्दीनं करा. ( दोन्ही थैल्या

खंडोशंकरच्या पायावर ठेवू लागतो. )

खंडोशंकर : उठा, उठा श्रीधरपंत. हे सारं आवरा. नाही तर त्या वयेनं केलेला उत्ता-प्रयोग चुकून माझ्याकडून घडायचा ! जा, निर्धास्त जा. सावकार, मैत्रीचा व्यवहार निर्व्याज असावा ! नमस्कार –

( श्रीधरपंत प्रतिनमस्कार करून, गुणगुणत, डुलत निघून जातो. तो निघून गेल्यावर, प्रेक्षकांना – )

हा श्रीधरपंत सत्कार्यासाठी फुटकी कवडी खर्चणार नाही, पण बावनखणीतल्या बायांसाठी मात्र... जाऊ द्या – त्याचं कर्म आणि प्रायश्चित्त त्याच्यापाशी ! आपण कबूल केल्याप्रमाणे बावनखणीच्या पंचायत–मध्यस्थांना निरोप धाडावा.

( असे म्हणून खंडोशंकर जाऊ लागतो, तोच होनाजी बाळाचा एक तरुण शिष्य सुखदेव गुरव त्याला हाक मारतो–अहो काका, अहो, खंडोशंकरकाका –– )

खंडोशंकर : ( मागे वळून ) कोण, सुखदेव ? अरे तू ऽ ऽ इकडे बावनखणीत कुणीकडे ?

सुखदेव : कर्नाटकच्या स्वारीवर !

खंडोशंकर : म्हणजे त्या वसंती वेळगावकरच्या माडीवर ?

सुखदेव : होय, त्याच माडीवर, आणि त्याच स्वारीवर – कर्नाटकी दाक्षिणात्य संगीताची खंडणी वसूल करायला !

खंडोशंकर : खंडणी वसूल करायला ती माडी बहुत खतरनाक. तिथे जे जे चढले ते ते उताणे पडले ! संगीताची खंडणी वसूल करायला जाशील,नि यौवनाचा महसूल देऊन बसशील !

सुखदेव : अशक्य ! अगदीच अशक्य ! शंकरकाका, मी कुणाचा शिष्य आहे हे माहीत आहे ना तुम्हाला ?

खंडोशंकर : माहीत आहे ! माझ्या परमप्रिय मित्राचा, शाहीर होनाजीचा शिष्योत्तम तू. पण सुखदेवा, त्या होनाजीनंच लावणीत म्हटलं आहे – ‘ या इष्काच्या पायी बुडाले कैक लक्षापती : खंडीमध्ये तू एक पाव रती. ’ म्हणूनच तुला...

सुखदेव : पण काका, त्याच होनाजीरावांच्या ‘ घनश्याम सुंदरा श्रीधरा ’ या भूपाळीच्या पवित्र शब्दांनी आणि सुरांनी न्हाऊन निघालेला मी तुम्हाला सांगतो, इष्कात पाव रतीही न बुडता, खंडणी वसूल करून तिला नमवीन, तरच गुरूचं नाव सांगीन !

खंडोशंकर : तुझी ईर्षा, आत्मविश्वास उत्तम आहे. पण, ही वसंती किती बनेल नि विलंदर आहे याची तुला –

सुखदेव : असे ना ती बनेल, विलंदर. नागीण जहरी असली तरी तिच्या मस्तकातला मणी जहरी नाही ! कोळशाची खाण खराब असेल, पण तिच्यात सापडणारा हिरा खराब नाही ! चिखल वाईट असेल, पण त्यातलं कमळ वाईट नाही !

खंडोशंकर : खरं आहे. इथल्या गणिकांची चाल वदचाल असली तरी त्यांच्या गाण्याच्या

चाली बदसूर नाहीत!

सुखदेव : होय ना? मग वसंतीकडे जायला हरकत कोणती?

खंडोशंकर : ही वसंती काटेरी केतकीसारखी आहे. तिच्याजवळ सुरांचा सुगंध असला तरी माणुसकीचा मकरंद मिळेलच असं नाही. म्हणूनच म्हणतो, विनकाटेरी फुलं उपलब्ध असताना मुद्दामहून काटेरी फुलांकडे का झेप घ्यावी?—

ही वसंती बोल बोल म्हणता धन लुबाडते, पण आपलं यौवन आणि गायन कुणालाही देत नाही.

सुखदेव : मला तिच्या रूप—यौवनाशी मुळीच कर्तव्य नाही. काका, या मधुकराचं कलाकौशल्य पाहाच जरा. सुरांचा मकरंद सेवन करून, सुरांची खंडणी वसूल करून, गुरूचं नाव उजळून टाकतो मी !

खंडोशंकर : (अतिशय आनंदाने) जा, जा, खुशाल जा—पण तुझ्या कानात एक गुरुमंत्र सांगतो. (कानात काही तरी कुजबुजतो.) हं, हे लक्षात ठेवून तिच्याकडे जा. जा, बिनधास्त जा, आणि उद्या सांग मला, कुणी खंडणी वसूल केली आणि कशाची ते! (सुखदेव खंडोशंकराच्या पाया पडून वसंतीकडे जातो आणि खंडोशंकर पुष्पसाजांची परडी उचलून आपल्या कामास निघतो. तत्पूर्वी प्रेक्षकांना तो सांगतो — 'पुष्पवतींचे हे फुलांचे साज काही खास खास साजऱ्या ठिकाणी पोहोचते करायला हवेत.' दोन पावले जाऊन व माघारी वळून —) काय म्हणालात? बावनखणीत खास खास ठिकाणं कोणती आहेत? वा राव! हा काय प्रश्न झाला? प्रत्येक रसिक माणसाची अशी खास खास ठिकाणं असतातच—तुमचीही असतीलच की! पण मी तुम्हाला विचारलं का, कोणती आहेत म्हणून? या अशा नाजूक बाबतीत उतावळ चौकसपणानं काम बिघडतं! जरा दमानं घ्या, दमानं घ्या! हं, तर काय म्हणत होतो?.... हा फुलांचा खास साज आहे तिच्याकरता! काय म्हटलंत? ती कोण? ते प्रत्यक्ष दिसेलच की तुम्हाला!

(खंडोशंकर जातो. किंचित् काळोखानंतर वसंतीच्या हवेलीचे दृश्य दिसते.

वसंती रियाझ करीत आहे —)

**गौरी मनहारी गंगाधरा**

**गिरिजाधर—मधुमिलिंद शशिधरा**

**कंठी नर—रुंड-माळ**

**हालाहल अति जहाल**

**तरिही भय निवारी, अभयंकरा**

(गीत संपताच सुखदेव दारावर ठक्‌ठक् करतो.)

वसंती : (रियाझ थांबवून, तंबोरा खाली ठेवून —) पाहा रे कोण आलंय् ते... (तबलजी दरवाजा उघडतो. सुखदेव प्रवेश करतो.)... यावं, यावं सरकार! आपलं एकदाच ओझरतं दर्शन झालंय्—पण तेव्हापासून दिनरात झुरतोय् आम्ही! आपलं नाव?

सुखदेव : माझं नाव सुखदेव गुरव. शाहीर होनाजीरावांचा शागीर्द आहे मी.

वसंती : शागीर्द असाल होनाजीरावांचे, पण सरकार आहात आमच्या दिवाण्या दिलाचे! बसावं सरकार, सांगावं – काय हुकूम आहे ?

सुखदेव : हुकूम इतकाच की, तुम्ही तुमची खंडणी सरकारजमा करावी! तुमची उत्तम मालमत्ता आम्हास द्यावी!

वसंती : सरकार, या बावनखणीतील कायदा जरा वेगळा आहे. इथल्या सुंदर नारी मालमत्ता अथवा खंडणी देत नसतात, खंडणी घेत असतात! इथे आम्ही रंगेल रसिकांकडून आधी मोहरा मोजून घेतो, अन् नंतरच आमचा चेहरामोहरा देतो, सारा देह देतो!

सुखदेव : वसंती, ते देहाचे दास नि चेहऱ्यामोहऱ्याचे बंदे गुलाम वेगळे आणि आम्ही होनाजीरावांचे शागीर्द – या बावनखणीचे शिलेदार – वेगळे!

वसंती : नाराज होऊ नका गडे! अहो, आम्ही सोन्या–चांदीची, पैशाअडक्याची खंडणी नाही दिली, तरी जवानीची खंडणी देऊ की तुम्हाला!... या, आधी हे रंगतदार पान खा, रंगतदार सारीपाट खेळा, अन् मग रात्रभर तारुण्याची खंडणी वसूल करा!

सुखदेव : आम्हाला तुझ्याकडून कोणती खंडणी हवी, कोणती मालमत्ता हवी, हे लक्षात आलं नाही तुझ्या ? तर मग ऐक –

दो दिवसांची तुझी जवानी, तिची खंडणी नको अम्हाला
क्षणभंगुर ही रूप–संपदा, मोह तिचाही नसे मनाला
जे ओसरते, खंगुन जाते, यौवन–धन ते हवे कुणाला ?
अवीट सुंदर तव गीतांचा – धुंद सुरांचा – छंद जिवाला

वसंती : वाई वाई वाई! मी समजले होते की, खंडणी म्हणजे पैसाअडका! फार तर शय्यासंगत! पण आत्ता कळलं की तुम्हाला माझं गाणं हवं आहे.

सुखदेव : हो, आत्ताच जे घटकाभरापूर्वी इथे चाललं होतं, तेच तुझ्या घराण्याचं गाणं मनमुराद ऐकायचं आहे मला!

वसंती : धन्य, धन्य सुखदेवजी! माझ्या यौवनाऐवजी माझं गायन चाहणारे तुम्ही पहिलेच्च वेडे भेटलात मला!

सुखदेव : पण हे वेड लावलं कानी पडलेल्या तुझ्या ओझरत्या स्वरांनी!...हं, चल सुरू कर ते तुझं गायन.

वसंती : सुरू करते, पण...

सुखदेव : पण काय ?

वसंती : शृंगारात जशी गात्रं, तशी संगीतात गोत्रं जुळावी लागतात! तुमचं–आमचं गोत्र एक नाही.

सुखदेव : म्हणजे ? काय म्हणायचंय तुला ?

वसंती : सरकार, माफ करा स्पष्ट बोलल्याबद्दल. जे आमचं शास्त्रीय दक्षिणी संगीत जाणू शकतात, त्यांनाच ते ऐकवते मी. सरकार, ह्या दुनियेत प्रत्येक गोष्ट प्रत्येकासाठी नसते· हरेक गोष्टीचे आशिक वेगवेगळे असतात, जाणकार वेगवेगळे असतात.

सुखदेव : म्हणजे ? मी तुमचं दक्षिणी संगीत समजू शकणार नाही, असं म्हणणं आहे तुझं ?

वसंती : तसं कुठे म्हटलं मी ? सरकार, रागावू नका.

मला इतकंच म्हणायचंय की, सूर्यकांत मणी सूर्यकिरणांनीच पाझरतो, चंद्रकिरणांनी नव्हे ! त्याउलट चंद्रकांत मणी चंद्राच्या किरणांनीच द्रवतो, तिथे सूर्याचं काऽही चालत नाही !

सुखदेव : कबूल, एकदम कबूल. पण वसंती, तू विसरलीस की, नील विशाल आकाश असं एकांगी नसतं. निळं अस्मान् जेवढं चंद्रकिरणांनी तेवढंच सूर्यकिरणांनी उजळतं ! जेवढं उषेच्या गुलाबी रंगानं रंगतं तेवढंच संध्यारंगानं खुलतं ! जेवढं आषाढातल्या काळ्या मेघांनी, तेवढंच शरदातल्या पांढऱ्या ढगांनी शोभतं !....त्या अस्मानासारखेच आहोत आम्ही होनाजीरावांचे चेले. आम्ही जेवढे लडिवाळ लावणीचे, तेवढेच शास्त्रीय रागिणींचे जाणकार ! म्हणूनच, जशी डफ–तुणतुण्याची मजा आम्ही चाखतो, तशीच मृदंग आणि तंबोऱ्याची महती आम्ही जाणतो !

वसंती : अस्सं ! म्हणजे तुम्ही नुसते तुणतुणं वाजविणारे लावणीकार नव्हे ! तुणतुण्या-प्रमाणेच तंबोऱ्याचीही ओळख तुम्हास आहे तर !

सुखदेव : नुसती ओळखच का ? तानपुऱ्याचं गूढ रहस्यही जाणतो मी !

वसंती : गूढ रहस्य कसलं आलंय् त्यात ? जोडाच्या दोन तारा, खर्जाची तिसरी तार, नि पंचमाची चौथी तार, असा चार तारांचा खेळ नि मेळ !

सुखदेव : हे तर बावनखणीतील कोणतीही गाणारीण सांगू शकेल ! मग तेवढ्यासाठी पंडित कृष्णाप्पांचा गंडा कशाला बांधला पाहिजे ? ऐक, माझे गुरु होनाजीराव काय सांगून गेले ते —

**बाजे झनन झन तानपुरा**
**तार तार झंकारत बोले**
**नाद अनाहत खरा खरा, नाद–ब्रह्म–आनंद खरा ।**
**या नादी जो सदा रंगला**
**तयाचाच भवबंध भंगला ।**
**या संसारी तया लाभला, दिव्य सुधेचा झरा झरा ।**

चल, घे हा तंबोरा आणि ऐकव तुझं नादब्रह्म.

( वसंती विचारमग्न होते. मनातल्या मनात डळमळते. त्याच्यावर फिदा होते.

पण तरीही मूळ प्रवृत्ती एकाएकी नष्ट होत नाही. )

का ? बोलत का नाहीस ? कर्नाटकी कोकिळे, तुझे पंचमबोल ऐकव जरा !

बसंती : ( स्वतःला सावरून — ) जरूर, जरूर ऐकवीन. तुम्ही तुमची थोरवी सिद्धच केली आहे. पण ...

सुखदेव : अजूनही पण आहेच का ?

बसंती : हो. माझा नेहमीचाच हा ' पण ' आहे. पण लावून सारीपट खेळण्याचा. आधी थोडासा जुगार, मग रात्रभर सात सुरांचा शृंगार !

सुखदेव : एवढंच ना ? हरकत नाही. कारण ह्या ' सारीपटा ' तही ' सा ' नि ' प ' आहेच ! म्हणजेच प्रेमसंगीताचा षड्ज–पंचम भाव !

बसंती : बोलण्यात जसं चातुर्य आहे, तसंच ह्या खेळातही चातुर्य दाखवा की ! हं, चला — ( हातातील कवड्यांची खुळखुळ करते. )

सुखदेव : ( कवड्यांकडे पाहात ) हुशार आहेस ! तुझ्या हातातल्या खुळखुळत्या कवड्यांचा नादही मधुर आहे, चतुर आहे, तितकाच कठोरही आहे !

बसंती : ( खुळखुळणे एकदम थांबून — ) या कवड्यांना नाद आहे ? सूर आहे ?

सुखदेव : होय — तुझ्या हातातल्या कवड्यांना विशिष्ट नाद जडला आहे ! माझ्या गुरूंनी कानमंत्र दिला तेव्हापासून, या कवड्यांचा सूरही ओळखण्याची सिद्धी मला प्राप्त झालीय् !

बसंती : ( परत कवड्या खुळखुळून ) अहो सिद्धपुरुष ! नुसत्या शब्दांचा खेळ नको, सुरेल कवड्यांचा खेळ खेळायला सिद्ध व्हा !

सुखदेव : मी सिद्धच आहे. अगदी या सोनसाखळीचा पण लावून खेळायला सिद्ध आहे. मी हरलो असं समजून ही सोनसाखळी तुला आधीच द्यायला सिद्ध आहे !

बसंती : अग बाई ! कवड्यांच्या खेळात तुम्ही हरणार आणि मी जिंकणार, हे तुम्ही कसं ओळखलंत ? — अगदी मनकवडे आहात हं !

सुखदेव : ( रुष्ट स्वरात ) मी मनकवडा तर तू कवडीमोल ! धनाच्या लोभानं तुझा गेलाय तोल ! ( गळ्यातली सोनसाखळी काढून ) घे, घे ही सोनसाखळी. जुगारात जिंकल्या-शिवाय घे — ( तिच्या अंगावर टाकून जाऊ लागतो. )

बसंती : ( कवड्या बाजूला टेवते आणि त्याचा हात धरते. ) एकाएकी इतकं रागवायला काय झालं ?

सुखदेव : ( हात झटक्यात सोडवून ) काय झालं ? स्वतःच्या निर्लज्ज मनालाच विचार. बसंती, मी तुझी माडी चढलो ती तुझी खेळातली लबाडी उघड करून, खंडणी वसूल करायला ! इतरांसारखं हात हलवीत परत जायला नव्हे !

बसंती : बाई बाई बाई ! कहर झाला ! सरकार, गंमतीच्या खेळाला लबाडी म्हणता ?

सुखदेव : होय, लबाडीच. ( तिच्या हातातील कवड्या पटकन् हाती घेऊन ) ह्या तुझ्या

कवड्यात लबाडीशिवाय दुसरं आहेच काय ?

वसंती : (जरबेच्या स्वरात –) सरकार, त्या कवड्या आणा इकडे.

सुखदेव : घे, खुशाल घे – पण खोटं दान पडावं म्हणून तू त्यात शिसं भरलंय, हे कबूल कर म्हणजे झालं ! चल, उचल ह्या कवड्या. (कवड्या फेकून देतो.) संगीताच्या रत्नांपेक्षा जिला सारीपटाच्या कवड्या महत्त्वाच्या वाटतात, अशा कवडीमोल कुलटेशी मला कर्तव्य नाही ! (जाऊ लागतो. वसंती दरवाजापर्यंत जाऊन त्याला आडवी होऊन काकुळतीने म्हणते –)

वसंती : थांबा, सुखदेव ! क्षणभर तरी थांबा !

सुखदेव : कशाला ? तुझ्या सोंगट्यांच्या बदचालीला आणि कवड्यांच्या कर्णकटु कठोर सुरांना साथ द्यायला ?

वसंती : नाही, नाही, तुमच्या सूरगंगेत माझ्या लबाडीचं पातक धुऊन टाकायला ! खरं सांगू ? बाहेरून कितीही अवसान आणलं, तरी आतल्या आत मी तुमच्या गायनावर – गुणांवर – फिदा होत होते ...

सुखदेव : खोटं, सारं खोटं ! म्हणे फिदा होत होते ! वसंती, सुरांपेक्षा संपत्तीची हाव बाळगणारी कलावंतीण तू ! सुरगंगेच्या काठी रमणारी कलावती नव्हेस ! तसं नसतं तर ही खेळातली लबाडी – ही बनावटगिरी...

वसंती : तुम्हाला कसं तरी, कुठे तरी, एकदा तरी हरवावं या जन्मजात जिद्दीपायी माझ्या-कडून अगदी नकळत...

सुखदेव : बस्, बस् ! तुझ्या लबाड, लाघवी शब्दांच्या निरर्थक तराण्यानं माझं समाधान होणार नाही. जातो मी.

वसंती : नाही, नाही, काही केल्या मी तुम्हाला जाऊ देणार नाही.

सुखदेव : जाऊ दे. भंगलेली मूर्ती आणि तुटलेली तार कधीच जोडता येत नाही ! ... सोड मला.

वसंती : शपथ आहे तुम्हाला सप्त सुरांची ! (तो तिला ढकलून देतो.) शपथ आहे तुम्हाला तुमच्या गुरूंची – होनाजीरावांची ! शपथ आहे तुम्हाला तुमच्या गान–विद्येची ! (सुखदेव थांबतो.)

**जाउ नको मनरंगा, सुखसदना सोडुनिया**

**मम गायन, हे जीवन अर्पियले मी तव पाया ॥**

**गीतांचा नव–बसंत बहरु दे या समया**

सुखदेव : **फुलवी तू सूर - मळा**

वसंती : **साथ तुझी देइ मला ...**

**स्वर फुलले भाव–बळे**

सुखदेव : **मन माझे मोहरले**

वसंती : **रंग नवा प्रीतीचा**
सुखदेव : **रंगवितो या हृदया**
वसंती : **जाउ नको मनरंगा, सुखसदना सोडुनिया**

(दोघेही ह्या द्वंद्वगीतात रंगतात, नि गीत संपताच आतील दालनात जातात —

## दृश्य दुसरे

(रोशन औरंगाबादकर आपल्या कोठीच्या खिडकीपाशी उभी राहून, आपला रेशमी दुपट्टा चापूनचोपून लपेटत असतानाच, खंडोशंकर प्रवेशतो नि हाक मारतो – )

खंडोशंकर : रोशन्! बिटिया रोशन्!

रोशन : जी चचाजान! खिदमत मे हाजीर हूं! (डोईवरून ओढणी पुढे सरकवीत, पुढे होऊन – ) आईये, तशरीफ रखिये.

खंडोशंकर : बेटा, चश्मेबद्दूर! किती खुबसूरत दिसतेस तू! कशी छान लपेटली आहेस ही गुलाबी ओढणी! तुला ही अशी, दुपट्टा ताणून, उभी पाहिली तेव्हाच एखाद्या जवान आशिकाप्रमाणे रस्त्यावरूनच ललकारणार होतो मी! लेकिन्......

रोशन : लेकिन् क्या? कहिये, कहिये —

खंडोशंकर : अगं, आमचं वय आठवलं नि गप्प राहिलो. तू कमसीन होतीस, ती आता ऐन बहरात आलीस; आणि आम्ही? आमचा बहर आता ओसरत चाललाय्!

रोशन : ऐसा ना कहिये चचाजान! आप तो सदाबहार हो! तो फिर कहिये आप को कौनसा शेर याद आया था? और वो भी यह मेरा रेशम का दुपट्टा देख कर?

खंडोशंकर : रोशन्! तुला या कोठीच्या चौकटीत ही अशी चित्रासारखी उभी पहिली, तेव्हा रस्त्यावरूनच विचारणार होतो –

कोठीमधे इथे तू बाले! उभी कशाला —
तव गर्भरेशमी या ओढून ओढणीला?
का झाकण्यास तुझिया मदमस्त यौवनाला?
की वस्त्रगाळ करुनी निज रूप द्यावयाला?

रोशन : अच्छा जी! तो ये बात है? आपने तो हमारे दिल की बात पहेचान ली!

कोठे पे हम खडे है दोपट्टे को तान के।
हम शर्वते-दीदार पिलायेंगे छान के!

हाये हाये! हम से तो अच्छा है दोपट्टा हमारा! इस लिये तो वो ही हुजूर के नजर मे पहले आया! बडा खुशनसीब है मेरा दोपट्टा!

खंडोशंकर : आहेच तो सिकंदर नशीबाचा! कारण, एक तर तुझ्या छातीवर हा दुपट्टा लोळतो, नाही तर तो पठ्या जॉन्सनसाहेब!.......अगं, खरंच, जॉन्सनसाहेबानं तुझं हे नवीन मकान पाहिलं की नाही?

रोशन : नही. लेकिन् आज और इतने मे ही आनेवाले है वो. मै तो उन्ही के इंतिजार मे हूं.

खंडोशंकर : अच्छा, अच्छा! तुझा चतुराईचा इशारा आला बरं आमच्या ध्यानात! तर मग निघालोच आम्ही. (गजरा देऊन जाऊ लागतो.)

रोशन : अजी नही नही! आप पराये नही है. मेरे और उनके भी जिगरजान हो. चलिये, अंदर चलिये, और देखिये हमारा दीवानेखास!

खंडोशंकर : (खोटा आढावेढा घेत –) अं हं, आम्ही नाही येणार!

रोशन : क्यों? क्या हुआ?

खंडोशंकर : अगं, तुझा आतला रंगमहाल पाहाण्याचा इख्तियार केवळ तुझ्या जॉन्सन-साहेबाचा!

रोशन : (त्याचा हात धरून) चचाजान! मुझसे ऐसी दिल्लगी ना करो!

खंडोशंकर : दिल्–लगी? अरी पगली, तू क्या समझेगी दिल की वातें? अभी अभी तो इस मुल्क मे कदम रख्खा है तूने।—

दिल्–लगी दिल्लगी नही है काफिर
हाय कंबख्त, तुझ को लगी ही नही

रोशन : अच्छा जी, मै काफिर हूं! लेकिन् आप तो अहलेदिल ईमानदार हो? तो चलिये और देखिये मेरे जैसे काफिर का रंगमहेल!

खंडोशंकर : ठीक है, चलिये. देखेंगे तुम्हारे दीवानेखास की खासीयत्!

(खंडोशंकर तिच्यासह आत जातो. तोच हुसेन अत्तार जॉन्सनसाहेबाला घेऊन येतो. हुसेनच्या हाती अत्तराच्या रंगीबेरंगी कुप्या.)

हुसेन : जॉन्सनसाहब, इधर से आईये, इधर से. धिस् धिस् वाजू! ...जॉन्सनसाहब, ये है हमारे रोशनदीदी का नया मकान – नया घर.

जॉन्सन : येस्, येस् मिस्टर हुसेन अट्टार, हम को मालूम है – मखान् न्यू है और मखान्-

वाली रोसन् भी ब्रँड न्यू है.......

हुसेन : हां साब, कोरा माल है – न्यू न्यू ! बिल्कुल न्यू !

जॉन्सन : वट् व्हेअर ?...रोसन्, दि लाइट ऑफ धिस् बावनखनी, किधर है ?

हुसेन : जॉन्सनसाब ! सच तो बात ये है —

जहाँ पैसे की छन्छन्

वहाँ है गुलेरू रोशन् !

जॉन्सन : नो नो, ये बात गलट है ! रोशन सिंपली पैसा के पीछे नही है ! शी ल्व्हज् मी व्हेरी मच् ! बहोट प्यार करती है रोसन, बट यू आर आफ्टर कमिशन् ! सो टेक् धिस्. ( त्याला काही नाणी काढून देतो. ) कीप इट – हम खुशी से देता हूं.

हुसेन : थांक यू ! शुक्रिया ! ....खुदा तुम्हे सलामत रक्खे. ( एक सॅल्यूट मारतो. )

जॉन्सन : थँक यू ! लेकिन किधर है मेरी डार्लिंग ?

हुसेन : अंदर. आप के ही इंतजार मे.

जॉन्सन : व्हॉट ? अंदर ' जार ' है ?

हुसेन : नही, नही, ' इंतिजार ' याने की तुम्हारी राह देखती है। रोशन् तुम्हारी डारलिंग, वेटिंग वेटिंग !...

जॉन्सन : नाइस ! नाइस ! व्हेरी नाइस् !

( जॉन्सन आत जाऊ लागतो, तोच खंडोशंकर प्रवेशून म्हणतो )

खंडोशंकर : नमस्कार जॉन्सनसाहेब !

जॉन्सन : नमस्शार, नमस्शार – खंडोशॉंकर ! व्हेरी ग्लॅड टु मीट यू ! बाजीरावसाहिबाच्या हवेलीत आपली गाठ पडली त्या वेळी आपण मला हॅड–गार्लेंड याने गजरा बांधला होता !

खंडोशंकर : तसाच आत्ताही बांधतो. याचा खुशबू घेऊन आपली वाट पाहात असलेल्या आपल्या रोशनच्या रंगमहालात जा —

जॉन्सन : नाइस ! नाइस ! व्हेरी नाइस ! थँक यू ! ( जाऊ लागतो. )

हुसेन : साहब ! हमारा ये बढिया बादशाही अत्तर लगा के अंदर जाईये. चमेली का अत्तर है.

जॉन्सन : ( खंडोशंकरकडे वळून ) चमेली ? हू ईज धिस् चमेली ?

खंडोशंकर : जास्मीन – जास्मीन सेंट !

जॉन्सन : ओ ! आय् सी !

हुसेन : ( अत्तर लावता लावता ) ये इत्र है खुशबूदार चमेली का !

खुश करेगा दिल हुस्नवाली का !

खंडोशंकर : आशिक की आस, नशा जवानी की !

इस मे भरी है, मजा जिंदगानी की !

हुसेन : और, ये फाया भी लीजिये आप के साथ
रोशन को दीजिये प्यार के साथ!

जॉन्सन : थँक यू. (जाऊ लागतो.)

खंडोशंकर : हां, हां – सांभाळून जा. दरवाजा ठेंगणा आहे. टेंगूळ येईल.

जॉन्सन : येस, येस – मालूम है. रोशन का दरवाजा स्मॉल है! (आत जातो.)

खंडोशंकर : काय अत्तारमियाँ? रोजगार कसा काय चाल्लाय?

हुसेन : खुदा परवरदिगार मेहेरबान है!

खंडोशंकर : ठीक आहे, ठीक आहे.... आता मला निघालंच पाहिजे. अजून फुलांचे काही साज शिल्लकच आहेत.

हुसेन : आया खयाल मे. अब चंद्राजी के घर जायेंगे आप. वो चौदहवी का चाँद आप की राह देखता होगा. लीजिये ये दिलबहार अत्तर. (त्याला अत्तर लावतो.)

खंडोशंकर : (दूरवर पाहून –) अरे, हा मदनराव मोहित्यांचा सर्जेराव याच माडीवर येतोय्. हुसेन, त्याची जरा गंमत करू या. होशियार.

(हुसेन मान डोलावतो – अत्तरदानासह बाजूला जाऊन बसतो.)

सर्जेराव : (प्रवेश करून, खंडोशंकरला पाहून –) राम राम खंडोशंकर! तुम्ही आत्ता इथे कुठे?

खंडोशंकर : आणि तुम्ही, रंगूला सोडून इकडे कुठे?

सर्जेराव : रोशनकडे. कुठे आहे ती? (खंडोशंकर उत्तर न देता हुसेनकडे पाहातो.) हुसेनमियाँ, वो दिलबहार कहाँ है?

हुसेन : हाँ, हाँ, दिलबहार अत्तर? लीजिये. बिलकुल असली कनोजी माल है. (अत्तराचा फाया पुढे करतो.)

सर्जेराव : (अत्तराचा फाया फेकून देत) दिलबहार अत्तर नकोय. मला माझी दिलबहार रोशन हवीय. कुठे आहे?

हुसेन : (रागाने) वो जन्नत मे है, और तुम जहन्नुम मे हो!

खंडोशंकर : अहो त्याचा अत्तराचा फाया वाया घालविलात. दोन सुरती शिक्क्यांचं नुकसान केलंत त्याचं.

सर्जेराव : दोन सुरती शिक्क्यांची काय बात? हा सर्जेराव मोहिते शहाण्णव कुळी मराठा, हा शूर शिलेदार, पेशव्यांचा पिढीजात वतनदार, म्हणजे मामुली असामी नव्हे. (हुसेनमियाँच्या अंगावर मोहरा फेकतो.) घे ह्या मोहरा आणि ओत ती कुपी ह्या अंगावर आणि आता बोल – माझी ती दिलप्यारी रोशन ह्या वेळी कुठे आहे?

हुसेन : अंदर है –

सर्जेराव : कमाल है! मग हे आधीच नाही का सांगायचं? (आत जाऊ लागतो.)

खंडोशंकर : (त्याला थांबवून) – हां – हां – सर्जेराव, आत नका जाऊ इतक्यात.

सर्जेराव : का ?

हुसेन : (मध्येच) जो है बंदर, वो कैसे जाये अंदर ?

खंडोशंकर : ती आत फार गहिऱ्या कामात गढली आहे! फार महत्त्वाचं काम चालू आहे आत!

सर्जेराव : महत्त्वाचं काम ?

हुसेन : हां, हां – गहेरा सियासती मामला –

खंडोशंकर : राजकीय कामगिरी! (सर्जेरावाला बाजूला घेऊन) मला असं सांगा सर्जेराव, तुम्ही आहात मराठे—

सर्जेराव : (उसळून) साधे नाही, शहाण्णव कुळी मराठे!

खंडोशंकर : हो, हो – शहाण्णव कुळी मराठे. तुम्ही स्वत:ला तल्वार–बहादुर म्हणविता, पण तुम्ही स्वतः इंग्रज साहेबाची मस्ती जिरविण्याची किंवा त्याच्याशी दोस्ती करण्याची कोशीश कधी केली आहे का ?

सर्जेराव : नाही. कधीच नाही. लढाया–राजकारण हा आमच्या आज्या–पणज्यांचा षौक होता, आमचा नाही. पण खंडोशंकर, या फालतू बाता आत्ता कशाला करताय ? मला अगोदर सांगा, रोशन कोणत्या महत्त्वाच्या कामात गुंतली आहे ?

खंडोशंकर : सांगतो. इंग्रज बहादुराशी दोस्ती करून त्याची मस्ती जिरवण्याच्या बिलकुल मुष्किल कामात मश्गुल आहे ती! मोठं गहिरं राजकारण चालू आहे तिचं आत!

सर्जेराव : चालू दे, चालू दे त्यांच्या राजकारणाच्या गप्पा. आमचा भडकलेला काम शांत करण्याहून कोणतंही काम महत्त्वाचं असूच शकत नाही. कारण आम्ही रोशनच्या दिलाचे बादशहा.

हुसेन : बडे आये दिल के बादशहा! रोशन के तख्ते–दिल पर आप कब सवार हुवे जनाब ?

सर्जेराव : आम्ही केव्हा आणि कुठे स्वार झालो, ह्याच्याशी मतलब काय तुला ? अत्तार-मियाँ, जरा संभल के बात करो.

हुसेन : आप भी संभल के बात कीजिये! और प्यार करना ही है तो खानदानी ढंग से प्यार कीजिये!

खंडोशंकर : सर्जेराव, रोशनचा दिल म्हणजे खुली सराई वाटली की काय तुम्हाला ? की जिथे कोणत्याही उल्लू जवानानं यावं अन् बादशहा म्हणून आपला बिस्तरा पसरावा ? आपल्या शहाण्णव कुळी खानदानाला शोभेल असे वागा जरा—

सर्जेराव : खानदानी गेलीऽऽ....बावनखणीत....! खानदान बिनदान सब झूट आहे!

हुसेन : अरे – ये क्या बकवास कर रहे हो ? आप के खानदान पिताजी को ये बेवकूब बकवास मालूम हो गई तो ?

सर्जेराव : माझा बाप खानदानी ? आजोबांचा सारा पैसा आणि खानदानी बावनखणीच्या खणात घालणारा माझा बाप ! बावनखणीच्या हवेलीत हवा खायला जातो आणि जोडे खाऊन परत येतो ! तरीही ज्याला लाज नाही, त्या बेवकूब, बेशरम बापाला भितो कोण ?

( इतक्यात सर्जेरावचा बाप मदनराव मोहिते प्रवेश करतो. )

मदनराव : ( तावातावाने ) निर्लज्ज, नादान, सर्ज्या – ! माझी लाज काढतोस हरामखोरा ?

सर्जेराव : हरामखोरी ती काय केली ? खरं तेच बोललो मी ! आणि मला नादान, हरामखोर म्हणताय – मग तुम्ही हो कशाला आलात या रोशनच्या माडीत ? भजन म्हणायला की हरिकथा–निरूपण करायला ? सांगा ना, कशाला टपकलात इथे भुतासारखे ?

मदनराव : तुझ्या मानगुटीवर बसायला ! चालता हो इथून ! माझ्या सुखाच्या कबाबातलं हाडूक होऊ नकोस –

सर्जेराव : तुम्हीही माझ्या सुखात विष कालवू नका. जा – दुसरीच्याकडे जा.

मदनराव : अरे वा रे वा ! रोशनचे आशिक आहोत आम्ही ! तू कोण मला दुसरीच्याकडे जा म्हणून सांगणारा गद्धा ?

खंडोशंकर : तुमचा लेक ! रोशनवर ज्याचा दिल जडलाय् त्या रोशनचा दिल्दार !

मदनराव : अरे हुडुत् – ! म्हणे रोशनचा दिल्दार ! याचा खूप जडला असेल, पण तिचा दिल जडायला हवा ना ? खंडोशंकर, याच्यासारख्या वांड पोट्टयाला विचारतो कोण ?

सर्जेराव : मी वांड असलो तरी तरणाबांड आहे ! माझ्यासारख्या जवानावरच फिदा होईल रोशन — तुमच्यासारख्या थेरड्यावर नव्हे !

मदनराव : भ्रम आहे तुझा भ्रम ! तुम्हा अनुभवशून्य मूर्ख पोरांना हेच तर कळत नाही. अडाणी तरण्याबांडाहून अनुभवी म्हातारी खोडंच नारींना आवडतात ! — काय खंडोशंकर ?

हुसेन : यह तो खूब कही मदनराव !

खंडोशंकर : बरोबर आहे तुमचं मदनराव. जवान पोरींना जवान पोरांपेक्षा बुड्ढेच पसंत पडतात !

मदनराव : अलबत् ! पण या गाढवाच्या लेकाला माझे हे अनुभवाचे बोल पटत नाहीत. सर्ज्या, गधड्या, जा, चालता हो इथून.

सर्जेराव : नाही जाणार. पोराच्या तोंडचा गोड घास काढून घेणारे तुमच्यासारखे बेशरम बाप पाहिले म्हणजे असं वाटतं, असं वाटतं ... पण जाऊ दे —

मदनराव : जाऊ कशाला दे ? बोल, दिवट्या, बोल—काय वाटतं तुला ? बोल !

सर्जेराव : वाटतं – माझ्यासारख्या सर्व दुःखी पोरांची पलटण तयार करावी अन् परशुरामानं जशी साऱ्या उन्मत्त क्षत्रियांची कत्तल केली, तशी या दुनियेतल्या तमाम बापांची कत्तल करावी ! एकही बाप शपथेलाही शिल्लक ठेवू नये !

मदनराव : ऐका खंडोशंकर, ऐका ह्याची मुक्ताफळं ! अरे सर्ज्या, कोणी ना कोणी बाप नसता तर ही रोशन पैदाच कशी झाली असती ? आणि तिच्या खातर माझा पैसा उधळायला तू तरी कसा जन्मला असतास ?

सर्जेराव : जन्माला कसा आलो ? उघडच आहे ! तुमचा षौक झाला, म्हणूनच माझा जन्म झाला ! त्याला माझा काय इलाज ?

मदनराव : चूप बैस ! तोंड वर करून आणखी एक शब्द बोल्लास तर मुस्काड फोडून टाकीन. ( अंगावर धावून जातो. )

हुसेन : ( मध्ये पडून ) खामोश ! खामोश ! तुम्हारा बाप-बेटे का झगडा खतम करो. रोशन बेगम अंदर है, और वो...

मदनराव : ( हुसेनचे वाक्य पूर्ण होण्याआधीच, उतावीळ स्वरात – ) काय, रोशन आत आहे ? मग आत्ताच तिला बाहेर घेऊन येतो.

खंडोशंकर : थांबा, थांबा मदनराव ! ( इतक्यात दरवाजा उघडला जातो. जॉन्सन व रोशन हातात हात घालून बाहेर येतात. )

हुसेन : देखिये, देखिये ! जहाँ बुलबुल, वहाँ गुलशन !
जहाँ रोशन, वहाँ जॉन्सन् !

खंडोशंकर : तुम्ही लोक आपसात झगडता आणि साहेबाचा फायदा होतो. दोघांचा झगडा, तिसऱ्याचा लाभ !

जॉन्सन : झगडा ? मीन्स् कॉरल ?...व्हाय ? झगडा कौन कर रहा है ?

हुसेन : साब, ये लोग रोशन के लिये आपस मे झगडते है. ये है मदनराव मोहिते – बडे सरदार. और ये है उनके बेटे सर्जेराव.

जॉन्सन : व्हेरी ग्लॅड टु सी यू ! गुड इव्हिनिंग मिस्टर मदनराव ! गुड इव्हिनिंग मिस्टर श श शर्जेराव !

रोशन : आदाब अर्ज है सर्जेरावजी–मदनरावजी.

मदनराव : ( संतापून ) चूप ! बोलू नकोस काही ! आमच्यासारख्या खानदानी सरदाराला सोडून त्या जलचराशी दोस्ती ?

सर्जेराव : ( चिडून ) ह्या, ह्या परक्याशी शय्यासोबत ?

रोशन : जनाब, आप को क्या इख्तियार है मुझे पूछने का ? कौन अपना और कौन पराया ? जो कुर्बान हो कर हमे खुष रखेगा, वो ही हमारा—ये साहब के जैसा. ये हमे उन की बीबी बनाकर विलायत ले जानेवाले है.

मदनराव : साहेब, आपण हिच्याशी शादी करणार ?

सर्जेराव : खरंच, हिला विलायतेला नेणार ?

जॉन्सन : ऑफ कोर्स ! ही रोशन आमचा हार्ट आहे ! लई लई स्मार्ट आहे ! नाजूक नखऱ्यांचा मार्ट आहे ! हिच्या नजरेचा ॲरो दिलातला सॉरो खलास करते ! देअर-

फोर, आमी हिला आमच्या कंट्रीला घेऊन जाईन !

हुसेन : बहोत खूब ! बहोत खूब ! —

खंडोशंकर : बावनखणीचा झेंडा विलायतेच्या शेंड्यावर ! पण साहेब, प्रथम हिला आपली इंग्रजी बोली शिकवा, नाही तर बडा घोटाळा होईल. तुम्ही मागाल ‘ किस् ’, अन् ही देईल रताळ्याचा ‘ कीस ’ !

रोशन : नही, नही — जान्सनसाब का कहना मै आसानी से समझ सकती हूं ! मँगो याने आम, गुहावा याने जाम, बोन याने हड्डी, चीक याने गाल !

जॉन्सन : ( गालगुच्चा घेऊन ) ओ येस्, व्हेरी स्वीट माल ! मिस्टर खंडोशॉंकर, इस्काट भासेची डिफिकल्टी नसटेच ! खरं तर इश्क बोलायचा नसटोच, करायचाच असटो !

मदनराव : ( हताश स्वरात ) खरं आहे ! करणारा तो शहाणा, नुसता बोलणारा तो दिवाणा !

खंडोशंकर : ( मदनरावांकडे हात करून ) यांच्यासारखा !

जॉन्सन : मिस्टर मटनराव, टुमी नाराज होऊ नको ! टुमी अन् टुमचा ह्यो पोरग्या, ह्यांच्यात आता रोशनवरून फाइट नाय होईल ! आमी टुमच्या झगड्याची मूळी — रूट कॉज् — विलायटला घेऊन चाललो. बी हॅपी — आमी रोशनबेगमवर केलेला सॉंग ऐका अन् खूष व्हा ! कम ऑन्, कम ऑन् — बी स्पोर्ट ! आमच्याट शामील व्हा !...

( रोशनचा हात हाती घेऊन गीत म्हणतो. रोशनही साजेसे हावभाव नि नृत्य करते — )

**मीठी मीठी नाइटिंगेल, व्हेरी व्हेरी रंगेल ॥ ध्रु ॥**

**हिची लहानली जरी हाइट्**

**तरी जवानी लई टाइट्**

**खुले इस्काची ती फाइट, झाला दिल् आमचा फेल्**

**हिचा पैंजनांचा जिंगलिंग**

**हाऊ स्वीट, हाऊ चार्मिंग**

**हिचा एंब्रेस लई ऑलवेल...व्हेरी व्हेरी रंगेल्**

( सर्वजण गीत-नृत्यात मश्गुल असतानाच दृश्य संपते. )

म. ग्रं. … , वाचनालय शाखा.
ग्र. क्र. … २८११३ तारीख … 31.12.2163
अ. … जोशी …

## दृश्य तिसरे

( खंडोशंकर रंगमंचावर फुलांच्या साजांच्या परडीसह प्रवेशतो. इतक्यात साळू घाईघाईने प्रवेश करते. तोच खंडोशंकर तिला दिसतो. तिच्यापाठोपाठ मोरशास्त्री प्रवेश करतो. खंडोशंकरला पाहून दचकतो व बाजूला लपून उभा राहातो. )

साळू : ( खंडोशंकरच्या पायाला हात लावून ) — राम राम खंडोशंकरजी.

खंडोशंकर : जय जय ! काय साळू , कालची बैठक जमली की नाही ?

साळू : अतिशय जमली. खूप झाले सर्व. तुम्ही शिकवलेली ठुमरी खूप रंगली. बरं, मी येऊ ? ( घाईघाईने जाऊ लागते. )

खंडोशंकर : अगं थांब, थांब, एवढी घाई कसली ?

साळू : ( अडखळत ) — नाही, म्हणजे – आपलं ते हे —

खंडोशंकर : आपलं ते हे ? म्हणजे तुझे ते धनाजीराव ? कळलं ! तुला घाई कशाची झाली आहे ते आलं लक्षात —

साळू : अग बाई, तुम्हाला कसं कळलं बाई ?

खंडोशंकर : अगं, या बावनखणीतल्या बाईच्या मनातलं मला कळणार नाही, तर कुणाला कळणार ?

साळू : मग सांगा बरं माझ्या मनातलं ?

खंडोशंकर : असं असं ! म्हणजे तुझ्या मनातलं माझ्याच तोंडून तुला ऐकायचं आहे तर ! हुषार आहेस. ऐक. तुझे ते धनाजीराव यायची वेळ झाली आहे, होय ना ? ( ती मानेने ' होय ' म्हणते. तिच्या हातात गजरा देत ) तेव्हा कालच्या जमलेल्या बैठकीचं वर्णन, धनाजीरावांच्या सहवासात अगदी साग्रसंगीत बैठक जमवून, सांगण्याची घाई तुला झाली आहे. काय, खरं की नाही ? —

( साळू ' चला ऽ ऽ ' असे म्हणून मुरका मारून पळून जाते. खंडोशंकरचा डोळा चुकवून मोरशास्त्री साळूच्या मागोमाग आत जातो. खंडोशंकरही आपल्या कामास निघून जातो. क्षणभर अंधार होऊन पुढील दृश्यासाठी उजेड पडतो. )

( साळू सासवडकर आपल्या दिवाणखान्यात, तिचा प्रियकर धनाजीराव शिंदे ह्याची प्रतीक्षा करीत आहे. घटकेत ती खिडकीपाशी जाऊन डोकावते, तर घटकेत पानाचे तबक व्यवस्थित करते. ' अगं बाई, अत्तर कुठाय !' असे म्हणून अत्तराची कुपी शोधते. मधल्या दारातून आत मोलकरणीला हुकूम

सोडते — 'सखू, ए सखू! जेवणाचा इंतजाम झालाय ना? येतील हो ते एवढ्यात!' मग ती कपडे ठाकठीक करते. बुचडयावर शुभ्र गजरा बांधते. इतक्यात दारावर ठक्‌ठक्. तिला वाटते, धनाजीराव शिंदेच आलेत. पण दार उघडून पाहाते तो संस्कृत-पंडित मोरशास्त्री! तिच्या कपाळावर आठी पडते. तिचा विरस होतो. मोरशास्त्र्यांना दारातूनच कटविण्यासाठी ती म्हणते —)

साळू : कोण? तुम्ही?

मोरशास्त्री : होय, मीच — व्याकरणाचार्य मोरशास्त्री.

साळू : ह्या वेळीं कुठे?

मोरशास्त्री : हीच वेळ तुझ्या सदनी येण्यास सुयोग्य!

साळू : शास्त्रीबुवा, माफ करा हं. आजचा माझा कुळाचारांचा दिवस. फार गडबडीत आहे मी. शिवलीलामृताची पोथी वाचायची राहिलीय् देवापुढे...

मोरशास्त्री : उत्तम, उत्तम! साळू, सासवडग्रामदीपिके! वारांगना असूनही कुलांगने-प्रमाणे तू सुसंस्कृत आहेसे पाहून बहुत्तर संतोष झालाय्!... छान, छान! आमचे परममित्र महान् गणिकोद्धारक, वारांगना—कल्याण—प्रवीण महंत महाबळेश्वरांचा संस्कार दिसतोय हा!

साळू : अं? हो....हो! असेल असेल! तसंच असेल! पण तुम्ही असं करा, उद्या या, परवा या, किंवा ही कुळाचाराची धांदल येत्या श्रावण मंगळवारापर्यंत होऊन गेली म्हणजेच या — सावकाश!

मोरशास्त्री : (आत शिरत) छेः छेः छेः! कितीही गडबड—घाई असली तरी तुझ्या या रंगमंदिरात घटकाभर विश्रांत झाल्याविना, तांबूलभक्षण घडल्याविना, मुखश्री रंगल्या-विना निघणे नाही! हेच तर आमचे कुलव्रत!

साळू : हे पानदान घ्या...(आत पाहून —) सखू, ए सखू, माझी पोथी काढून ठेव ग. आलेच मी. मोरशास्त्री, तुम्ही पान खा पटपट आणि चालू लागा झटपट. आज सारी पोथी वाचणार आहे मी.

मोरशास्त्री : उत्तम! तुझा संकल्प उत्तम आणि आमच्या मनात आलेली संकल्पना त्याहूनही उत्तम!

साळू : कसली कल्पना?

मोरशास्त्री : ते शिवलीलामृत—वाचनाचं पुण्य आपण द्विगुणित करू!... दुप्पट करू!

साळू : म्हणजे?

मोरशास्त्री : म्हणजे आपण उभयता शिवलीलेचं अमृत एकत्र प्राशन करू! मी कैलास-नाथ शंभू, तू शैलतनया अंबू! ये, ये! तू या वामांकी आरूढ हो, आणि आपण परस्परात विलीन होऊन त्या पवित्र पोथीची पारायणांवर पारायणे करू...(आत पाहून) सखू, ए सखू, पोथी बाहेरच आण. पारायणाची सर्व सिद्धता इथेच आहे. (साळूला)

चल गे, तू प्रती–पार्वती तर आम्ही प्रती–शिवशंकर !

साळू : अहो लोचट–शंकर, मुकाट पानाचा तोबरा भरा आणि इथून पोबारा करा !... सखू ऽऽ

मोरशास्त्री : तिष्ठ, तिष्ठ ! अशी कोपायमान होऊ नकोस. संयुक्त पोथी–पठणाची संकल्पना आम्ही मागे घेतो ! तथापि तुझ्या दृष्टिसुखाची, चारुदर्शनाची पिपासा कदापि मागे घेणार नाही !...अहाहा ! विधात्याची केवढी रम्य कामगिरी ही ! केवढें अद्वितीय तारुण्य ! किती अप्रतिम हे लावण्य ! हे शरदुत्पल्पत्राक्षी, घनवर्तुळ–नितंब–बिंबधारिणी, स्तन–कलश–नम्र–चारुगात्री ! आम्हास तुझ्या हृदयमंचकी प्रियकर म्हणून विराजित कर आणि मग शय्यामंचकी खुशाल पराजित कर! (ती कानांवर हात ठेवते.) हे हृदय–साम्राज्य–स्वामिनी, मदन-विजयिनी, चित्तमोहिनी, आपली कदापि ' विभक्ती ' न होवो !

साळू : विभक्ती ?

मोरशास्त्री : विभक्ती म्हणजे ताटातूट ! ती कदापि न होवो !

साळू : ती आत्ताच होवो ! या क्षणीच होवो ! निघा आता....इतक्यात ते धनाजीराव शिंदे येतील – निघा, निघा. त्यांच्या देखत हा तुमचा तमाशा नको !

मोरशास्त्री : ( किंचित् रुष्टतेने ) अगे कैतव–कारिणी, वंचक–सुंदरी ! आत्ता शात झाले तुझ्या ' जा जा जा ' म्हणण्याचे खरे कारण ! त्या मूर्ख खंडोशंकराच्या महामूर्ख शिष्याची, धनाजीरावाची प्रतीक्षा करते आहेस काय ?

साळू : होय, त्यांचीच वाट पाहाते आहे. ते आत्ताच इथे आले तर..

मोरशास्त्री : येऊ दे ! खुशाल येऊ दे त्याला ! धनाजी येऊ दे नाही तर तानाजी येऊ दे ! त्या धनमस्त धनाजीला घाबरतेस ? अगे, कोठे आम्ही श्रीमंत बाजीरावांच्या राजसभेचे भूषण, वेदवेदान्तपारंगत वाग्भट, अणि कोठे तो अक्षरशत्रू– विद्याभ्यासंगशत्रू–ग्रामीण कुक्कुट ! ये, त्या धनाजीलाच साक्षीभूत करून आपली प्रणय–कूजिते चालू ठेवू... चल ये –

साळू : नाही नाही नाही ! हे कधीच होणं नाही —

मोरशास्त्री : अशी नकारघंटिका वाजवू नकोस गे ! घंटा पूजेनंतर वाजवितात, आधी नव्हे. अगे अज्ञानतिमिरावृते, अचिरांशुविलासचंचले, फलद्वय–भूषित–कल्पलतिके —

साळू : ( कानांवर हात ठेवीत ) राम राम राम ! तुमचे हे शिष्ट– विशिष्ट नि क्लिष्ट शब्द ऐकून मला अगदी भ्रष्ट होण्याची वेळ आलीय ! चालते व्हा इथून. चला निघा — ( त्याचा हात धरून त्याला बाहेर खेचू लागते. )

मोरशास्त्री : ( साळूच्या हस्तस्पर्शाने उत्तेजित होऊन ) अहाहा ! धन्योऽस्मि, धन्योऽस्मि ! अशा रीतीनं का होईना, तुझ्या कोमल करतलाचे स्पर्शसुख मला लाभले ! असं का होईना, तू माझं पाणिग्रहण केलंस ! सुंदरी, मी संतुष्टचित्त जाहलो...

साळू : ( हात सोडवून – ) तुम्ही असे ऐकणार नाही. अहो लंपटाचार्य, लोचटाचार्य, उठा, उठा – चालते व्हा इथून ! ( काठी घेऊन त्याला मारू लागते. )

मोरशास्त्री : सुंदरी, तिष्ठ तिष्ठ !...

साळू : ( मारतामारताच – ) आता तिष्ठ नाही, उत्तिष्ठ, उत्तिष्ठ !

( मागून खंडोशंकर येतो. तिचा हात धरतो आणि आत जाण्याची खूण करतो. मोरशास्त्री मार खाऊन नि अधिक मार बसण्याच्या भीतीने खाली तोंड करून पडलेला असल्याने त्याला खंडोशंकरचे येणे नि साळूचे आत जाणे दिसत नाही. )

मोरशास्त्री : ( वर बघून, पश्चात्तापदग्ध स्वरात ) हे मंदमते, पुनःपुनरपि तुझे असे अपमान झाले, तरी कशाला रे गणिका–गमन करतोस ? 'गणिका श्मशानघटिकाइव वर्जनीयाः' हे ज्ञात असूनही, पुनश्च गणिका–सदनांचे अवघड सोपान कशाला रे चढतोस ?... चढशील ? चढशील पुन्हा ? तिची पादत्राणं भक्षण करायला जाशील ? जाशील ? ( स्वतःच्या तोंडात मारून घेतो. ) हाय हाय, रे रे वेश्या–ताडित, गणिका–पीडित, रतिसौख्य–वंचित मोरबा, हतोऽसि हतोऽसि ! काय तुझा हा दैवदुर्विलास ! देवाऽ... ( या वेळी त्याच्या पाठीमागे उभा असलेला खंडोशंकर खट्याळपणे 'ओऽऽ' म्हणतो. त्या ओकाराने मोरबा आश्चर्यचकित होऊन, वर अंतराळात पाहून – ) आकाशवाणी झाली की काय ? देवा ऽ (खंडोशंकर पाठीमागून मोरशास्त्र्याच्या खांद्यावर हात ठेवतो. ) देवा, तुम्हीही बावनखणीत आलात ?

खंडोशंकर : होय बरं मोरोबा ...

मोरशास्त्री : ( खंडोशंकराला पाहून ) कोण ? खंडोशंकर, तुम्ही ? म्हणजे आम्ही आत्ताच श्रवण केलेला प्रतिसाद देवांचा नव्हता तर ?

खंडोशंकर : नव्हताच ! अहो, देवांना काय जरुरी पडली आहे तुमच्या उल्लूपणात डोकावण्याची ? आमच्या सुज्ञ समजूतदार साळूच्या महालात तुम्ही जो पांचट पागल-पणा चालविला होता, त्यात लक्ष घालण्याची देवांना जरुरीच काय ?

मोरशास्त्री : छान, छान ! तुमची साळू म्हणजे समजूतदार सुज्ञतेची कल्प–वल्लरी, आणि आम्ही ? गीर्वाण– वाग्–वैजयंती धारण करणारे आम्ही अज्ञ, उल्लू नि पागल काय ?

खंडोशंकर : दुसरं काय ? जो महामूर्ख माणूस सुकुमार सुंदरीशी कर्णकठोर शब्दांनी लगट करू पाहातो, तो मंजूळ वीणेच्या तारा जळक्या लाकडानं छेडण्याचं घोर कर्म करतो !

मोरशास्त्री : घोरकर्मे, क्रूरकर्मे तुम्हीच आहात खंडोशंकर ! त्या साळसूद साळूचं कर्णोद्घाटन करून, धनाजीसारख्या का–पुरुषाला न वरता, मोरबासारख्या वर–पुरुषालाच वर असा सल्ला तुम्ही द्यायला हवा होता . ( इतक्यात तोल जाऊन खाली पडतो. )

खंडोशंकर : ( त्याला उठवीत – ) उठा, उठा. खाली पडलेल्या तुम्हास 'वर'–पुरुष कैसे म्हणावे ? पडेल पंडित तुम्ही ! तुम्हास पलंग–पांडित्यदेखील जुळलं नाही, हा

काही आमचा दोष नव्हे !

मोरशास्त्री : वाः! आमच्या मस्तकी ऐसा खर्पर–स्फोट करणं, म्हणजे नीचतेची परमावधी झाली !

खंडोशंकर : दुसऱ्याला नीच म्हणताना तुमची स्वतःची नीचकर्मे आठवा की! तुम्ही आणि तुमचे ते महंत महाबळेश्वर – तसेच ते सरदार मदनराव, नीचपणाचे अर्क आहात अर्क ! त्या श्रीधरपंताकडून दक्षणा उपटून, या बावनखणीत ती ताबडतोब खर्च करणारे तुम्ही लंपटाचार्य ! बरं झालं. त्या पापाचं प्रायश्चित्त, साळूच्या ह्या महालात तुम्हाला ताबडतोब मिळालं !

मोरशास्त्री : असत्यं–असत्यमेतद् !

खंडोशंकर : हे असत्य ?

मोरशास्त्री : नाही....हो...पण समजा, क्षणभर ते सत्य आहे ऐसे जरी मानिले, तरी खंडोशंकर, तुमच्या प्रचंड नीचतेपुढे आमची लघुतम नीचता म्हणजे मेरूपुढे मोहरी! तुम्ही कामविमोहित होऊन त्या साळूला गजरा देताना आम्ही पाहिलं...

खंडोशंकर : काय ? तुम्ही पाहिलं ?

मोरशास्त्री : हो, हो, अगदी चक्षुर्वैसत्यम् ! नाही आठवत ? नाही आठवत ? ( हसून गजरा दिल्याचे ते दृश्य अभिनयाक्ति करतो. )

खंडोशंकर : मग काय मोरबा, आम्ही बिब्बा घालतानाही पाहिलंत का ?

मोरशास्त्री : ते पाहिलें नाही, पण जाणिलें ! साळूच्या प्रेमात तर तुम्ही बिब्बा घातलाच, पण महंत महाबळेश्वर नि तारा ह्यांच्या प्रेमातही बिब्बा घालून, त्या महाबळेश्वराचा पार वाळकेश्वर करून टाकलात तुम्ही ! हर हर ! त्यांच्या प्रेमपीयूषात मृत्तिका कालवली तुम्ही !

खंडोशंकर : मृत्तिका, म्हणजे माती !

मोरशास्त्री : माती नव्हे, मृत्तिका !

खंडोशंकर : माती कालवणं हा आमचा दुसरा उद्योग वाटतं ? काय, शुद्धीवर आहात ना ?

मोरशास्त्री : पूर्ण शुद्धीवर आहे. पण तुम्ही मात्र ही सारी बावनखणी अशुद्ध करून टाकली आहे. म्हणूनच तुमची ती चंद्रा चंदेरीकर, किती मस्तवाल झाली आहे तुमच्या सहवासात ! काय तर म्हणे, देवमूर्तीपुढेच नृत्य–गायन करिते ती — आमच्यापुढे नाही ! अरे वा ! ही बावनखणी आहे की पंढरपूर–आळंदी आहे ? इथल्या गोंडस गणिका जर ऐसा संतिणींचा आव आणू लागल्या, नुसतेच नृत्य–गायनाचे समारोह करू लागल्या, आणि इतर आरोह–अवरोह नाकारू लागल्या, तर खंडोशंकर, आमच्यासारख्या अतृप्त नर–पुंगवानी आपली विषय–तृष्णा शमवावयाची कोठे ?... तुम्ही गणिकाधर्म बुडवीत आहात, बावनखणीच्या कामयज्ञात विघ्न आणीत आहात, आम्हा प्रतिष्ठितांची गणिका–हस्ते अवहेलना करीत आहात, अशी तक्रार श्रीमंत

पेशव्यांकडे करून तुमचा नि तुमच्या त्या चढेल चंद्राचा नक्षा उद्या सायंकाळपर्यंत उतरून दाखवितो ! (आत जाऊ लागतो.)

खंडोशंकर : (त्याला अडवून –) जा, जा – पण तिकडे कोठे ? बाहेर जाण्याचा रस्ता आहे इकडे !

मोरशास्त्री : माहीत आहे ! (स्वतःशी पुटपुटत) बावनखणीचे रस्ते मला दाखवतोय् लेकाचा ! (जाताजाता मोठ्याने –) अरे प्रणय–सौख्य–घातका, धूर्त–वंचका, श्रीमंतांकडून उद्या सायंकाळपर्यंत तुझा नक्षा उतरवला तरच वेश्याकरणाचार्य... नव्हे, नव्हे, वैय्याकरणाचार्य म्हणवीन ! (जातो.)

खंडोशंकर : (त्याच्याकडे पाहून –) जा, जा – खुशाल चाहड्या कर. कावळ्यांच्या कर्कश कोलाहलानं आम्रवृक्षाचा मोहर जळत नसतो ! (प्रेक्षकांकडे वळून –)

**हे असे काम–बेजार, विषय–सुखसार, हीनबाजार**
**तुला मानिती**
**परी तू पंक–जनित कमलिनी**
**सखे ! तू रम्य रसिक रागिणी**
**सखये बावनखणी ...**

(अंक पहिला समाप्त : पडदा पडतो)

# अंक दुसरा
## दृश्य पहिले

(बावनखणीचे दोन प्रमुख मध्यस्थ रंगोविठ्ठल व मल्हार तुकदेव भांगेच्या नशेत मध्येच खो खो हसत तर मध्येच जागच्या जागी थबकत प्रवेश करतात.)

मल्हार : रंगो विठ्ठला! (गातो.)

हवेली चंद्राची सुंदर
तिजमधे झुलते बघ झुंबर

(स्वतःच झुलत झुलत चालतो व थांबतो.)

मित्रा! ..अरे त्या चंद्राची हवेली आली की नाही अजून? – चालून चालून, झुलून झुलून, चालून चालून चालून...

रंगो : अरे एकाच जागी काय झुलतोस नि चालतोस? पुढे बोल. काय झालं चालून चालून?

मल्हार : पायाचे तुकडे पडले रे!

रंगो : (हसून) तुकडे पडले? – कुठे आहेत ते? त्यांनाच तर शोधतो आहोत आपण!

मल्हार : (हसून) त्यांना कुठे शोधतो आहोत आपण? आपण त्या खंडोशंकरला शोधतो आहोत. आपण दोघांनी जरी भांग चढविली असली, तरी मला हे पक्कं आठवतं आहे! पण मित्रा विठ्ठला, आपण नक्की कुठे आलो आहोत, हे मात्र मला आठवत नाही. ऑं? कुठे आहोत आपण?

रंगो : जिथून निघालो तिथे —

मल्हार : म्हणजे त्या रामदुलारीच्या हवेलीत? मग ती चंद्राची हवेली कुठे आहे? कुठे आहे ती चंद्राची हवेली? —

(परत वरील गाणे गाऊ लागतो.)

रंगो : (त्याच्या तोंडावर हात ठेवतो.) – थांब, थांब. फारच चढलेली दिसते तुला भांग. नीट समोर पाहा – (आकाशाकडे बोट दाखवीत) – ती बघ चंद्राची हिरव्या रंगाची हवेली —

मल्हार : (पाहून) हिरव्या रंगाची नव्हे वेड्या, निळ्या रंगाची, सातमजली. हाः हाः हाः हाः हाः ऽ ऽ —

रंगो : अरे हसायला काय झालं ? —

मल्हार : (आकाशाकडे पाहात) हसू नको तर काय करू ? —
त्या चंद्राच्या निळ्या हवेलीत झुंबराचा काळा ठिपका झुलताना दिसतोय मला.
(गातो.)
हवेली चंद्राची निळसर
तिजमधे झुंबर काळसर

रंगो : कुठे पण ते खंडोशंकर ?

खंडोशंकर : (प्रवेश करून) या इथे हा खंडोशंकर !

रंगो : (त्याला पाहून) नमस्कार खंडोशंकर.

मल्हार : (अजून आकाशाकडेच पाहातो आहे.) – अरे त्या झुंबराला काय नमस्कार करतोस ?

रंगो : झुंबराला नव्हे, तर ज्यांना आपण शोधतो आहोत त्या खंडोशंकरांना – (त्याचे तोंड खंडोशंकराकडे वळवितो.)

मल्हार : (खंडोशंकराकडे पाहून) राम राम — (एकदम पायावर लोळण घेतो.) माफ करा हं – माफ करा, आम्हाला माफ करा – तुम्हाला समजलं ना ? माफ करा – समजलं ना — ?

खंडोशंकर : (हसून, त्याला उठवत) समजलं, समजलं. अहो मध्यस्थमहर्षी मल्हार तुकदेव, शांभवीचा प्रसाद घेऊन आलात, पण बाकीच्या तीन पंचांना नाही घेऊन आलात ? कुठे आहेत ते ?

रंगो : रामदुलाराकडे ! थंडाई घेऊन थंडगार पडले आहेत !

मल्हार : पण काही हरकत नाही. आम्ही दोघे पुरेसे आहोत.

खंडोशंकर : त्याबद्दल मला शंकाच नाही. तुम्ही पंचशिरोमणी पंचमहाभूतांनाही पुरून उराल ! –

रंगो : तर मग बोला, कशाला तुम्ही पंचसभा बोलाविली होती ?
(बोलतबोलत सरपंचाच्या ऐटीत तिथल्याच एका आसनावर बसतो.)

खंडोशंकर : अहो तो श्रीधरपंत दातार आहे ना ?

रंगो : तो दातार सावकारांचा मूर्ख मुलगा ? मूर्ख म्हणजे शतमूर्ख !

मल्हार : सहस्रमूर्ख !

रंगो : लक्षमूर्ख ! – तुम्हाला ठाऊक आहे ?

खंडोशंकर : मला सगळं काही ठाऊक आहे. ठाऊक नाही ते तुम्हा वेश्याशास्त्रपारंगत पंचायतमहर्षींना. ऐका – त्या श्रीधरपंताच्या डोक्यावर लाथ मारलीय् आपल्या चंपीनं. हा प्रकार श्रीधरपंताच्या मनाला फार झोंबलाय्. म्हणून ह्या पापाला वेश्याशास्त्रात कोणतं प्रायश्चित्त आहे ह्याचा निर्णय तुमच्या पंचसभेनं करायचा आहे.

रंगो : पंचसभेची जरुरी नाही. मी सरपंच ह्या नात्यानं जाहीर करतो की, श्रीधरपंताकडून पापच घडलेलं नाही !

मल्हार : म्हणून प्रायश्चित्ताचीही जरुरी नाही ! उपपंच म्हणून मी सरपंचांना दुजोरा देऊन जाहीर करतो की, वारांगनेच्या लाथा खाण्याचं पुण्यच मिळालं त्या श्रीधराला !

खंडोशंकर : तुम्ही दोघे महर्षी शुद्धीवर आहात ना ? की भांगेचा असर अजून ओसरला नाही ?

रंगो : नकोच तो ओसरायला ! कारण शांभवी हा शंकरजींचा प्रसाद !

मल्हार : तो प्रसाद प्राशन केल्यानंतर दिलेला हा शुद्ध आणि पवित्र निर्णय श्रीधरपंताला कळवा. त्याला सांगा ' चंपा नायकिणीची लाथ तुझ्या मस्तकी बसली हे तुझं परम-भाग्य !'

रंगो : त्याबद्दल तिच्या हवेलीवर सत्यनारायण साजरा करून बावनखणीतील सर्व नायकिणींची खणा-नारळानं ओटी भर आणि आम्हा मध्यस्थमहर्षींना दहा-दहा मोहरा दक्षिणा दे, असं कळवा श्रीधराला.

खंडोशंकर : लाथा खाल्ल्याबद्दल सत्यनारायण ? अन् तुम्हाला दक्षिणांची खिरापत ?

रंगो : मिळालीच पाहिजे या अचूक निर्णयाबद्दल ! तुम्हीच पाहा खंडोशंकरजी, अगदी पुराणातले दाखले देतो. बळी राजाच्या माथ्यावर वामनानं पाय दिला, म्हणूनच बळीराजा पाताळाच्या सिंहासनावर बसला ! बाईमाणसाची लाथ तर फारच लाभदायक !

मल्हार : अतिशय लाभदायक ! ध्रुवबाळाला बाईची, म्हणजे सावत्र आईची, लाथ बसली नसती, तर त्याला अढळपद मिळालंच नसतं !

रंगो : असं हे लत्तामाहात्म्य लक्षात घेऊन, श्रीधराच्या शिरावर मारलेल्या पुण्यशील लाथेबद्दलचा आमचा निर्णय, खंडोशंकर, तुम्ही शिरोधार्य मानावा आणि लवकरात लवकर सत्यनारायण घडवून आणावा, असा पंचायत-सरपंच या नात्यानं आमचा तुम्हाला आदेश आहे !

खंडोशंकर : तुमचा हा आदेश मी शिरसावंद्य मानतो, इतकंच नव्हे, तर हे लत्ता-माहात्म्य जगातील सर्व लाथाखाऊंच्या उपयोगी पडावं म्हणून, सत्यनारायणप्रसंगी त्याचं पठनही करायला मी सांगतो !...चंपागणिकेच्या चरणकमलाचा मार मस्तकी झेलणाऱ्या वा लत्ताधरा श्रीधरा, तू धन्य आहेस, आणि निर्णयमहर्षी, तुम्हीही धन्य आहात ! तुम्हा मध्यस्थमहर्षींना निर्णयब्रह्मर्षी अशी किताबत देऊन, श्रीमंतांकडून तुमचा सत्कार व्हायला हवा ! वाहवा ! असा न्यायनिवाडा करणं रामशास्त्री प्रभुण्यांनाही जमलं नसतं ! !

रंगो : हे खरं ना ? तर मग खंडोशंकर, आमची शिफारस श्रीमंत बाजीरावसाहेबांकडे करा ! त्यांना सांगा, चांगले न्यायमूर्ती नसल्यामुळे सध्या राज्यकारभारात सावळा गोंधळा माजलाय् !...

मल्हार : श्रीमंतांनी न्यायखातं आमच्याकडे सोपविलं तर शासनातील भ्रष्टाचार औषधालाही उरणार नाही !

खंडोशंकर : शंकाच नाही. सर्व भ्रष्टाचाराचं सदाचारात रूपांतर होईल आणि त्यानिमित्त सर्वत्र सहस्र सत्यनारायण घातले जातील !... या, इकडे या – सन्मानाचे गजरे बांधून तुम्हा न्यायमूर्तींची बोळवण करतो. ( गजरे बांधतो. )

दोघे : वाऽऽऽ ! खंडोशंकरजी, तब्येत खूष झाली ! आता आम्ही जातो श्यामदुलारीकडे आमच्या कामाला, आणि तुम्ही जा तुमच्या मुक्कामाला !

आम्ही जातो अमुच्या कामा
आमुचा रामराम घ्यावा —

( दोघेही आनंदाने निघून जातात. खंडोशंकरही जातो. )

## दृश्य दुसरे

( चंद्राच्या दिवाणखान्यात खंडोशंकर जेव्हा प्रवेश करतो तेव्हा दिवाणखान्याचा आतील दरवाजा बंद आहे, आणि आतून आरतीच्या झांजांचा किणकिणाट ऐकू येत आहे. खंडोशंकर दरवाजा जरासा किलकिला करून आत डोकावतो आणि स्वतःशीच उद्गारतो ' माझ्या देवतेची देवपूजा चालू आहे ! – अशा वेळीं रुक्ष हाक मारून आपल्या येण्याची वर्दी देणं योग्य नव्हे ! ' तो कोपऱ्यातील तंबोरा उचलून म्हणतो –
तिच्या करस्पर्शानं सचेतन होणाऱ्या भाग्यशाली तानपूरका ! तूच दे तिला आमच्या आगमनाची वर्दी ! ' तंबोरा छेडून, पुनश्च स्वतःशीच – ' अं हं ! नुसत्या तारा छेडून ती शुक्रतारा कशी प्रसन्न होणार ? शब्दांची फुलं नि सुरांचा सुगंध ह्यांचा संयोग झाल्याविना आत्ताचा हा वियोग संपणार नाही ! '
पुनश्च तंबोरा छेडून गीताचा मुखडा उच्चारतो –
' मूर्तिमंत देवताच सूर–मंजिरी
सूर–सुंदरी ! तू प्रसन्न होइ झडकरी ! '
तोच शुभ्रवस्त्र परिधान करून, डोईवरून जरतारी पदर घेतलेली चंद्रा हाती पंचारती घेऊन त्या मधल्या दारात उभी राहाते. )

खंडोशंकर : ( तिला पाहून ) अरे हे काय ? रतीच्या हाती पंचारती का म्हणून ?

चंद्रा : तुम्हाला ओवाळण्यासाठी !

खंडोशंकर : विचित्रच आहेस ! लोक देवतेला आरती ओवाळतात, पण देवता कधीही कुणालाही आरती ओवाळत नाही !

चंद्रा : देवतेला जे देवस्वरूप वाटतात, त्यांना हा नियम लागू नाही ! म्हटलं, आज तुमचा वाढदिवस. आज देवस्वरूप तुम्हाला नाही ओवाळायचं तर कुणाला ? चला, ह्या मंचकी बसा. पूर्वेला तोंड करून बसा.

खंडोशंकर : ( उठून मंचकाकडे जाताजाता — ) वाहवा ! त्या देवघरातील देवपूजेनंतर तुझी ही दिवाणखान्यातील देवपूजा !

( मंचकावर बसतो. चंद्रा त्याच्यासमोर आरती घेऊन उभी राहाते. त्याला टिळा लावते. ती ओवाळणार, तोच — )

खंडोशंकर : अग थांब थांब !

चंद्रा : ( रुष्टतेने — ) शुभ कार्यात हा कसला खोळंबा ?

खंडोशंकर : ( उठून उभा राहात — ) खोळंबा काही नाही — पण आधी ही पंचारती बाजूला ठेव अन् मग खुशाल मला ओवाळ ! ठेव, ठेव ते तबक बाजूला.

चंद्रा : ( रुष्टतेने ) तबक तर बाजूला ठेवतेच, पण मीही बाजूला होते ! ( दूर जात ) पंचारतीविना ओवाळण्याची ही अजब रीत मला तरी ठाऊक नाही !

खंडोशंकर : जे तू नेहमी करतेस ते तुला ठाऊक नाही ? अगं, रोज तू पंचारतीविनाच मला ओवाळतेस !

चंद्रा : तुमच्या नजरेला काही तरी भ्रम झालेला दिसतो. म्हटलं, कुणीही कुणाला ओवाळणं शक्य नाही पंचारतीशिवाय !

खंडोशंकर : नमः शिवाय ! अगं वेडाबाई, तुला कसं कळत नाही की ह्या पंचारती-मधील पाचही नीरांजनांना लाजविणारी, तेजाळ नेत्रांची दोन नीरांजनं विधात्यानं तुला दिली आहेत, अन् ती मला नेहमी येताजाता ओवाळतातच की ! — ( तिचा हात हाती घेऊन तिला मंचकावर बसवून ) ये, अशी जवळ बसून, भरपूर ओवाळ मला तुझ्या दोन नयनांच्या दोन ज्योतींनी !

चंद्रा : ( लटक्या रागाने दूर जात — ) स्तुतीच्या चंद्रज्योती उजळू नका उगाच. अशी खोटी खुषामत मला मुळीच आवडत नाही. कधी माझ्या डोळ्यांना कमलदल म्हणता, कधी मदनाचे बाण म्हणता, कधी कामदेवाच्या कट्यारी म्हणता, कधीकधी ह्याच डोळ्यांना मद्याचे दोन प्याले म्हणता — आणि आज हे नवीन खूळ ! माझ्या डोळ्यांवर फारच डोळा दिसतोय् तुमचा ! ( कृतककोपाने बाजूस पाहाते. )

खंडोशंकर : तुझी हीच मधुर तक्रार माझ्या डोळ्याला डोळा भिडवून कर ना ! ( जवळ जाऊन ) हं, पाहा माझ्याकडे अन् ओवाळ मला तुझ्या नेत्र—नीरांजनांनी. ( तिच्या

डोळ्यात पाहून ) वाहवा, चंद्रिके ! किती वर्णू ह्या नीरांजनांचा महिमा !

**दोन ही हसरी नीरांजने**
**खुलती अधिकच ती अंजने !**
**बिनवातीच्या त्यातिल ज्योती प्रसन्न करिती मने**
**बरसती प्रीतीची किरणे**
**न कळे कोणा, कशा तेवती ज्योती तेलाविणे**
**पसरती 'स्नेहा'चे चांदणे**

चंद्रा : पुरे, पुरे ! ह्या नेत्र–नीरांजनांची तारीफ पुरे झाली. कारण, त्यामुळे ही तबकातील निरांजनं मत्सरानं जळताहेत !

खंडोशंकर : जळू देत ! आपल्याविरुद्ध मत्सरानं जळफळणारे मच्छर या पुण्यात थोडे का आहेत ? मोरोबा, महंत महाबळेश्वर, मदनराव मोहिते हे तर येताजाता श्रीमंतांच्या कानाशी मत्सरी गुणगुण करताहेत !

चंद्रा : पण ही नीरांजनं मत्सरानं जळफळली तरी मोरोबा–महंत–मदनराव ह्यांच्यासारखी दुर्जन नाहीत ! माझी नित्याच्या देवपूजेतील नीरांजनं आहेत ही !

खंडोशंकर : अरे हो – ते विसरूनच गेलो होतो मी !

चंद्रा : सज्जनांना विसरायचेच तुम्ही ! म्हणून तर माझी देखील आठवण राहात नाही तुम्हाला !

खंडोशंकर : खोटं – साफ खोटं. तुझी आठवण माझ्या मनाला नेहमी घट्ट बिलगून असते. कारण, तुझ्यापेक्षा तुझी आठवण दसपट उत्तम ! तुला दहादा बोलावलं तरी तू येशीलच याचा नेम नाही. पण तुझी गोड गोड आठवण न बोलावताही येते – आणि अष्टौप्रहर जवळ राहाते !

चंद्रा : ठीक आहे. तर मग आजच्या या गोड दिवसाची गोड आठवण म्हणून तरी, ही ओवाळणी होऊ द्या !

( तबक उचलून त्यातील पंचारती त्रिवार फिरवून ओवाळणी समाप्त करते आणि तबक बाजूला ठेवून म्हणते — )

चंद्रा : हं, ओवाळणी झाली. आता वाढदिवसाची ही पान–सुपारी, हा त्रयोदशगुणी विडा !

खंडोशंकर : थांब, जरा थांब ! तू मला विडा देणं ही तर नेहमीची गोष्ट. आज मीच विडा बनवून देतो आधी !

( पानाचे तबक उचलून आणतो. पानाला चुना लावून विडा बनवू लागतो. )

चंद्रा : हां हां हां ! केवढा चुना लावलात पानाला ! त्रास होईल ना मला !

खंडोशंकर : बरं ! तुला पाहिजे तेवढाच चुना लावतो ! ( पान पुसून थोडा चुना लावून ) हं, कात बघ, ठीक आहे ? ( सुपारी कातरून ) सुपारी पाहा.

चंद्रा : आणा, इकडे आणा. तुम्हाला सुपारी कापताच येत नाही नीट ! ( सुपारी कातरू लागते. )

खंडोशंकर : सुपारीच काय, सफाईनं मान कापण्यातही तुम्ही बायकाच जास्त चतुर असता ! ( तेवढ्यात चंद्राने दिलेली सुपारी पानात टाकून, इतर पदार्थही टाकून तयार केलेला विडा हाती घेऊन,) हं, हा घे तुझ्याच देखरेखीखाली तयार केलेला सुगंधी विडा – ( तिच्या मुखी विडा देतो आणि लगेच म्हणतो ) अग थुकून टाक तो, फेकून दे तो !

चंद्रा : का ? काय झालं हो ?

खंडोशंकर : मला हिणवतोय तो ! मीच त्याला तयार केला नि माझ्यावरच उलटला की हरामखोर !

**हा विडा मजला जणु वेडावतो।**
**कोवळ्या ओठास तुझिया चुंबितो॥**
**मान आम्हा का न या पानाहुनी।**
**आम्ही खुळे अपमान केवळ साहतो॥**

चंद्रा : खरंच गं बाई, खरंच ! ह्या तुमच्या रंगेल पानानं तुमचा फार फार अपमान केलाय ! पण आता मी त्याला सोडणार नाही !

खंडोशंकर : वाः ! हेच का तुझ्या निष्ठावंत प्रेमाचं लक्षण ?

चंद्रा : तसं नव्हे हो. तुम्हीच ज्याला माझ्या मुखात आश्रय दिला त्याला निराधार करणं बरं नाही ! ... पण एक करा. माझ्या अधराशी लगट करणाऱ्या ह्या विड्याचा सूड, त्याच्या या भावावर घ्या ! ... हा घ्या, मघापासून तुमच्या सन्मानाखातर चांदीचा वर्ख लावून सजलेला माझा विडा ! ( खंडोशंकरच्या मुखापाशी विडा नेते. ) विडा घ्या हो नारायणा !

खंडोशंकर : थांब. ( तिचा हात बाजूला करून ) हा तुझा नारायण, रिकाम्या पोटी नाही ह्याचा समाचार घेणार ! ( तिच्या हातीचा विडा आपल्या हाती घेत कौतुकाने – ) वाः ! जवानीचा हिरवा रंग, त्यावर चांदीचा श्रीमंती वर्ख ! तुझा हा सन्मानाचा विडा पाहून मला श्रीमंतांच्या मैफलीतला प्रसंग आठवला. ती त्रिपुरी पौर्णिमेची रात्र होती. त्या रात्री शुक्रवारवाड्यात खास खास रसिकांसाठी ग्वाल्हेरच्या चमेलीबाईचं ठुमरी–गायन ठेवलं होतं श्रीमंतांनी. चमेलीबाई अगदी तुझ्यासारखीच.

चंद्रा : माझ्यासारखी ? म्हणजे ?

खंडोशंकर : म्हणजे तिची मुखश्री अधिक सुंदर, की मुखातून बाहेर पडणारी रागश्री अधिक सुंदर, असा प्रश्न पडायचा. तिचा अटकर बांधा चीजेच्या बांधणीसारखाच रेखीव ! तिनं एक रसीली आनंद–भैरवी म्हणून मैफल संपवली, तेव्हा बाजीराव-साहेबांनी तिच्यावर अक्षरशः मोत्यांची उधळण केली. ती भारावून गेली, आणि तिनं

अशाच चांदीच्या तबकातून अस्साच मानाचा विडा श्रीमंतांसमोर सादर केला – त्या वेळी एक चटकदार शेरही त्या नटखट गायिकेनं सुनावला...

चंद्रा : ( मध्येच उत्स्फूर्तपणे – ) **मुहब्बतसे, अदबसे, कहती हूँ के पान हाजिर है।**
**गज़ब है, कयामत है, हमारी जान हाजिर है॥**

खंडोशंकर : मग श्रीमंत बाजीरावांनीही तितकाच रंगेल जबाब दिला. ते म्हणाले –

**हवा कशाला विडा सुंदरी ! खुलवाया ते रंग**
**तव अधराचे पान कोवळे खुलविल गे सुख–संग ।**
**सूर–चंद्रिके ! तुझ्या गायने उठती प्रेम-तरंग**
**उरोज–गिरिधारिणी ! कोण तव गिरिधारी श्रीरंग ?**

चंद्रा : बहोत खूब ! हे कवित्व ऐकून माझा दिल खूष झाला. श्रीमंत बाजीराव इतके रसिक आहेत ह्याची कल्पना नव्हती मला.

खंडोशंकर : तुलाच काय, अनेकांना कल्पना नाही. अग, बाजीरावसाहेब हे गुणदोषांचं मजेदार मिश्रण आहे. राजकारणात नि रणांगणात ते कच्चे आहेत, नादान दरबाऱ्यांच्या वेढ्यात पडले आहेत, पण कलावंतांचा कदरदान पेशवा आहे हा ! जशी होमहवनाची, तशीच देखण्या कवनांची; जशी उत्तम भोजनाची, तशीच उत्तम गायनाची, फार आवड आहे त्यांना. काय सांगू त्यांची दिलदारी !

चंद्रा : काही सांगू नका. कारण आज वाढदिवस तुमचा आहे, श्रीमंतांचा नाही. तुम्हीच आहात माझे बाजीराव ! तुमच्या आवडीचं मोगऱ्याचं अत्तर लावते तुम्हाला. ( अंगाला अत्तर लावीत ) ही माझी सुगंधी भेट ! ( अत्तराची कुपी त्याच्या हाती देते. )

खंडोशंकर : ( अत्तराचा वास घेत ) वाहवा ! छान ! तुझ्या स्वभावासारखंच सुगंधी ! काय योगायोग पाहा – तू मोगऱ्याचं अत्तर आणलंस माझ्यासाठी, तर मी मोगऱ्याचाच साज आणलाय् तुझ्यासाठी ! ( फुलांचा साज करंडीतून बाहेर काढून ) बघ, आहे ना सुंदर ?

चंद्रा : सुंदरच आहे; पण जरुरी काय ह्या साजाची – ह्या फुलांची ? ह्यांच्याहून शतपट सुगंधी भेट तुम्ही मला दिली आहे !

खंडोशंकर : शतपट सुगंधी भेट ?

चंद्रा : नुसती सुगंधीच नव्हे, तर सदैव टवटवीत राहाणारी !

खंडोशंकर : केव्हा ? कोणती ? कुठे ? मला नाही आठवत !

चंद्रा : साहजिकच आहे. जे दिलं त्याची आठवणही राहू नये, ह्यालाच म्हणतात खरं दान ! खरी दानशूरता दिल्याचा हिशेब ठेवीत नाही !

खंडोशंकर : चंद्रा, उगाच उखाण्यात बोलून वेळ दवडू नकोस. बघ, हा फुलांचा साज तुझ्या अंगसंगासाठी अगदी उतावीळ झालाय् !

चंद्रा : तुमचाच गुण घेतलाय् त्यानं उतावीळपणाचा !

खंडोशंकर : कबूल, कबूल ! आहोतच आम्ही उतावळे – पण तू आता कोड्यात न बोलता,

सरळ सांगून टाक की, अशी कोणती वस्तू मी तुला नजर केलीय, की जी या साजाहून सुंदर असू शकेल ?

चंद्रा : विसरभोळे आहात, विसरभोळे ! नाही ना आठवत ? तर मग ऐका –

**प्रीतिचा कल्पतरू जो मला लाभला**
**जीवना दिव्यतम गंध त्याने दिला –**
**नच जळे जो कधी ग्रीष्म-दावानली**
**नच झडे जो कधी शिशिर-हिमवादळी**
**या मनोभूमिवर सहज जो बहरला**
**आपदांचा तये भार परिहारिला –**

( गीत समाप्त होताच दोघेही हातात हात घालून आत जातात. )

## दृश्य तिसरे

( रंगूच्या माडीतून महंत महाबळेश्वर येत आहे. त्याचा वेष : खाली सोवळं, कफनी, कफनीवर पांघरलेली शाल. )

महंत : ( स्वतःशी गुणगुणत ) नको नको सखे ! गुंतू मायाजाली –

श्रीधर : ( प्रवेश करून ) कर बाई जवळी महंतासी – ( महंताचा हात धरून त्याला थांबवितो. )

महंत : ए श्रीधरा ! दूर हो, दूर हो. मी सोवळ्यात आहे हे दिसत नाही ?

श्रीधर : अरेच्या – महंतबुवा, तुमचं सोवळं विचित्रच दिसतंय. अहो भोंदूबुवा, बावनखणीतल्या बायांना तुम्ही जवळ घेता, तेव्हा कुठे जातं हो तुमचं सोवळं ? इथल्या बायांचे पलंग म्हणजे चंद्रभागेचे घाट आहेत की काय ?

महंत : रे अश्रद्ध श्रीधरा ! ह्या महंताचा पुण्य महिमा तुला काय ठावा ? जिथे जिथे आमचा पाय पडावा, तिथे तिथे गंगेचा घाट तयार व्हावा, ऐसा आमचा महिमा तू जाणावा !

श्रीधर : ढोंगी बगळ्या, लबाड कोल्ह्या ! – तुझा महिमा, तुझं चरित्र, आम्ही चांगलंच जाणतो. दिवसा रामाच्या मठात ‘ हरे कृष्ण हरे राम ’ आणि रात्री बावनखणीत मुक्काम !

महंत : ए लाथाखाऊ श्रीधरा ! – नाकानं कांदे का चिरतोस चराचरा ? त्या चंपीनं डोक्यावर लाथा हाणल्या तरी तू येतोसच ना बावनखणीत मुक्कामाला ?

श्रीधर : हो, येतो – पण उघडउघड येतो ! शेण खाण्याला श्रावणीचं रूप देऊन येत नाही मी. बदकर्माला धर्माचा मुलामा फासण्याचं ढोंग करीत नाही मी !

महंत : धर्माच्या नावानं, आमच्या विरुद्ध तू कितीही बोंबा मारल्यास, तरी आमचं गणिकोद्धाराचं धर्मकार्य–देवकार्य सोडणार नाही आम्ही !

श्रीधर : गणिकोद्धाराचं धर्मकार्य ? देवकार्य ?

महंत : अर्थात् ! भगवंतांनी जर महानंदा–पिंगला इत्यादी वेश्यांचा उद्धार केला, तर आम्ही निष्ठावंत भगवत्भक्तांनी त्या भगवंताला त्या कामी थोडी तरी मदत का करू नये ? बावनखणीतील पतितांचा, दलितांचा सर्वांगीण अभ्युदय साधण्यासाठीच, त्या भगवंतानंतर आम्ही अवतार घेतलाय् ! आणि म्हणूनच पतित नारींच्या उद्धारासाठी, कल्याणासाठी त्यांच्या शुद्धीकरणाचा संकल्प सोडलाय आम्ही ! अरे, ह्या वारांगना म्हणजे बोळूनचालून चिखलात रुतलेल्या गरीब गाई....

तारा : ( प्रवेश करून ) – आन् – तू हैस गाईत रुतलेला बैल ! – तुम्हास्नी तुंबडी भरण्याचा सराव आन् चामडीच्या सुखाची हाव !

महंत : तारे, तारे, असा भलता संशय घेणं योग्य नव्हे. कारण आम्ही आहोत विरक्त वैरागी.

तारा : वा ऽ रं वैरागी ! झकमारीचा जोगवा मागता जागजागी !

श्रीधर : मग त्या रंगूच्या माडीवर, मिळालाच असेल की यांना विरक्तीचा जोगवा —

तारा : व्हय, व्हय – मिळालाच असंल. रंगीच्या गुलाबी गालाचा गुलकंद, हनुवटीचा सफरचंद !

श्रीधर : दोन आंब्यांचा साखरांबा...

तारा : हां, अस्सा झकमारीचा ग्वाड ग्वाड जोगवा मोप मिळाला असंल महंतास्नी !

महंत : मत्सरग्रस्त तारे ! – काय ही तुझी कुत्सित कल्पना ! आम्हास काही मिळो वा न मिळो, आम्ही रंगूकडे गेलो ते निरपेक्ष निष्काम बुद्धीनं, तिचं सांत्वन करायला; धीर द्यायला; तिचे अश्रू पुसायला !.... आमच्या ह्या दयाळू हातानं तिचे गाल ... नव्हे, तिच्या गालावरचे अश्रू ... पुसले आम्ही ! —

तारा : का ? काय झालं ? तिची माय मेली का बाप खपला ?

महंत : नाही, नाही. आईबाप मेले तर त्याचं फारसं दुःख तुम्हा गणिकांना कधीच होत नसतं. तिचं मोठं गिऱ्हाईक मेलं !

तारा : तुमच्याहूनबी मोठं गिऱ्हाईक ?

महंत : अलबत् ! शेठ हिराजी माणिकचंदजी. तिचा जिवलग यार नि आमचा परमभक्त. त्याच्या त्या निराधार रक्षेचं – शोकात बुडालेल्या रंगूचं – लगेच सांत्वन करणं आमचं

कर्तव्यच होतं —

**बुडती हे जन पाहावे न डोळा ।**

**म्हणोनी कळवळा येई आम्हा ॥**

( अंगावरची शाल डोळ्याला लावतो तेव्हा अचानक कफनीवरचे डाग ताराच्या नजरेस पडतात. )

तारा : वाः ! त्ये काय इचारावं ? तुज्या कफनीवर उमटलेलं रंगीच्या इष्काचं ताजं ताजं ठसं – तुजा कळवळा बोंबलून सांगत्याती !

श्रीधर : अरे खरंच की ! ( कफनीवरील डाग निरखून ) हे रंगेल डाग महंताचं मनोगत ओरडून सांगताहेत —

**बुडती या वेश्या, पाहातो मी डोळा।**

**म्हणोनीच चाळा – करीतसे !**

रंगूच्या रंगलेल्या ओठांचे, डोळ्यातल्या काजळाचे हे पवित्र डाग ! ह्या डागांना आणि ह्या डागेश्वर महंतांना वंदन असो ! —

महंत : अरे ! डाग डाग म्हणून आग लागल्यागत का बोंब मारताय् तुम्ही ?... अजून होळी दोन दिवसांवर आहे !... हे बघा, एखाद्याला आगीतून बाहेर काढताना ५–१० चटके बसायचेच ! चिखलात रुतलेल्या गाईला बाहेर काढताना, थोडासा तरी चिखल अंगाला लागायचाच !... मोठ्या दुःखात बुडालेली ती रंगू, आम्हाला पाहाताच बाबा ऽ ऽ असा हंबरडा फोडून आम्हाला घट्ट बिलगली, तर काय तिला प्रेमानं पोटाशी घेण्याऐवजी, ‘ चल, दूर हो ! आमची कफनी खराब होईल अन् निंदक शंख करतील ’ असं सांगून तिला दूर ढकलून द्यावं ? छेः छेः छेः ! हा असा अंगचोरपणा आम्हा उद्धारकांना शोभत नाही. म्हणूनच संत तुकोबा आपल्या अभंगवाणीतून आम्हास सांगून गेले —

कोणी वंदा, कोणी निंदा, आमचा उद्धाराचा धंदा !

तारा : पुरे रं तुझं ग्यानबा–तुकाराम, ग्यानबा–तुकाराम पुरं ! तुज्या थोबाडामंदी तुकोबाची गाथा म्हंजी ताडीच्या मडक्यात तुळशीची मंजिरी ! —

महंत : ( ओरडून ) तारे ! तोंड आवर. आमच्यासारख्या वेश्या–कल्याणकारी नरोत्तमाला उपहासाचे टोमणे मारतेस ?

श्रीधर : अहो ताराबाई, तुमच्या टोमण्यांनी या टोणग्यावर काहीही परिणाम होणार नाही. ह्याला शब्दांचा मार पुरेसा नाही. तुकाराम म्हणतात तेच खरं —

ऐशा धंदेवाल्या नरा, मोजून माराव्या पैजारा !

तारा : व्हय, व्हय – खेटरं खायचीच ह्येची लायकी आहे. बहुरंगी भामटा आहे ह्यो ! – खोटं ताईत इकतो, गंडं घालतो, तुरंत जवानीची दवाबी गळ्यामंदी बांधतो ह्यो —

श्रीधर : अरे चोरा ! म्हणजे माझ्याप्रमाणे या गरीब गणिकेलाही गंडा घातलाय्स ?

तारा : थोडाथोडका न्हाई, चांगलं २०० सुरती शिक्कं मटकावले की या बोक्यानं! मेल्यानं माझ्यासंगं लाडीगोडी लावली, आन् म्हनतो कसा मला – ह्यो बावनखनीत तू येक तारा आन् बाकी समद्या गारा! ए बोकेसंन्याशा, चल, तुझी बनावट दवा–गंडं–दोरं वापस घ्ये आन् पैसं वापस दे माझं (त्याचा हात धरते.)

महंत : (हात झटक्याने सोडवून) तारे, या बावनखणीत तमाशा करू नकोस. अग, २०० सुरती शिक्क्यांपायी आमचा जीव खाण्याऐवजी, आमची जिवल्गा हो, अन् पाहा – तुला श्रीमंतांची अव्वल दर्जाची नाटकशाळा बनवितो; सरकारदरबारचा मान मिळवून देतो!

तारा : आरं जा रं! तुज्या त्या सरकारी दरबारहून ह्यो बावनखणीचा बाजार लई ब्येस! बावनखणीच्या कलावंतिनी गोरगरीबांच्या वाटंला चुकूनबी जात न्हाईत, पर दरबारी सोदे गरीबांचंच कर्दनकाळ व्हतात! कलावंतिनी पैशाच्या लोभी असल्यात, पर जेवढा दाम तेवढं काम गिऱ्हाईकाच्या पदरात चोख टाकत्यात!

श्रीधर : दरबारी अधिकारी आणि तुम्ही त्यांची कुत्तरडी, कामं न करता, नुसते पैसे खाण्याचंच काम करता!

महंत : (ओरडून) बंद, बंद करा तुमची वाष्कळ बडबड! ... महंत असूनही आमचा संयम सुटत चाललाय्! ए तारे, आणि ए लाथाखाऊ! तुमच्यासारख्या नाठायकांशी हुज्जत घालायला आम्हाला वेळ नाही. मठात जाऊन सूक्ष्मात जायची माझी वेळ झालीय्! (उठून जाऊ लागतो.)

श्रीधर : (त्याला अडवून) सूक्ष्मात जा, मोक्षात जा, नाही तर भस्मात जा! अगोदर माझे आणि या आमच्या ताराबाईचे पैसे टाका, आणि मग खुशाल जा.

महंत : (दमात) पैसे देणार नाही!

श्रीधर : मी श्रीमंतांचा पिढीजात सावकार आहे. चक्रवाढ व्याजानं सर्व रक्कम वसूल केल्याशिवाय राहाणार नाही! माझ्याशी गाठ आहे!

महंत : (आवाज चढवून –) अरे जा रे! अशा कैक गाठी मी सोडविल्या आहेत. ए लाथाखाऊ श्रीधरा, आणि ए नाटाळ तारे, बऱ्या बोलानं चालू लागा इथून, नाही तर नतीजा बरा होणार नाही.

श्रीधर : काय करशील रे मठाचा पिटा करणाऱ्या जोगड्या?

तारा : काय करशील रं गोसावड्या?

महंत : काय करीन? माझ्यासारख्या कल्याणकारी महंताची – महामानवाची – भर चौकात बेअब्रू केल्याबद्दल फरासखान्याची वाट दाखवीन!

श्रीधर : अससं? मग मीही तुझ्या अब्रूची वेगड खरडून, तुझा नंगेपणा बावनखणीच्या वेशीवर नाही टांगून ठेवला, तर दातारांचं नाव लावणार नाही!

तारा : आन तुजी बावनखनीची वाट म्या न्हाई बंद करून टाकली, तर नावाची ताराच

न्हवं मी ! चल टाक माझं पैसं !

( दोघेही महंताशी झोंबाझोंबी करून ' हरामखोरा, आमचे पैसे टाक ' असा गलका करतात. इतक्यात मोरशास्त्री वैय्याकरणाचार्य ऊर्फ मोरबा प्रवेशतात. )

मोरबा : अगे तारे तारे ! रति–सुखसारे ! काय हे ? या महान् गणिकोद्धाराला गाल-प्रदान करण्याऐवजी गाली–प्रदान करतेस ?

तारा : ह्येच्या गालफडावर पान्च बोटं उठवायला पाह्यज्येत. तीच ह्या मुडद्याची लायकी हाय ! माज्या दोनशे सुरती शिक्क्यांचा बुक्का केलाय मेल्यानं !

मोरबा : तारे, तुझी जल्पितें पुरे. अगे, जरासें जिव्हा–नियंत्रण कर.

श्रीधर : अरे वा रे वा ! आमच्या ताराबाईला जीभ आवर म्हणून सांगण्याचा तुम्हाला काय अधिकार ?

**या महंताची कड घ्यायला का झालात अवतीर्ण ?**

**हे महंत आहेत इसब, तर तुम्ही गजकर्ण !**

मोरबा : अहो औद्धत्यम् ! काय ही निर्लज्जता, काय ही अश्लीलता !

महंत : या मोरोबांचा काय अधिकार आहे, हे लवकरच कळेल तुम्हाला – लवकरच डोळे उघडतील तुमचे आणि त्या सत्कार्य–विरोधक खंडोशंकराचे !

तारा : अग बया ! खंडोशंकर एवढा मोठा देव–माणूस, त्यास्नी कशापायी वढतायसा आपल्या ह्यो भांडनात ?

महंत : अगे, भांडणातच का, फरासखान्यातही ओढू ! तुझ्यासकट त्याला अंधार-कोटडीची वाट दाखवू...

मोरबा : त्या खंड्याला खंड–विखंडित करणार आहोत आम्ही !

तारा : आरं पर मोरबा, का ?

मोरबा : का ? त्याने आमचा बावनखणीचा मार्ग कंटकित केला. तुम्हा गणिकांची कर्ण–कुहरें फुंकून मस्तकें भ्रमित केली. ह्या भल्या माणसाच्या मागे द्रव्याचा तगादा लावण्यास तुम्हाला चिथाविलें !

श्रीधर : जाऊ द्या ताराराणी ! ही समर्थघरची श्वानं, ह्यांच्या तोंडी लागणं नको. चला, तुमची आर्थिक हानी मी भरून देतो. अहो, ह्या असंगाशी संग करण्यापेक्षा, आमची संगत सुखावह ! ह्यांना काय करायचंय् ते ह्यांना करू द्या...

तारा : आन् आपल्याला जे काय करायचंय् ते आपुन करूच या !...( तारा श्रीधरपंताला घेऊन जाते. )

मोरबा : साधु, साधु ! छान फरासखान्याची धमकी दिलीत गुलामांना. काहीही म्हणा महंत, तुमच्या तंबीमुळेच त्या श्रीधराने तारेसह पलायन केले !

महंत : वेडे आहात शास्त्रीबुवा. अहो साहुकारनंदन आहे तो. सर्व रक्कम सव्याज वसूल करील.

मोरबा : अहो भ्रम आहे तुमचा. व्याजाचें सोडा — त्याला म्हणावें, गुंतवलेलें भांडवल सांभाळ म्हणजे झालें ! त्या चंपीनें डोक्यावर लाथ हाणली, आता ही तारा कुठे लाथ मारते ते बघू या !...पण एवढ्यानें भागायचें नाही. त्या खंडयाची खोड भग्न करणें नितांत आवश्यक आहे.

महंत : ते फारसं कठीण नाही शास्त्रीबुवा. आधीच बार ठासून भरलाय् आपण.

मोरबा : मग स्फुलिंग टाकण्यास विलंब का ?

महंत : विलंब मुळीच नाही. त्याच्या त्या चंद्रीला श्रीमंतांकडून होलिकोत्सवाचं निमंत्रण पाठविलं की, एक पंथ दो काज ! काय म्हणे, फक्त देवापुढेच गाते ती, आमच्यापुढे नाही. बस्स. त्या चंद्रीवरून श्रीमंतांशी खंडयाचा खटका उडाला की आपलं काम फत्ते !

मोरबा : मग आपणच चंद्रीचे देव ! चला. पण तो तारीचा विषय डोक्यातून काढून टाका. अहो, देव तारी त्याला कोण मारी ?

महंत : कबूल, कबूल —

**चला मोरबा ! आपण काढू काढ्यने हा काटा ।**
**त्याच्या गर्वा हां हां म्हणता दावू बारा वाटा ।**
**कान धन्याचे भरा । यश ते येइल सहज घरां ॥**

(दोघेही हातात हात घालून खुषीने जातात.)

## दृश्य चवथे

(चंद्रा चंदेरीकर आपल्या दिवाणखान्यात, स्वतःशीच भजन म्हणत बसली आहे — )

**श्रीहरी गिरिधारी गोपाळ**
**करिल तुझा सांभाळ !**
**धेनु चारितो वृंदावनि तो, राधेचा लडिवाळ !**
**मोर–मुकुट–पीतांबर शोभे धन–चंदन–वनमाळ !**

(तंबोऱ्याच्या सुरेल झंकारात सुरेल आवाजात हे भजन चालू असताना, खंडोशंकर प्रवेश करतो. त्याच्या हातात वस्त्राने आच्छादिलेले तबक आहे. तो अस्वस्थ आहे.)

खंडोशंकर : (हाक मारतो.) चंद्रा ऽ ऽ (चंद्रा भजनसमाधीत दंग आहे. भजनसमाधी मोडावी की मोडू नये अशा विचाराने खंडोशंकर चुळबुळतो. नंतर जवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात ठेवून, पुन्हा हाक मारतो.) — चंद्राऽऽ —

चंद्रा : ( तंद्रीतून जागी होऊन पाहाते तो समोर खंडोशंकर. ) अगं बाई ! कधी आलात तुम्ही ?

खंडोशंकर : भजनसमाधीत दंग होतीस तेव्हा.

चंद्रा : ( खंडोशंकरच्या हातातील तबकाकडे तिचे लक्ष जाते. ) हे काय ? तुमच्या हातात नेहमी साजांची करंडी असते, आज हे झाकलेलं तबक कसलं ?

खंडोशंकर : श्रीमंतांचं निमंत्रण !

चंद्रा : म्हणजे ?

खंडोशंकर : तुझा—माझा नक्षा उतरविण्यासाठी हा निमंत्रणाचा नजराणा !

चंद्रा : नजराणा तुमच्या हातून ?

खंडोशंकर : ( उपहासाने ) माझ्याइतका इमानी चाकर श्रीमंतांना दुसरा कोण मिळणार ?

चंद्रा : तुम्ही काय सांगता आहात, बोलता आहात ते माझ्या काही लक्षात येत नाही. नीट उलगडून सांगा ना.

खंडोशंकर : श्रीमंतांचा आणि माझा खटका उडाला तुझ्यावरून !

चंद्रा : माझ्यावरून ? तो का ?

खंडोशंकर : ‘ उद्याच्या होलिकोत्सवात चंद्राचं गाणं झालंच पाहिजे ’ अशी त्यांनी मला आज्ञा केली म्हणून.

चंद्रा : आश्चर्य आहे. श्रीनारायणाखेरीज कुणाही नरापुढे नृत्यगायन न करण्याचं माझं कडक व्रत, श्रीमंतांना जर कुणी सांगितलं असतं, तर त्यांनी...

खंडोशंकर : कुणी कशाला ? मी स्वतःच त्यांना हे सांगितलं, तर मलाच त्यांनी उलट प्रश्न केला की, ‘ राजा हा ईश्वरी अवतार, मग त्याच्यापुढे गायला कोणती हरकत ? ’

चंद्रा : स्वतःला ईश्वरी अवतार म्हटल्यानं तो काही परमेश्वर ठरत नाही. ते प्रजेनं ठरवायचं असतं. मी काही त्यांची चाकरदार नाही, ताबेदार नाही.

खंडोशंकर : पण मी आहे ना. म्हणूनच विसाजीपंतांना त्यांनी आज्ञा केली. ‘ निमंत्रणाचा नजराणा खंडोशंकरच्या हातूनच चंद्राकडे पाठवून द्या आणि उद्याच्या उत्सवात तिला हजर करा.’

चंद्रा : तुमच्या हाती निमंत्रणाचा नजराणा पाठवून माझ्या व्रताचा आणि त्यातूनही तुमच्यासारख्या रसिकांचा, श्रीमंतांनी बुद्धिपुरस्सर केलेला हा अपमान, मी कधीही सहन करणार नाही. ( पुढे येऊन तबक उचलते. ) निमंत्रणाचा हा नजराणा असाच्या असाच... ( तिला पुढे म्हणायचे आहे – ‘ मी परत पाठवून देणार ’ – तोच विसाजीपंत प्रवेश करतात. )

विसाजी : आपण स्वीकारावा अशी माझी आपणास विनंती आहे! त्यातच तुम्हा उभयतांचं कल्याण आहे ! आणि तेच सांगण्यासाठी मी मुद्दाम इथे आलो —

चंद्रा : पण विसाजीपंत, माझे–त्यांचे संबंध आणि माझं व्रत माहीत आहे ना तुम्हाला !

विसाजी : होय, माहीत आहे.

खंडोशंकर : असं असूनही निमंत्रण स्वीकारून व्रतभंग करायला तुम्ही का सांगता आहात ?

विसाजी : तुम्हा दोघांविषयीच्या आदरानं, प्रेमानं.

खंडोशंकर : मग त्याच नात्यानं मी तुम्हाला सांगतो की या व्यक्तिगत प्रकरणात तुम्ही अजिबात लक्ष घालू नका.

विसाजी : ते होणं नाही ! रागावू नका खंडोशंकरजी. श्रीमंतांनी निमंत्रणाचा नजराणा तुम्हाला घेऊन जाण्याची जेव्हा आज्ञा केली, तेव्हा आम्हाला मनातून यातना झाल्या नसतील असं का तुम्हाला वाटतं ? श्रीमंतांचे आपण चाकरदार असलो तरी एकमेकांचे मित्र आहोत. त्याच भावनेतून, तुम्ही निघून गेल्यावर, श्रीमंतांना मी परोपरीनं समजाविण्याचा प्रयत्न केला. पण...

खंडोशंकर : पण काय ? त्यांनी आपला हट्ट, हेका सोडला नाही, असंच ना ?

विसाजी : तेवढ्यावरच हे प्रकरण थांबतं तर तुम्हाला सावध करायला मी इथे आलो नसतो कदाचित्. कोतवालाचं काम स्वतःच्या अंगावर घेऊन मी इथे आलो ते श्रीमंतांचं फर्मान तुमच्या कानांवर घालण्यासाठी.

चंद्रा : फर्मान ? कसलं फर्मान — ?

विसाजी : ऐका. ( थैलीतून फर्मान काढून वाचतो. ) आमच्या निमंत्रणानुसार होळिकोत्सवानिमित्त जर चंद्रानं शुक्रवारवाड्यात गायनास येण्यास नकार दिला, तर त्याबद्दल खंडोशंकरास कडक सजा देण्यात यावी —

चंद्रा : वा ! हा तर उलटाच न्याय झाला म्हणायचा ! विसाजीपंत, गुणवंतावर कलावंतावर फर्मानाच्या फटकाऱ्यानं आपली इच्छा लादणं फक्त लहरी राज्यकर्त्यांनाच शोभतं !

विसाजी : मान्य, एकदम मान्य – पण चंद्राजी, खंडोशंकरांनी गायनाच्या निर्मळ फर्माईशीला जर दाद दिली असती, तर श्रीमंतांनी आपली इच्छा लादण्याचा प्रश्नच उरला नसता. तत्त्वाला व्यवहाराची सांगड घालाल, तर अजूनही हा प्रश्न, हे संकट, सहज टाळता येईल.

चंद्रा : ते कसं ?

विसाजी : तुम्ही तुमच्या कडक नियमाला फक्त एकदाच अपवाद करून !

खंडोशंकर : एकदा तरी नियमाला अपवाद का करायचा ? मला सजा होईल, फार फार तर मृत्युदंडाची कडक सजा होईल, म्हणून ? होऊ दे – खुशाल होऊ दे. त्यालाही माझी तयारी आहे.

विसाजी : पण आमची नाही. आम्ही तुमचे मित्र. चंद्राजीच्या एका नियमभंगापेक्षा तुम्हाला होणारी कोणतीही सजा – तुमचा मानभंग – आम्हाला जास्त दुःखकारक वाटतो !

खंडोशंकर : चंद्राच्या व्रतपालनासाठी तुम्हाला हे दुःख सहन केलंच पाहिजे. चंद्रा, माझ्या मोहात गुंतून कलाकारांचा बाणा सोडून, तू व्रतभंग करण्याचं मनातसुद्धा आणू नकोस.

विसाजी : खंडोशंकर, तुम्ही तुमचा हट्ट का लादता त्यांच्यावर? त्यांचा निर्णय त्यांनाच घेऊ द्या. नियमाला अपवाद करून तुमची सजा टाळावी असं जर त्यांना वाटलं तर? चंद्राजी, मला सांगा, मी काय निरोप देऊ श्रीमंतांना? तुम्ही आमंत्रण स्वीकारलंत की धिक्कारलंत?

चंद्रा : थांबा. मी गोंधळून गेले आहे. मी देवाला कौल लावते.

खंडोशंकर : जरुरी नाही देवाला कौल लावण्याची. सामान्य गोष्टीसाठी देवाला साकडं घालणं योग्य नाही.

विसाजी : मग काय, माझ्या अव्यवहारी पण सद्‌गुणी सत्प्रवृत्त मित्राला, राजलहरीपायी देहदंड भोगू देणं योग्य आहे? की त्याच्या कट्टर वैऱ्यांना आनंदाच्या उकळ्या फुटू देणं योग्य आहे?

खंडोशंकर : विसाजीपंत, बुद्धिभेद करू नका! बावनखणीतील हीच एक गायिका अशी आहे की बड्या बड्या शेठ–साहुकारांच्या संपत्तीची रुपेरी–सोनेरी बेडी तिच्या गान–सरस्वतीला जखडू शकली नाही! कोणत्याही धनाढ्य सरदारांचे रंगमहाल तिच्या पवित्र सुरांना दूषित करू शकले नाहीत!

विसाजी : पण खंडोशंकर, धनमत्त शेठ–सावकारांपुढे नव्हे, तर रसिकवर्य बाजीराव-साहेबांच्यापुढे त्यांनी गायचं आहे, हे तुम्ही विसरू नका.

खंडोशंकर : आणि तुम्हीही हे विसरू नका की ह्या व्रतपालनाची कसोटी पुण्याच्या शेठ-साहुकारांना नकार देण्यात नव्हे, तर पुण्याचे अनभिषिक्त राजे श्रीमंत पेशवे ह्यांना नकार देण्यात आहे! त्यांच्यालातरही व्रतभंग न केला, तरच 'व्रतधारिणी कलावती' ही ह्या चंद्राची कीर्ती अजरामर होईल!

चंद्रा : तुमच्या बरबादीनं टवटवीत बनलेले कीर्तीचे हारतुरे घेऊन मी काय करू? लहरी राजांकडून माझ्या प्रीतीचा हा सुवर्णतुरा पायदळी तुडविला जाण्यापेक्षा, माझ्या कीर्ति–मंदिराचा कळस कापला गेला तर काय बिघडलं? नश्वर कीर्तीच्या मोहात पडून, पृथ्वीमोल प्रीती कां कुस्करूं?

खंडोशंकर : चंद्रा, माझ्या प्रेमानं अंध होऊन हा असा भलता अविचार करू नकोस. शांत मनानं विचार कर. प्रीती पृथ्वीमोल खरी, पण जसा प्राणविरहित देह, तसाच तत्त्वरहित व्यवहार मातीमोल असतो!

विसाजी : चंद्राजी, मला आता निघायलाच हवं. मला अखेरचं सांगा, श्रीमंतांना काय निरोप द्यायचा?...

चंद्रा : विसाजीपंत, व्रताला तलवारीच्या धारेची उपमा का देतात, हे आज खरंखुरं कळलं!

(जरा थांबून, विचार करून) सांगा श्रीमंतांना, चंद्रा येईल!

खंडोशंकर : चंद्रा ऽ! काय करतेस तू हे!

चंद्रा : योग्य तेच करतेय्. माझ्या परमेश्वरा, विश्वास ठेवा माझ्यावर. माझ्या हृदयस्थ नारायणाचा कौलच प्रमाण मानलाय मी. त्या अंतर्यामी सर्वसाक्षी नारायणाच्या कृपेची ढाल, इंद्राच्या वज्रानंही भंग पावणार नाही! त्या नारायणालाच आता माझी लाज, ह्या श्रद्धेनंच सांगते, श्रीमंतांना बिनधास्त कळवा की चंद्रा तुमच्या मैफलीत गाईल!... माझ्या जीवनमंदिराच्या सर्वेश्वरा, मला निःशंक मनानं आशीर्वाद द्या —

(चंद्रा खंडोशंकराकडे भक्तिभावाने पाहाते. खंडोशंकर तिच्या श्रद्धायुक्त आवेशाकडे कौतुकमिश्रित स्तिमित नजरेने पाहातो, तोच पडदा पडतो. द्वितीय अंक समाप्त.)

# अंक तिसरा

(स्थळ : श्रीमंत बाजीराव पेशवे ह्यांचा शुक्रवारवाडा. होलिकोत्सवाच्या संगीत–नृत्य–मैफलीसाठी श्रीधरपंत, मल्हारजी, बसंती, तबलजी, ढोलकी-वाला, सारंगिया इत्यादी कलाकार मंडळी, तसेच मोरबा, मदनराव, सर्जेराव, महंत ही चांडाळ चौकडी उपस्थित आहे. हे सर्वजण मध्यवर्ती मुख्य बैठकीच्या आजूबाजूस स्थानापन्न आहेत, आणि श्रीमंत बाजीरावसाहेबांची नि गायिका चंद्रा ह्यांची प्रतीक्षा करीत, आपापसात आपापल्या वृत्तीनुसार बोलत आहेत. तोच पडदा उघडतो.)

श्रीधर : वाहवा ! आजच्या होलिकोत्सव मैफलीचा थाट नि घाट अपूर्व आहे. मल्हारजी, खूप मौज येणार आज !

मल्हारजी : आज होळीचा रंग खुलणार !

महंत : त्याबरोबरच खंडोशंकरच्या रंगाचा बेरंग होणार !

मोरशास्त्री : आणि त्याचा नासिका–विच्छेदही होणार !

महंत : साधासुधा नव्हे, अगदी तळापासून कापलं जाणार त्याचं नाक !

श्रीधर : (उसळून) अरे गप्प बसा ना जरा !

मल्हारजी : तर काय, मघापासून सुरू आहे त्यांची मत्सरी गुणगुण !

बसंती : एखाद्याच्या पाठीमागे अशी निंदानालस्ती करायला लाज नाही का वाटत तुम्हाला ?

महंत : मागेच का ? पुढेही करू की त्याची निंदा !

मोरबा : आमच्या साळूच्या दिव्य प्रीतीत भल्लातक घालणारा नीच तो ! आम्ही तर त्याला तोंडावर आव्हानिलें होतें ! तुझा नक्षा साफ अवतीर्ण करू ऐसे बजावले होते !

मदनराव : ते आव्हान आज यशस्वी होणार ! कोणत्याही परपुरुषासमोर न गाण्याचा तिचा निर्धार —

मोरशास्त्री : खंड्यासह खड्ड्यात गेला ! तुम्ही परपुरुष, आम्ही कापुरुष, अन् तिचा परमपुरुष कोण ? तर तो खंड्या !

महंत : आज जेव्हा ती इथे आमच्यासमोर गाईल, तेव्हा...

श्रीधर : अहो, ती बाजीरावसाहेबांपुढे गाणार आहे, तुम्हा संगीत–शत्रूंपुढे नव्हे ! चंद्रिका प्रकाशते चकोरांसाठी, कावळ्यांसाठी नव्हे !

मल्हारजी : तशीच आमची बावनखणीची चंद्रा गाणार आहे श्रीमंतांसाठी, रसिकांसाठी.

तुम्हा कावळ्यांच्या कानावर तिचे सूर आदळतील इतकंच !

मदनराव : अरे, पण इथे गाणं हवंय कुणाला ? मी तर आलोय तिचा रंगलेला मुखडा पाहायला !

महंत : अन् आम्ही आलोय् खंड्याचं काळवंडलेलं थोबाड बघायला !

(इतक्यात श्यामदुलारी नृत्याच्या पोशाखात येते. त्यासरशी लंपटाचार्य मदनराव, मोरबा, महंत जागचे उठून जणू तिच्या स्वागतार्थ पुढे जातात व तिला जणू घेराव घालतात.)

मदनराव : आईये, आईये श्यामदुलारीजी ! अभ्भीच इस मैफल को खरीखुरी शोभा आयी !

श्यामदुलारी : धन्यवाद !

महंत : श्यामदुलारी, ये मेरा हनुमान गंडा और रामरक्षा ताईत लीजिये !...

श्यामदुलारी : धन्यवाद ! लेकिन इस की कोई जरूरत नही है मुझे...

महंत : तो भी लेना और देखनाच चमत्कार ! बहोत गुणकारी है, और मोफतच दिया है — हमारे प्रेम की भेट !

श्यामदुलारी : अच्छा जी ! (ताईत–गंडा घेते.)

मोरबा : हे वाराणसी–नृत्य–सौदामिनी ! स्वागतम्, स्वागतम् ! आम्ही तुम्हारे बहुत दर्शनाभिलाषी थे. तुम्हारी कीर्ती कर्णपथपर आयी थी. बहुत्तर आनंद हो गया.

श्यामदुलारी : धन्यवाद पंडितजी, धन्यवाद !

मदनराव : आज ऐसी नाचो, ऐसी नाचो श्यामदुलारीजी, की उस का गाना फिक्काच पडना चाहिये !

श्यामदुलारी : उस का ? याने किस का ?

मदनराव : आज की मेहमानीण वो बानवखनी की चंद्रा !

महंत : मालूम नही ? उस खतरनाक गजरेवाले की चेली !

मदनराव : गाने मे विशेष नाही, लेकिन् दूसरे के गाने को नाक मुरडने मे बडी हुशार !

श्यामदुलारी : अजी नही नही ! उस की बहोत शोहरत सुनी है हमने ! बेमिसाल घरंदाज गानेवाली है वो !

मदनराव : घरंदाज ? दिखता है, वैसा नही होता है !

मोरबा : घरंदाज हो अथवा न हो ! तुम्हारे नवनवोन्मेषशाली संगीत–नृत्य–विन्यास के सामने वो चंद्रा म्हणजे दर्या मे खसखस !

श्यामदुलारी : अच्छाजी, आप की एहसानमंद हूं, आभारी हूं ! अब मेरे स्थान पर जाने की मै इजाजत चाहती हूं !

मदनराव : हां, हां, जाईये. परंतु कल सावकाश मिलेंगे.

श्यामदुलारी : (आपल्या स्थानी येऊन बसण्यापूर्वी ती एक तिरस्काराचा कटाक्ष चांडाळ–

चौकडीकडे टाकून म्हणते – )

हाये रामा! इतने अच्छे मेहफिल मे ये ऐसे बेवकूब ?

खिलते है बुलबुलों के जहाँ

गाने नये नये।

ऐसे चमन में आज ये

उल्लू भी आ गये!॥

(उपस्थित कलाकारांना नमस्कार करून स्थानपन्न होते. इकडे चांडाळ–चौकडीची आपसात बातचीत सुरू होते.)

मदनराव : अहो महंत, त्या चंद्राच्या गाण्यापेक्षा ह्या गुलजार गुलछडीचा नाचच का ठेवला नाही आज ? काय चमक धमक आहे ह्या बिजलीची!

महंत : खरं आहे, खरं आहे. नखऱ्यात नरमाई, बोलण्यात मिठाई...

मोरबा : छातीची गोलाई –

मदनराव : पण आपली काय कमाई ?

महंत : उद्या तिच्या कोठीवर जाऊन करू हो ते काम! आज नि आत्ता गाण्याला दाद बरोबर द्या म्हणजे झालं.

मोरबा : चिंताकुलित न होणे! रसिकत्व–प्रदर्शनात कसूर होणार नाही. वाहवा, बहोत खूबचा भडिमार समर्पित करू!

मदनराव : करा, भडिमार करा, पण योग्य ठिकाणी योग्य वेळी करा!

(इतक्यात खंडोशंकर मैफलीत प्रवेश करतो. त्यासरशी मैफलीत क्षणभर स्तब्धता नि नंतर थोडी कुजबूज – )

मदनराव : अहो हळू बोला! आलाच तो!

मोरबा : अहो निर्लज्जता! मी त्याच्या स्थानी असतो, तर ऐसा अपमान भोगण्यापेक्षा मान कापून दिली असती!

श्रीधर : नमस्ते खंडोशंकरजी!

खंडोशंकर : जय जय, जय जय! (कलाकारांकडे वळून – ) काय, सर्व तयारी आहे ना ?

श्रीधर : सारेजण तयारच आहेत!

खंडोशंकर : ठीक, ठीक! उत्तम होऊन जाऊ द्या!

(इतक्यात चंद्राला घेऊन विसाजीपंत प्रवेशतात.)

मदनराव : मोरबा, ही मैना खंडोशंकरच्या पिंजऱ्यातून सुटली, पण आता श्रीमंतांच्या सोनेरी पिंजऱ्यात लटकणार!

मोरबा : लटकेना श्रीमंतांच्या सुवर्णपंजरात! खंड्याचें तर नासिका–विच्छेदन झालें!

महंत : खंडोशंकरला म्हणावं, बैस लेका नुसतेच गजरे बांधत! आमच्या गणिकोद्धारात विघ्नं आणण्याचं कडवट फळ भोग आता!

(इतक्यात आतून भालदाराची ललकारी– ' बा आदब, बा मुलाहिजा, होशयाऽऽर ! श्रीमंत बाजीराव पेशवे आ रहे है.' विसाजीपंत सामोरे जातात. श्रीमंत पेशवे प्रवेश करतात. सर्वजण उठून त्यांना खडी ताजीम देतात.)

बाजीराव : (दिवाणखान्यात सर्वत्र नजर टाकून –) उत्तम, उत्तमोत्तम ! विसाजीपंत, आज आपल्या ह्या वाड्याला, ह्या मैफलीला तुम्ही उत्तमच शोभा आणलीत.

विसाजी : विशेष काहीच केलं नाही श्रीमंत. ही तर सालमजकुरासारखी सजावट !

बाजीराव : अहो, मैफलीची खरी सजावट, खरी शोभा म्हणजे नक्षत्रांप्रमाणे चमकणारे हे गुणीजन ! वाः ! आज तर दुर्मीळ कलारत्नं तुम्ही ह्या संगीत–नृत्य–सभेच्या कोंदणात बसविलीत. ' बहुरत्नं पुण्यपत्तनम् ' ही उक्ती सार्थ केलीत !

विसाजी : श्रीमंत, आपल्यासारख्या कदरदानाची ही कृपा ! ... ही खंडोशंकरची शिष्य चंद्राजी.

बाजीराव : केवळ आश्रयदात्याच्या कृपेनं काहीच होत नाही विसाजी. गुणीजनांशिवाय कृपा वंध्याच ठरते. अहो, कृपेची किरणं चिखलावर पडून काय उपयोग ? ती धन्यता पावतात कमळांचा विकास करून ! तेव्हा आता आमच्या त्या कला–कमळांचा सुगंध इथे दरवळण्याआधीच, आमच्या वतीनं त्यांचं सुगंधी स्वागत होऊ द्या !...
(स्वतः स्थानपन्न होऊन सर्वांना बसण्याचा इशारा देतात.)

विसाजी : जशी स्वामींची आज्ञा ! खंडोशंकरजी –
(खंडोशंकर गजऱ्यांच्या करंडयातून चार निवडक गजरे काढून, ते स्वतः बाजीराव, चंद्रा, बसंती, श्यामदुलारी ह्यांना क्रमशः बांधतो. नंतर उरलेले गजरे वाटण्याचे काम तो श्यामदुलारीवर सोपवितो. म्हणतो – ' बेटा, झटपट गजरे बाटून ये ' ती खंडोशंकर, श्रीधरपंत इत्यादींना गजरे देते; पण महंत, मोरबा, मदनराव, सर्जेराव ह्या चौकडीला गजरे न देताच परतते. साहजिकच ते जागच्या जागी चरफडतात मोरबा तर तिला आपले रिकामे हात दाखवितो. मग ती त्या चौकडीला दुरूनच गजरे देते. तोच – )

विसाजी : श्रीमंत, सारी मैफल आता गानदेवतेच्या पूजनास सिद्ध आहे. कलाकारांची कर्णसंपुटं आपल्या आज्ञेच्या स्वातिबिंदूसाठी तहानलेली आहेत !

बाजीराव : विसाजी, खरे पुसाल तर आम्ही इथे आज्ञा करणं युक्त नाही. इथे आम्ही कोण हुकूम करणारे ? इथे खरी हुकूमत स्वरांचीच आहे – असायला पाहिजे. आम्ही इथे सूरसागरात बुडायला आलो आहोत !

तंत्रीनाद, कवित्त–रस सरस–राग रतिरंग ।
अनबूडे सो बूडे, तिरे जो बूडे सब अंग ! ।।

अहो, सरस रागांच्या रतिरंगात – म्हणजे शृंगारात – जो बुडत नाही, तोच बुडाला

समजा! आणि तरला कोण? तर जो बूडे सब अंग!
(विसाजी, चंद्रा, बसंती, श्यामदुलारी, श्रीधर इत्यादी, वा:, वाहवा, म्हणून मुजरा करतात.)

बाजीराव : (चंद्राकडे कटाक्ष टाकून –) समजलं ना? जो इथे सर्वथा बुडाल्यागत वाटतो, तो बुडालेला नसतोच मुळी! तोच तरलेला असतो! जो हरला असं जगाला वाटत असतं, तोच जिंकलेला असतो! (चांडाळचौकडीकडे पाहून –) ज्यांना आपली जीत झाल्यागत वाटत असते, तेच फजित झालेले असतात! (पुनश्च चंद्राकडे वळून) हं, तर चंद्राबाई, बुडवा, बुडवा सर्वांना सूर–कल्लोळात!
(चंद्रा उठते. प्रथमत: खंडोशंकरला वाकून नमस्कार करते. नंतर श्रीमंत बाजीरावांना. ह्याचा फायदा घेण्यासाठी महंत–मोरवा–मदनराव दबक्या आवाजात विसाजीपंतांना म्हणतात – 'हे काय? प्रथम खंडोबाला नमस्कार? श्रीमंतांचा अपमान झालाय हा!')

विसाजी : (गोंधळून –) श्रीमंत... श्रीमंत...
(बाजीराव एका हाताने विसाजीला जणू काही 'घाबरू नका, विशेष काही नाही' असा इशारा करून, दुसऱ्या हाताने चंद्राला गायन सुरू करण्याची इशारत देतात. चंद्राचे तंबोरे झंकारतात. चंद्रा डोळे मिटून कुलदेवतेचे स्मरण करते आणि खालचा षड्ज लावते, तोच अरसिक चांडाळचौकडी 'वाहवा, वाहवा' करून आपल्या रसिकत्वाचे प्रदर्शन करते. तिने एक लहानसा आलाप घेताच 'वाहवा' ची धूम उठवितात... तिची एकाग्रता भंग पावते. ती त्रासिक स्वरात विसाजीपंतांना विनविते–)

चंद्रा : विसाजीपंत, श्रीमंतांना सांगावं की, नको त्या माणसांनी, नको तिथे दाद दिल्यानं आमची गानसमाधी भंग पावते; म्हणूनच विनंती ही की...

विसाजी : आलं लक्षात... श्रीमंतांच्या वतीनं आम्ही सर्व रसिकांना फर्मावतो की कलाकाराचा चित्तविक्षेप होईल असं काहीही करू नये. संगीताचे जाणकार असे श्रीमंतच दाद देतील. अन्य कुणी दाद दिल्यास त्याला कडक शासन होईल!... हं, चालू द्या चंद्राजी, तुमचं सुरेल गायन.

चंद्रा : (चीज सुरू करते.)

**मोरे महाराज आये हैं आज**
**तोरे दरबार राजन् के राज ॥ ध्रु. ॥**

(ही अस्ताई एका उच्च बिंदूकडे जात असता, चंद्रा एक चढती तान घेऊन तारषड्जावर मोठ्या खुबसूरतीने स्थिरावते, तेव्हा अचानक खंडोशंकरच्या मुखातून 'वाहवा, बहोत अच्छे!' अशी दाद उत्स्फूर्तपणे बाहेर पडते. तो

चंद्राकडे कौतुकाने नि चंद्रा त्याच्याकडे आनंदभरित नजरेने पाहाते. पण त्याच वेळी, 'आता काय होणार?' अशी भयशंकित भावना मैफलीत तरळते. महंत-मोरबादि चौकडी मात्र खूष होऊन कुजबुजते. )

मोरबा : आता फरासखान्यात शंभर फटके!

मदनराव : अंधारकोठडीत खितपत पडेल लेकाचा!

( तोच विसाजीपंत कर्तव्यकठोर स्वरात उद्गारतात — )

विसाजी : खंडोशंकर, तुम्ही नियमभंग केलात. श्रीमंतांची आज्ञा मोडलीत. ह्याचा 'बुरा अंजाम होईल. जा, तावडतोब मैफल सोडून, सजेची वाट पाहात बाहेर उभे राहा! जा, निघून जा!

खंडोशंकर : ( जणू भानावर येऊन — ) अं? हं! आज्ञा प्रमाण!

( खाली मान घालून जाऊ लागतो, तोच श्रीमंत पेशवे हात उंच उभारून त्याला थांबण्याची खूण करतात आणि चंद्राला म्हणतात — )

बाजीराव : चंद्रा, गाणं का थांबवलंस?... दाद घेण्याचंही भान गानसमाधीत असायला नको!

चंद्रा : कसूर माफ करा सरकार!

( जणू डिवचल्यागत जिद्दीने अंतरा म्हणते — )

**ओ मोरे सजना मोरे सिरताज**
**लाये हैं ( हमने ) सुरन् के ताज**
**मोतियन् हार — रसीली तान**
**बनाएंगे ( हम ) उसी का साज**

( केवळ बाजीरावसाहेबच वरील गीताला ठायी ठायी वाहवाची दाद देताहेत. खोट्या रसिकांची, महंत-मोरबा मंडळींची पंचाईत झाली आहे. इतर लोक मान डोलावितात, ताल धरतात, पण हे संगीतशत्रू मख्ख पुतळ्या-सारखे बसले आहेत. तोच एक सुंदर तिय्या घेऊन चंद्रा गीत समाप्त करते. )

बाजीराव : वाहवा! बहोत खूब! उत्तम! धन्य ही गायनी कळा!

मोरबा : ( उठून, खवचटपणाने ) धन्य धन्य ही गायनी कळा! पण त्याहूनही धन्य आपण आहात श्रीमंत! कारण केवळ आपल्याचखातर ह्या खंडोशंकराच्या मानिनीने व्रतभंग करून ह्या इथे गायन केले!

बाजीराव : नाही मोरबा, नाही तिचा व्रतभंग झालाच नाही. आम्ही तो होऊच दिला नाही.

चंद्रा : असं कसं म्हणता श्रीमंत? आपल्या ह्या मैफलीत...

बाजीराव : होय, ह्या मैफलीतच तू गाणं म्हटलंस, पण ते तुझ्या परमेश्वरापुढेच — ह्या खंडो-शंकरापुढेच! म्हणून तर त्यालाच प्रथमतः वंदन केलंस तू... अजाण पोरी, तुझा नियम मोडला जाऊ नये यासाठीच आम्हीही त्याला मैफलीबाहेर जाऊ दिलं नाही!

विसाजी : धन्य, धन्य! श्रीमंत, आपण धन्य आहात!

बाजीराव : आहोतच आम्ही धन्य – पण ते ह्या चंद्रासारख्या व्रतस्थ गुणीजनांमुळे! चंद्रा, आम्ही तुझ्या गायनाहूनही तुझ्या निष्ठावंत वृत्तीवर बेहद्द खूष झालो आहोत. म्हणूनच म्हणतो, काय वाटेल ते बक्षीस आज मागून घे.

चंद्रा : कृपावंत दयावंत सरकार!... फक्त एकच मागणं आहे. आणि ... आणि ... ते म्हणजे...

विसाजी : बोल, अडखळू नकोस. सरकारांची दिलदारी मशहूर आहे. बोल.

चंद्रा : मागणं इतकंच की, माझ्या दैवताला – खंडोशंकरजींना – नियम मोडल्याबद्दल काहीही सजा होऊ नये.

बाजीराव : (खोट्या रागाने) छेः छेः छेः! अशी भलतीच मागणी तू मागशील ही कल्पना नव्हती. खंडोशंकर हे आमचे चाकर आहेत. आमचा हुकूम पाळण्याची सर्वांत जास्त जबाबदारी त्यांच्यावर असूनही, त्यांनी भर मैफलीत दाद देऊन आमचा हुकूम मोडला, हे आम्ही कसं बरदाश्त करावं?

विसाजी : (अजीजीने –) श्रीमंत, दया करा. खंडोशंकरांची इतक्या वर्षांची सेवाचाकरी लक्षात घेऊन, चंद्राची विनंती...

बाजीराव : नाही, नाही. आम्ही जर ही भलतीच बक्षिसी चंद्राला बहाल केली, तर शिस्त काय उरेल? आमचे नोकरचाकर डोईजड होतील!

खंडोशंकर : (पुढे होऊन –) महाराज, आपला विचार योग्यच आहे. कृतापराधाबद्दल मला कठोरातलं कठोर शासन होणंच उचित. मग त्यापायी माझ्या पिढीजाद वतनदारीला नि चाकरीला मुकावं लागलं तरी ते मी मुकाट सहन करीन! आजपासून मी श्रीमंतांचा चाकर नाही!

बाजीराव : म्हणजे? याचा अर्थ काय?...

खंडोशंकर : ह्या मैफलीत आज मी पाऊल टाकलं ते आपला सामान्य प्रजाजन म्हणून – रसिक म्हणून. महाराज, मी केवळ पिंड–पोषणार्थ आपल्या चाकरीत कधीच नव्हतो, कधीच राहाणारही नाही.

बाजीराव : (खोट्या रागाने –) मग्रूरीचा कहर! आम्ही इथल्या इथे ह्या बेछूट इसमाला कडक सजा फर्मावतो की ..

चंद्रा : (पुढे सरसावून) श्रीमंत, आपण वचनाचे पक्के आहात ही कीर्ती खरी करावी.

बाजीराव : चंद्रा, राज्यकर्त्यांनी वेळप्रसंगी क्षुल्लक वचनभंगाची चूक करावी, पण अपराधावर दयेचं पांघरूण कधीही घालू नये. (महंत–मोरबा ह्यांच्याकडे वळून –) विद्वत्जनहो, तुमचा काय सल्ला आहे?

महंत : श्रीमंत, आपला विचार अत्यंत पोक्त आहे!

मोरबा : सरकार, आपण साक्षात् अनुशासन-पर्वच आहात!

बाजीराव : तेव्हा ह्या भर मैफलीतच आम्ही ह्या चंद्राबाईच्या संगीत गुरुवर्याला – तिच्या प्रतिपरमेश्वराला – मार्मिकतेनं द द देण्याचा गुन्हा करणाऱ्या रसिकवर्याला – आमच्या ह्या खंडोशंकराला – दोन शिक्षा फर्मावतो. एक : तो आमच्या चाकरीतून कधीही मुक्त केला जाणार नाही. दुसरी सजा अशी की, होलिकोत्सवाच्या ह्या मंगलदिनी, आत्ताच नि इथेच, त्यानं त्याच्या लाडक्या बावनखणीचा कला–वसंत फुलवावा. सकल रसिकांना सुरांच्या सोनेरी हिंदोळ्यावर बसवावं ! ( महंताकडे वळून ) काय हो महाबळेश्वर, ह्या दोन्ही शिक्षा खंडोशंकरांची खोड मोडण्यास योग्य आहेत ना ?

महंत : ( गोंधळून ) अं...हो, हो, श्रीमंतांचा निर्णय योग्यच असायचा !

मोरबा : वाहवा ! ह्या निर्णयानं बावनखणीवर बावनकशी सुवर्णकलशच श्रीमंतांनी चढविला म्हणायचा !

बाजीराव : अहो, सुवर्णाचाच काय, रत्नांचाही कळस चढवावा, अशाच योग्यतेची आहे आमच्या पुण्यपत्तनाची बावनखणी...अहो, माझं हे राजवैभव आज आहे, उद्या कदाचित् असणार नाही ! हे वाडे, हे महाल, हे बगीचे आज डौलात उभे आहेत; उद्या कदाचित् ते उरणार नाहीत !... बावनखणीची वास्तूही कदाचित् नामशेष होईल... पण तिची लावणी – तिची ठुमरी – तिची गझल – तिची होरी – ह्यांची सुरेल परंपरा पिढ्यान् पिढ्या अखंड चालत राहील. ही आहे नादब्रह्माची अखंड वाहाणारी तरंगिणी. खंडोशंकर, तीच धुंद सुरांची तरंगिणी इथे प्रकट करा नि सजेतून मुक्त व्हा.

खंडोशंकर : ( मुजरा करून ) अनुगृहित आहे मी श्रीमंत. मी धन्य आहे. आता श्रीमंतांच्या पायाशी अर्जी एकच की होलिकोत्सवाच्या आमच्या कलाकारांच्या ह्या रंगभऱ्या मैफलीला श्रीमंतांनी आशीर्वाद द्यावा.

बाजीराव : अलबत् ! केवळ आशीर्वादच नव्हे तर आमचा त्यात सहभागदेखील आहे. अहो, काल्पासूनच आम्ही ह्या कलानंदात मग्न आहोत. काल बेलबागेतल्या कीर्तनात आम्ही ऐकलेली ती सुरेल गौळण आमच्या कानात अजून घुमते आहे. नुसती घुमतच नाही, तर ह्या मैफलीत शरीक व्हायला कशी अधीर झाली आहे —

**ऐक यशोदे, नटखट हरि तो**

( हा मुखडा म्हणताच कलाकार दाद देऊन मुजरा करतात. बाजीराव तो मान वाकवून स्वीकारतात आणि म्हणतात – )

**ऐक यशोदे, नटखट हरि तो**
**दहि–दुध–लोणी अमुचे हरितो**
**अमुच्या पाठीवरी मारितो, फेकुनि चेंडूला –**
**आवरी खुशालचेंडूला**

खंडोशंकर : वाहवा ! म्हणजे कीर्तनकारांनी आमच्या चंद्राची ठुमरी देकळातच उभी केली म्हणायची ! काय चंद्रा ?

चंद्रा : होय, अगदी माझीच ठुमरी —
(वरील गवळण ठुमरी ढंगात म्हणून दाखविते.)

खंडोशंकर : पण खरं सांगू का श्रीमंत? जर का आपल्या बावनखणीच्या ह्या चंद्रा–वसंती–श्यामदुलारी इत्यादी गवळणी तेव्हा गोकुळात असत्या, तर....

श्रीधर : (मध्येच –) कुणी सांगावं, गतजन्मी ह्याच खुबसूरत बला असतील त्या श्रीरंगाच्या गोपिका!

खंडोशंकर : तर त्यांनी आपली फिर्याद अशी नाजुक नरम ठुमरीत पेश केलीच नसती! ह्यांच्यातील एखादी गोपी त्या कन्हैय्यालाच आव्हान देऊन म्हणाली असती –

वसंती : (गोपिकेच्या भूमिकेत)

**तुला माझ्या प्रीतीचा ठंगा!**
**ठाउक नाही श्रीरंगा! करू नकोस रे तू दंगा!**
**श्रीपती – मी गौळण कंदुकवंती!...**

श्यामदुलारी : (गौळणीच्या भूमिकेत नृत्यझंकारासह –)

**देख देख रे देख कन्हैय्या**
**तेरे पास है एक ही गेंद**
**और वो भी है कपडे का**
**लेकिन् मुझे भगवान्ने दिया है**
**नजराना दो असली गेंदों का!**
**जोबनवंती मै हूं ग्वालन, खेलन मै गेंद को**
**आइ हूं इस ब्रिंदाबन को!**

चंद्रा : (श्यामदुलारीच्या नृत्य–गीताने उत्तेजित होऊन गाते. श्यामदुलारी गीतास नृत्याची साथ देते.)

**कंदुकवंती मी नवयुवती झेलिन हो चेंडुला**
**खेळविन खुशालचेंडूला॥ ध्रु.॥**

**मृदुल कराने थोपटता–थापटता**
**चंचल कंकण रुणझुणता–किणकिणता**
**हा कामातुर, उसळे वर वर, बिलगत अंगाला**
**खेळविन खुशालचेंडूला ...**

**कधी कधी या मिळते–अवचट ते**
**चुंबन माझे चुटपुटते–झटपट ते**
**चावट मेला, छेल छबेला, तरीहि आवडला**

खेळविन खुशालचेंडूला ...
चेंडू माझ्या मुठीत गं–मिठीत गं
खटनट लंपट लोचट गं–लोचट गं!
माझी कवळी काया शिणविल, जरि हा अलबेला
खेळविन खुशालचेंडूला

बाजीराव : वाहवा! जसं गीत फक्कड तसंच नृत्य फक्कड! बावनखणीच्या कलावतींनो, तुम्ही कमाल केलीत! (त्यांच्यावर फुले उधळीत –) विसाजीपंत, त्यांची बोळवण करताना बावन्न जरीकाटी खण नि बावन्न मोहरा प्रत्येकीला बक्षीस देण्यात याव्यात! धन्य यांची कलाचातुरी!

खंडोशंकर : सारं श्रेय आपल्यालाच आहे श्रीमंत! यथा राजा, तथा प्रजा! आपण बावनखणीला तुच्छ लेखत नाही, तर तिला मदनाची यज्ञभूमी नि कलाविलासाची रंगभूमी मानलंत, म्हणूनच इथे ह्या कलेच्या कल्पवेली बहरल्या!... तुमच्या ह्या पुण्यनगरीत पर्वती–चतुःशृंगीवर भक्तिसंगीताचा मधाळ पूर, तर बावनखणीत लावणी–टप्प्याचे खणखणीत सूर!

बाजीराव : तर मग आता त्या सुरांच्या तरंगातरंगातून रंगू द्या होलिकोत्सवाचा रंगबहार! (बाजीरावांच्या ह्या अंतिम फर्माईशीसरशी विविध वाद्यांचे सुसंवादी कल्लोळ निनादतात आणि नंतर चंद्राचे होलिकोत्सवाचे गीत सुरू होते –)

चंद्रा : (आणि इतर –)

प्रेमरंगामधे रंगली होलिका
रंगला श्रीहरी, रंगली राधिका!

प्रेम–वृंदावनी बहर ये चंपका
दर्वळे प्रीतिची धुंद नवमल्लिका
वाजवी बासरी कुशल श्रीरंग तो
रास–लीला–रसी सहज जो रंगतो
रंग ते फेकता, रंग ते उधळिता
प्रीतिने चिंब त्या जाहल्या गोपिका

बाजीराव : (गीतात सामील होत –)

वंद्य जगदीश तो वंद्य जगदंबिका
या जगन्मंदिरी रंग नित खेळती —
एक निमिषांतरी गगन केले निळे
विविध रंगांतरी खुलविली शतफुले

सातही रंग ते इंद्रधनुला दिले
रजतरंगामधे उजळली चंद्रिका

सर्वजण : प्रेमरंगामधे रंगली होलिका
रंगला श्रीहरी, रंगली राधिका !

खंडोशंकर :

पुण्यपुरीची चटक चांदणी, मदनाची भामिनी
आज ही सजली बावनखणी

रंगभूमिका प्रणयरसाची, सरस मनोहारिणी
होनाजीची–सगनभाउची–प्रभाकराची गुणी
आज ही सजली बावनखणी

द्विज म्हणती बावनखणी, जणू ही मूर्तिमंत लावणी
रसिक–चित्त–रंजिनी कामिनी — सजली बावनखणी

(' आज ही सजली बावनखणी ' हा सामुदायिक घोष, विविध वाद्यांचा सुसंवादी कल्लोळ, विविध रंगांचे शेले उडवीत होणारे नर्तकीचे नृत्य, नूपुरांचा झंकार इत्यादींचा जल्लोष चालू असतानाच पडदा पडतो. तिसरा अंक व नाटक समाप्त )

प ग्रं ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. २०११३ नों. दि ३१.१२.२०१३
वि. [illegible] क्र. ..................

IRBK-0120113